सोलापूर
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शनिवार, दि. २४ मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ५२ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

येत्या ४८ तासांत मान्सून धडकणार! शाळा सुरू होण्याआधीच पावसाची हजेरी लागणार

मुंबई: सध्या राज्यभरात मान्सूनपूर्व पावसाने धुमाकूळ घातलेला असताना, लवकरच नैऋत्य 'मान्सून'चे आगमन होणार आहे. एकेकाळी पावसाची चातकाप्रमाणे वाट पाहायला लावणारा मान्सून येत्या ४८ तासांत केरळमध्ये दाखल होण्याची अनुकूल परिस्थिती निर्माण झाली असल्याची माहिती भारतीय हवामान शास्त्र विभागाने (खचऊ) दिली आहे. त्यामुळे २५ मे पर्यंत भारतात मान्सून धडकणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यामुळे मुंबईत १ जूनपर्यंत मान्सून हजेरी लावण्याची शक्यता आहे.

दरम्यान, दक्षिण कोकण आणि गोव्यालगत असलेल्या मध्य, पूर्व अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले असून, जे सध्या स्थिर आहे. या दरम्यान महाराष्ट्रातील कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पुढील तीन ते चार दिवस पाऊस पडण्याची शक्यता आहे. आज मुंबईत पावसाचा जोर कमी राहणार असून, हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर रायगडसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे, अतिमुसळधार ते मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

२५ मे पर्यंत मान्सून केरळात दाखल होण्याची शक्यता

पुढील दोन दिवसांत मान्सून केरळात दाखल होण्यासाठी अनुकूल परिस्थिती आहे. २५ मे पर्यंत मान्सून केरळात दाखल होण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यानुसार मुंबईत साधारण १ जूनपर्यंत मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. पूर्व-मध्य अरबी समुद्रात, कर्नाटकच्या किनाऱ्याजवळ कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. हे क्षेत्र २३ मे च्या संध्याकाळपर्यंत तीव्र होऊन अवदाबमध्ये रूपांतरित होण्याची शक्यता आहे. याच्या प्रभावामुळे कोकण (मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी), मध्य महाराष्ट्र (पुणे, सातारा, सोलापूर), मराठवाडा (बीड, परभणी, नांदेड) आणि विदर्भातील काही भागांत जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

रायगड-रत्नागिरीत पावसाचा रेड अलर्ट

आज, दिनांक २३ मे रोजी कोकणातील रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांत मुसळधार पावसाची शक्यता असल्यामुळे हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केला आहे. तसेच, पालघर, ठाणे, मुंबई, सिंधुदुर्ग जिल्ह्यांसह पुणे, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांच्या घाटमाथ्यावर तसेच नाशिक, अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यता लक्षात घेऊन ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान, राज्यातील उर्वरित भागांमध्ये वादळी वाऱ्यांसह पावसाचा इशारा दिला असून, हवामान विभागाने सतर्कतेचा इशारा म्हणजेच येलो अलर्ट जारी केला आहे.

# अकोला जिल्ह्यात इतका पाऊस पडला की ८२ वर्षांचा रेकॉर्ड मोडला

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून राज्यात अवकाळी पाऊस सुरूच आहे. अवकाळी पावसाने राज्यभरात धुमाकूळ घातला आह. सर्वाच राज्यांना पावासाने झोडपून काढले आहे. महाराष्ट्रातील एका जिल्ह्यात रेकॉर्डब्रेक पाऊस झाला आहे. या जिल्ह्यात पावसाने ८२ वर्षांचा रेकॉर्ड मोडला आहे.

बुधवारच्या रात्री अकोला शहरात झालेल्या जोरदार पावसामुळे मे महिन्यात २४ तासांत झालेल्या सर्वाधिक पावसाने ८२ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडला आहेय. भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, २८ मे १९४३ रोजी अकोल्यात २४ तासांत ४४.७ मिमी पावसाची नोंद झाली होती. जो आतापर्यंतचा उच्चांक मानला जात होता. मात्र, बुधवार, २१ मे रोजी रात्री ८ वाजेपासून सुरु झालेला पाऊस गुरुवारी सकाळी ८.३० वाजेपर्यंत सुरु होता. यादरम्यान शहरात तब्बल ६६ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

रत्नागिरी जिल्ह्याला सलग तिसऱ्या दिवशी पावसाने झोडपलं आहे. गेल्या २४ तासात रत्नागिरी जिल्ह्यात १०३.९९ मिलिमीटर एवढा विक्रमी पाऊस पडला. गुहागर तालुक्यात सर्वात जास्त म्हणजे १९०.४० मीलिमीटर पाऊस पडला. त्या खालोखाल लांजा तालुक्यात १२८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. तर रत्नागिरी तालुक्यात १२४.११मिलीमीटर एवढा पाऊस पडला. राजापूर तालुक्यात ५० मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. संगमेश्वर मध्ये ११६.४५ मिलिमिटर पावसाची नोंद झाली. खेड तालुक्यात ९४.२८ मीलिमीटर पावसाची नोंद झाली. चिपळूण तालुक्यात ९९.२२ मीलिमीटर पावसाची नोंद झाली. दापोली तालुक्यात १०५.७१ मीलिमीटर पावसाची नोद झाली. सर्वात कमी पावसाची नोंद मंडणगड तालुक्यात २७.७५ मीलिमीटर इतकी झाली.

तर, गेल्या चार दिवसापासून कोल्हापूर जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पंचगंगा नदीच्या पाणी पातळीत कमालीची वाढ झाली आहे. पंचगंगा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाल्यामुळे कोल्हापूर शहरातील कसबा बावडा इथला राजाराम बंधारा पाण्याखाली गेला आहे. बंधाऱ्यावरून मोठ्या प्रमाणावर पाणी वाहत असल्यामुळे कसबा बावडा ते वडणगे हा रस्ता आता वाहतुकीसाठी आता बंद करण्यात आला आहे.

# राहुल गांधींची पंतप्रधानांवर टीका

नवी दिल्ली , २३ मे : पंप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवार राजस्थानच्या बिकानेर येथे भेट दिली यावेळी झालेल्या भाषणाचा व्हिडीओ ट्वीट करत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधानांना ३ प्रश्न विचारलेत. तसेच पंतप्रधानांचे रक्त केवळ कॅमेऱ्यासमोरच उसळते अशा शब्दात त्यांनी मोदींवर विखारी टीका केली.

यासंदर्भातील ट्विटर संदेशात राहुल गांधी म्हणाले की, मोदींनी दहशतवादाबाबत पाकिस्तानवर विश्वास का ठेवला?, डोनाल्ड ट्रम्पसमोर नतमस्तक होऊन भारताच्या हितांचा त्याग का केला? मोदींचे रक्त फक्त कॅमेऱ्यासमोरच का उसळते, अशा शब्दांत राहुल गांधींनी संताप व्यक्त केला आहे. याशिवाय, मोदींनी भारताच्या सन्मानाशी तडजोड केल्याचा आरोपही राहुल यांनी केलाय. दरम्यान, पंतप्रधान मोदींनी बिकानेरमध्ये सांगितले होते की, पहलगाममध्ये गोळ्या झाडल्या गेल्या, पण त्या गोळ्यांनी १४० कोटी देशवासीयांच्या हृदयाला छेद दिला. देशातील प्रत्येक नागरिकाने एकजुटीने संकल्प केला होता की दहशतवाद्यांचा नायनाट केला जाईल. आमच्या बहिणींच्या केसांच्या विदाईतील सिंदूर नष्ट झाला. पंतप्रधान मोदी म्हणाले की, आपल्या सैन्याने असा चक्रव्यूह निर्माण केला की पाकिस्तानला शरणागती पत्करावी लागली.

# ११ वीची प्रवेश प्रक्रिया बंद; ॲडमीशनसाठी नवं वेळापत्रक

मुंबई : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या इयत्ता १० वीच्या परीक्षेचा निकाल काही दिवसांपूर्वीच जाहीर करण्यात आला. ज्यानंतर विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनाचे वेध लागले. मात्र त्यांच्या उत्साह आणि कुतूहलावर विरजण पडलं ते म्हणजे प्रवेश प्रक्रियेतील काही अडचणींचं. ११ वीसाठीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये असणारा गोंधळ संपता संपत नसल्यामुळं आता या प्रवेश प्रक्रियेला अनुसरून नवं वेळापत्रक जारी करण्यात आलं आहे.

नव्या बदलांनुसार इयत्ता अकरावीतील प्रवेशासाठीची पहिली फेरी सोमवार २६ मे २०२५ पासून सुरु होणार आहे. सकाळी ११ वाजता ऑनलाईन पद्धतीनं अकरावीची प्रवेश प्रक्रिया २६ मेपासून राबवली जाणार आहे. दरम्यान यापूर्वी २१ मेपासून अकरावी प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होईल असं जाहीर करण्यात आलं होतं. मात्र २१ आणि २२ मे रोजी सुद्धा अकरावी प्रवेश प्रक्रिया सुरू करणं शक्य न झाल्यानं अकरावीसाठी विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया २६ मे रोजी सकाळी ११ वाजता सुरू होईल, असं शालेय शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलं आहे. थोडक्यात विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन प्रवेशासाठी आणखी ४ दिवसांची प्रतीक्षा करावी लागणार आहे. २६ मे ते ३ जूनदरम्यान विद्यार्थ्यांना अकरावीसाठीचा प्रवेश घेता येणार आहे. जिथं साधारण ९ दिवस ही प्रवेश प्रक्रिया सुरू असेल. ५ जून रोजी पहिली जनरल गुणवत्ता यादी जाहीर होणार असून, ६ ते ७ जून या तारखांना विद्यार्थ्यांना हरकत नोंदवून तक्रार करता येईल आणि ८ जून या दिवशी अंतिम मेरिट लिस्ट अर्थात गुणवत्ता यादी जाहीर होईल. लक्षात घ्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पुन्हा सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना २६ मे ते ३ जूनदरम्यानचा काळात आपल्या पसंतीचं महाविद्यालय निवडता येणार आहे.




# शेतकऱ्यांना उत्तम बाजार सुविधा द्या : हरिभाऊ बागडे

### आंबा- मिलेट महोत्सवचे उद्घाटन

छत्रपती संभाजीनगर, दि.२३(जिमाका)- सहकारी संस्था या सगळ्यांच्या हिताचा विचार करणाऱ्या असाव्या. त्यासाठी आपापसातले मतभेद बाजूला ठेवावे. आंबा महोत्सवासारखे आयोजन करुन कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उत्तम बाजार सुविधा संचालकांनी उपलब्ध करुन द्याव्या, असे प्रतिपादन राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी आज येथे केले.

एकदा चांगल्या कामाला सुरुवात केली त्याला लोकांचा विश्वास प्राप्त होतो. बाजार समिती मार्फत राबविल्या जाणाऱ्या शेतकरी हिताच्या सर्व उपक्रमात आपला सहयोग असेल, असे आश्वासन पालकमंत्री संजय शिरसाट यांनी उपस्थित शेतकऱ्यांना दिले.

येथील उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने आंबा मिलेट महोत्सव २०२५ चे उद्धाटन आज राज्यपाल हरिभाऊ बागडे, राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते आज करण्यात आले. आ. अनुराधा चव्हाण यांचीही यावेळी उपस्थिती होती. बाजार समितीच्या वतीने उभारण्यात आलेल्या पेट्रोल पंपाचे लोकार्पणही यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



बाजार समितीच्या आवारात आयोजित या महोत्सवात आंबा उत्पादक शेतकरी, धान्य उत्पादक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, महिला बचत आदींनी आपले स्टॉल्स लावले होते. बाजार समितीचे सभापती डॉ. राधाकिसन पठाडे, संचालक रामुकाका शेळके, भगावन मुळे, मुरलीधर चौधरी, व्यवस्थापक नितीन पाटील, विभागीय सह. निबंधक शरद दरे, एच पी कंपनीचे अजय सिन्हा आदी उपस्थित होते. हा महोत्सव पाच दिवस सुरु राहणार आहे.

पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, बाजार समितीचे कार्य चांगले असून शेतकऱ्यांसाठी ते महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध करुन देणे. शेतमालाची विक्री सुविधा उपलब्ध करणे यातून शेतकऱ्यांचे हित साधण्याच्या या कामात आपले नेहमीच सहकार्य आणि सहयोग राहिल,असे त्यांनी उपस्थितांना आश्वस्त केले. आ. अनुराधा चव्हाण यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. राधाकिसन पठाडे यांनी केले.

I.No.: A.U.4127/09/25/239

# सुभेदारीच्या व्हीव्हीआयपी सुट चे पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्धाटन

छत्रपती संभाजीनगर, दि.२३(जिमाका)- सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुभेदारी विश्रामगृहाच्या आवारात नव्याने बांधण्यात आलेल्या व्हीव्हीआयपी सुट्चे आज राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते उद्धाटन करण्यात आले.

विधानपरिषद सदस्य आ. संजय केणेकर तसेच अधीक्षक अभियंता सुंदरदास भगत, कार्यकारी अभियंता अशोक येरेकर, श्रीमती प्रिया पुजारी, माजी महापौर नंदकुमार घोडेले तसेच अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. शिरसाट यांच्या हस्ते फीत कापून व कोनशिला अनावरण करुन या कक्षाचे उद्धाटन करण्यात आले. पालकमंत्री श्री. शिरसाट म्हणाले की, सुभेदारी या विश्रामगृहाला ऐतिहासिक वारसा आहे. येथे अनेक मान्यवर वास्तव्यास राहून गेले आहेत. या शहराचाही लौकीक आहे. या लौकीकाला साजेशी ही वास्तू तयार झाली आहे, याबद्दल पालकमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले.

प्रास्ताविकात कार्यकारी अभियंता श्रीमती पुजारी यांनी माहिती दिली की, या इमारतीत बेसमेंट मजल्यावर वाहनतळ, वाहनचालकांसाठी कक्ष, इलेक्ट्रीक रुम, तळ मजल्यावर दोन व्हीव्हिआयपी सुट, स्वयंपाक व भोजन कक्ष, पुरुष महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छता गृहे, पहिल्या मजल्यावर एक व्हीव्हीआयपी कक्ष, कॉन्फरन्स हॉल, प्री फंक्शन लॉबी, सार्वजनिक स्वच्छता गृहे, दुसरा मजल्यावर एक मुख्यमंत्र्यांचा कक्ष, एक व्हीव्हीआयपी कक्ष, टेरेस रुफ गार्डन, या शिवाय प्रत्येक मजल्यावर जाण्यासाठी लिफ्ट, इलेक्ट्रिक रुम आदी सुविधा आहेत. या कामांसाठी एकूण १३ कोटी १८ लक्ष ६३ हजार रुपयांची प्रशासकीय मान्यता होती. त्यापैकी स्थापत्य कामावर ८ कोटी ५ लक्ष ४ हजार रुपये, अंतर्गत सजावटीकरणावर १ कोटी ७१ लक्ष १ हजार रुपये तर विद्युत कामांवर ३ कोटी ८३ लक्ष रुपये खर्च करण्यात आले आहेत, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

# गडचिरोलीत चार नक्षलवादी ठार

गडचिरोली : महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यात सुरक्षा पथक आणि नक्षलवादी यांच्यात चकमक झाली. या चकमकीत चार नक्षलवादी ठार झाले. गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुका आणि छत्तीसगड राज्याच्या सीमावर्ती भागातील कवंडे पोलीस मदत केंद्रापासून जवळ असलेल्या जंगलात चकमक झाली. ठार झालेल्या नक्षलवाद्यांमध्ये दोन पुरुष आणि दोन महिला नक्षलवादी आहेत.

अतिरिक्त पोलिस अधीक्षक एम.रमेश यांच्या नेतृत्वात सी-६० पथकाचे ३०० जवान आणि केंद्रीय राखीव दलाची एक तुकडी गुरुवारी दुपारी कवंडे आणि नेलगुंडा येथून इंद्रावती नदी परिसरात रवाना झशपी होती. या सुरक्षा पथकाशी नक्षलवाद्यांची चकमक झाली. चकमकीत दोन पुरुष आणि दोन महिला असे एकूण चार नक्षलवादी ठार झाले. सुरक्षा पथकाने घटनास्थळावरुन एक स्वयंचलित रायफल, एक ३०३ रायफल, एक भरमार बंदूक, वॉकीटॉकी आणि इतर साहित्य जप्त केले.

# 'लघु उद्योजक प्रशिक्षण' कार्यक्रमास उद्योजकांचा प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर, दि.२३(जिमाका)- जिल्ह्यातील लघु उद्योजकांना उद्योग व्यवसायात येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून आयोजीत 'लघु उद्योजक प्रशिक्षण' कार्यक्रमास उद्योजकांनी उत्तम प्रतिसाद दिला. जिल्ह्यातील १३० लघु उद्योजकांनी या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घेतला.

येथील देवगिरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थायेथे हे प्रशिक्षण पार पडले. दि. आसरा फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्ह्यातील १३० लघु उद्योजकांनी या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घेतला. दि. आसरा फाउंडेशनचे स्नेहा नन्नावरे, प्रकाश आगाशे, उद्योजक शिवप्रसाद जाजू, डॉ. आनंद गोडसे, आशीष गर्दे यांनी मार्गदर्शन केले.






# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## पतीचा खून; प्रियकरासह दोघास जन्मठेप, पत्नी निर्दोष

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मे -**
प्रेम संबंधात अडथळा ठरणाऱ्या पतीचा पत्नी व तिच्या प्रियकराने खून करण्याचा कट रचला. प्रियकराने त्याच्या एका साथीदाराच्या मदतीने तिच्या पतीचा डोक्यात दगडाने मारून, टेस्टरने वार करून खून केल्याप्रकरणी लातूरच्या अतिरिक्त सत्र न्यायालयाने प्रियकर व त्याचा साथीदारास गुरुवारी जन्मठेपेची शिक्षा ठोठावली, तर पत्नीला निर्दोष मुक्त केले.

६ जुलै २०२० रोजी लातूर रोड ते चाकूर या दरम्यान एका फर्निचर दुकानासमोरील मैदानात प्रभाकर गोविंद साळुंके (रा. माताजीनगर, लातूर) यास तिथे नेऊन त्याच्या डोक्यात धनराज सुधाकर आगलावे व राजकुमार उर्फ राजू लक्ष्मण गायकवाड (दोघेही रा. लांजी, ता. अहमदपूर) या दोघांनी मुक्ता उर्फ जान्हवी प्रभाकर साळुंके हिच्या सांगण्यावरून दगडाने मारून व टेस्टरने डोक्यात वार करून खून केला. हत्यारे चाकूर गावानजीक एका पुलाखाली, तर या गुन्ह्यात वापरलेला मोबाइल व सीमकार्ड अहमदपूर तालुक्यातील वाकी नदीत फेकून दिले.

याप्रकरणी अहमदपूर पोलिसांत दोघाजणांविरुध्द खुनाचा तर मुक्ता साळुंके हिच्या विरोधात गुन्ह्यास कारणीभूत असल्याचा गुन्हा दाखल झाला होता. प्रकरण अतिरिक्त सत्र न्यायालयात न्यायमूर्ती आर. बी. रोटे यांच्यासमोर चालले. न्यायालयाने या प्रकरणी धनराज सुधाकर आगलावे व राजकुमार उर्फ राजू लक्ष्मण गायकवाड या दोघांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली तर मुक्ता उर्फ जान्हवी प्रभाकर साळुंके हिस निर्दोष मुक्त केले. या प्रकरणाचा तपास चाकूर ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक जयवंत चव्हाण व पोलीस उपनिरीक्षक टी. बी. गायकवाड यांनी केला. जिल्हा सरकारी अभियोक्ता एस. व्ही. देशपांडे यांनी बाजू मांडली.

### संक्षिप्त वृत्त...

## पोलीस अधीक्षक सोमय मुंडेंची बदली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मे -**
लातूरचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांची छत्रपती संभाजीनगरचे पोलीस उपायुक्त म्हणून बदली करण्यात आली असून, त्यांच्या जागी पुणे येथील दहशतवाद विरोधी पथकाचे पोलीस अधीक्षक जयंत मीना यांची नियुक्ती करण्यात आली आहे.




राज्यातील काही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची गुरुवारी बदली करण्यात आली. त्यात लातूरचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचा समावेश आहे. सोमय मुंडे यांची छत्रपती संभाजीनगरचे पोलीस उपायुक्त म्हणून बदली करण्यात आली. त्यांच्या जागी पुणे येथील दहशतवाद विरोधी पथकाचे पोलीस अधीक्षक जयंत मीना यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक मुंडे यांनी आपल्या सुमारे साडेतीन वर्षांच्या कार्यकाळात जिल्ह्यातील गुन्हेगारीला आळा घालण्याचा प्रयत्न केला. पोलीस दलातील उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांचा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विशेष सेवा पदकाने सन्मानीत करण्यात आले. तसेच त्यांना विशेष शौर्य पदकही जाहीर झाले आहे. गडचिरोली येथे पोलीस अधीक्षक म्हणून केलेल्या सेवेबद्दल त्यांना शौर्य पदकाने गौरविण्यात आले आहे.

## लातुरात भाजपाची तिरंगा यात्रा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मे -**
ऑपरेशन सिंदुरच्या यशानंतर आणी भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ भाजप लातूर शहरच्यावतीने आर्य समाज मंदीर ते महादेव मंदीर दरम्यान तिरंगा रॅली काढण्यात आली. तसेच छत्रपती शिवाजी महाराज मंडळाच्यावतीने अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी वर्षानिमित्त ओंमकारेश्वर महादेव मंदीर व राम नगर मधील मंदीरात स्वच्छता करण्यात आली. यावेळी अॅड. प्रदीप मोरे, मिना भोसले, जिल्हाउपाध्यक्षा सीमा करपे, यांच्यासह अन्य पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## लातूर जिल्हास्तरीय आंबा महोत्सव रद्द

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मे -**
जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी जिल्हास्तरीय आंबा महोत्सवाचे २३ व २४ मे २०२५ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क मैदानावर आयोजन करण्यात आले होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून सततचा पाऊस सुरु असल्याने आणि आगामी काही दिवस पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता असल्याने जिल्हास्तरीय आंबा महोत्सव रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रमेश जाधव आणि आत्माचे प्रकल्प संचालक शिवसांब लाडके यांनी कळविले आहे.

## फार्मसी महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मे -**
जेएसपीएम संचालित शिवाजीराव पाटील कव्हेकर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाचा पहिल्या वर्षाचा एकूण निकाल १०० टक्के लागला असून या युनिटच्या माध्यमातून गुणवत्तेची परंपरा कायम ठेवली असल्याची माहिती प्राचार्य डॉ.प्रद्युम्न इगे यांनी दिली.
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्यावतीने बी.फार्मसी पदवी अभ्यासक्रमाचा निकाल नुकताच जाहीर केला असून या निकालात शिवाजीराव पाटील कव्हेकर कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयाने भरीव यश संपादन केले आहे. यामध्ये मोहिणी प्रदीप जाधव या विद्यार्थीनीने ८.६२ एसजीपीए गुण घेऊन पहिला क्रमांक पटकाविला आहे तर निकीता अमृत जाधव या विद्यार्थीनीने ८.२२ एसजीपीए गुण घेऊन द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. पहिल्याच वर्षात मुलींनी गुणवत्तेत बाजी मिळविली असल्यामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

## माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांना शिवमहापुराण कथेचे निमंत्रण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मे -**
राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री आणि लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची शिवतीर्थ प्रतिष्ठान लातूरच्या शिष्टमंडळाने भेट घेतली. या भेटीदरम्यान प्रतिष्ठानने आंतरराष्ट्रीय कथाकार प्रदीपजी मिश्रा यांच्या शिवमहापुराण कथेचे निमंत्रण आमदार देशमुख यांना दिले. लातूर जिल्ह्यातील तुळजापूर रोड, औसा येथे दिनांक ३० मे ते ५ जून या दरम्यान या कथेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी शिष्टमंडळाने आमदार देशमुख यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली. याप्रसंगी शिवतीर्थ प्रतिष्ठान लातूरचे अध्यक्ष जयकुमार बनसोडे, पंडित कावळे, नेताजी बादाडे, लालासाहेब पाटील, जुगलकिशोर राठानी, विवेक साळुंखे, बालाजी माने, गोविंद सोनवणे आदी उपस्थित होते.

# लातूर जिल्हा रुग्णालयाच्या जागेचा मिळाला ताबा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मे -**
गेल्या एक तपापूर्वी मंजूर झालेल्या जिल्हा सामान्य रुग्णालयाचा प्रश्न जागेचा निधी वर्ग करण्यावरून रखडला होता. दरम्यान, पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या पाठपुराव्याने जिल्हा रुग्णालयाच्या जागेच्या मोबदल्यासाठी आरोग्य विभागाला प्राप्त झालेला ३ कोटी ३२ लाख रुपयांचा निधी कृषी विभागाच्या १४ मे २०२५ रोजीच्या पत्रानुसार परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला वर्ग करण्यात आला.

यानंतर गुरुवारी कृषी विद्यापीठाने जिल्हा रुग्णालयाच्या जागेचा आरोग्य विभागाला ताबा दिला. यामुळे हा प्रश्न मार्गी लागला असून, लवकरच जिल्हा रुग्णालयाचे भूमिपूजन होणार असल्याने लातूरकरांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

२०१३ मध्ये जिल्हा सामान्य रुग्णालय उभारण्यास मान्यता देण्यात आली होती. १०० खाटांचे हे रुग्णालय उभारण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानातून ३१ कोटी ८५ लाख रुपयांचा निधीही प्राप्त झाला होता. या रुग्णालयासाठी कृषी महाविद्यालयाची १० एकर जागा निश्चित करण्यात आली होती. या जागेचा मोबदला म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये देण्यास मान्यता देण्यात आली होती. मात्र, निधी अभावी ही कार्यवाही प्रलंबित होती. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी लातूरच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर पहिल्याच दौऱ्यात त्यांनी हा प्रश्न मार्गी लावण्याचा शब्द दिला होता. त्यानुसार पाठपुरावा करून त्यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात जिल्हा रुग्णालयाच्या जागेसाठी आवश्यक निधी पुरवणी मागण्यांमध्ये मंजूर करून घेतला. हा निधी आरोग्य विभागाकडे प्राप्त झाला होता. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनीही यासाठी आवश्यक कार्यवाहीच्या सूचना दिल्या.

तसेच वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला हा निधी वितरीत करण्याबाबतचा शासन निर्णय आरोग्य विभागाने



निर्गमित केला होता. मात्र, हा निधी कोणत्या खातेक्रमांकावर जमा करावा, याबाबत संभ्रम असल्याने विद्यापीठाने शासनाच्या कृषी विभागाकडे मार्गदर्शन मागविले होते. याविषयी पालकमंत्री भोसले यांनी मंत्रालय स्तरावर सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर १४ मे २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करून आरोग्य विभागाकडील निधी कृषी विद्यापीठाच्या महसूल खाती जमा करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार जिल्हा रुग्णालयासाठी आवश्यक १० एकर जागेच्या मोबदल्यापोटी ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये निधी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला वर्ग करण्यात आला होता.

अखेर गुरुवारी (दि.२२) कृषी विद्यापीठाने जिल्हा रुग्णालयाच्या जागेचा आरोग्य विभागाला ताबा दिला आहे. यामुळे सर्वसामान्य रुग्णांचा प्रश्न मार्गी लागला असून लवकरच जिल्हा रुग्णालयाचे भूमिपूजन होणार असल्याने लातूरकरांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## निवृत्तीवेतनधारकांनो, कुठलीही ऑनलाईन लिंक उघडू नका

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मे -**
निवृत्तीवेतनधारकांनो, ऑनलाईन रक्कम भरण्याच्या अथवा ऑनलाईन फॉर्म भरण्याच्या संदेशाला बळी पडू नका. तसेच व्हॉट्सअॅपद्वारे अथवा इतर सोशल मीडियावरून निवृत्तीवेतन बंद होऊ नये, म्हणून कुठलीही लिंक ओपन करून फॉर्म भरु नका. अन्यथा आपली ऑनलाईन फसवणूक होऊ शकते, असे जिल्हा कोषागार कार्यालयाने कळविले.

राज्यातील कोषागार कार्यालयामार्फत फोनद्वारे, मोबाईलद्वारे निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन सुरू करणे, निवृत्तीवेतन बंद करणे, निवृत्तीवेतन फरक अदा करणे अथवा अतिरिक्त रक्कम वसूल करण्याच्या अनुषंगाने कळविले जात नाही. तसेच कोषागार कार्यालयामार्फत कोणत्याही कर्मचाऱ्यास निवृत्तीवेतनधारकाच्या घरी पाठविले जात नाही.

कोषागारामार्फत करण्यात येणाऱ्या सर्व व्यवहारांकरिता पत्रव्यवहार केला जातो. त्याची सर्व निवृत्तीवेतनधारकांनी नोंद घ्यावी. निवृत्तीवेतनधारकांनी फोन पे, गुगल पे, ऑनलाईन रक्कम भरण्याच्या अथवा ऑनलाईन फॉर्म भरण्याच्या संदेशास बळी पडू नये. तसेच व्हॉट्सअॅपद्वारे अथवा इतर सोशल मीडियावरून निवृत्तीवेतन बंद होऊ नये, अशा प्रकारच्या लिंक ओपन करूनये असे आवाहन करण्यात आले आहे.

# पाच महसूल मंडळात अतिवृष्टी

## औराद मंडळात सर्वाधिक ८२.३ मि.मी. पाऊस

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मे -**
गुरुवार सकाळी ८ वाजता संपलेल्या २४ तासांत लातूर जिल्ह्यातील पाच महसूल मंडळात अतिवृष्टी झाली तर सहा महसूल मंडळात अतिवृष्टीच्या जवळपास अवकाळी पाऊस झाल्याची नोंद करण्यात आली आहे. या दरम्यान जिल्ह्यातील अनेक महसूल मंडळात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे.

लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी महसूल मंडळात गुरुवारी सकाळी ८ वाजता संपलेल्या २४ तासांमध्ये सर्वाधिक ८२.३ मि.मी. एवढ्या पावसाची नोंद झाली आहे. त्या खालोखाल औसा तालुक्यातील मातोळा मंडळात ८१, उजनी मंडळात ६९.५, निलंगा तालुक्यातील कासार बालकुंदा महसूल मंडळात ६९.३ तर कासार शिरसी महसूल मंडळात ६८.८ मि. मी. एवढा पाऊस नोंदला गेला आहे. बेलकुंड ६३.५, लातूर ६०.३, हरंगुळ ६०.३, कन्हेरी ६१.८, मदनसुरी, ६०.८, भूतमुगळी महसूल मंडळात ६०.८ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. गुरुवारी सकाळी ८ वाजता संपलेल्या २४ तासांमध्ये जिल्ह्यात ३८.५ मि.मी. एवढा पाऊस नोंदला गेला आहे. सर्वाधिक पाऊस ५७ मि.मी. निलंगा तालुक्यात नोंदला गेला. लातूर ४५.४, औसा ५४.५, अहमदपूर ३७.६, उदगीर १९.७, चाकूर २२.९, रेणापूर २८.३, देवणी २५.३, शिरूर अनंतपाळ २३, जळकोट २०.२ मि.मी. अशी या पावसाची तालुकानिहाय आकडेवारी आहे.

### नदीकाठावरील नागरिकांना सतर्कतेचा इशारा

मांजरा, तेरणा आणि तावरजा नद्यांच्या पाणलोट क्षेत्रात सध्या पावसाचा जोर वाढत आहे. पावसाचा हा वेग कायम राहिल्यास मांजरा, तावरजा व तेरणा नदीवरील प्रकल्प आणि कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे केव्हाही निर्धारित पाणी पातळीपर्यंत भरतील, अशी शक्यता आहे. यामुळे प्रकल्पांमध्ये येणारे अतिरिक्त पाणी मांजरा, तेरणा आणि तावरजा नद्यांमार्गे सोडावे लागणार आहे. या पार्श्वभूमीवर मांजरा, तेरणा आणि तावरजा नदीकाठावरील शेतकरी तसेच नदीकाठी वस्ती करणाऱ्या नागरिकांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. नागरिकांनी नदीकाठच्या भागात अनावश्यक प्रवेश टाळावा, तसेच आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## एक लाखाचा ऑटो पळविला

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मे -**
शहरातील जुना औसा रोडवरील यशवंत नगरातील शैलेश शिवराज बरदाळे यांनी एमएच. २४, एटी, ००३५ क्रमांकाचा ऑटो उभा केला होता.

दरम्यान, अज्ञात चोरट्याने हा ऑटो पळविला. ऑटोची किंमत १ लाख रुपये आहे. बरदाळे यांनी वाहनाचा शोध घेतला. मात्र, ऑटो सापडला नाही. या प्रकरणी शैलेश बरदाळे यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात बुधवारी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोहेकॉ. बुधोडकर हे करीत आहेत.

## गुरव समाजातर्फे सामूहिक उपनयन संस्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मे -**
लातूर गुरव समाजाच्या वतीने सामूहिक उपनयन संस्कार सोहळा गुरुवार, २९ मे रोजी सकाळी ११:२९ वाजता शहरातील औसा रोडवरील राजीव गांधी चौकातील जगन्नाथ मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात येत आहे.

गुरव समाजातील ज्या मुलांचे उपनयन संस्कार करायचे आहेत, त्यांनी लवकरात लवकर नोंदणी करावी. बटूंसाठी पॅन्ट, गुरुशर्ट, टोपी, उपरणे, सोहळे व विधी सामग्री देण्यात येणार आहे. या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजन समितीचे विजयकुमार भंडारकोटे, संजय बिराजदार, भालचंद्र गुरव, बालाजी पांडे, शिवाजी बिराजदार, रामभाऊ जवळगे, संयोगिता स्वामी, दीपक पाटील, संजय जवळगे, गणेश पाटील, बाळासाहेब हिप्परगेकर आदींनी केले आहे.

दरम्यान, सामुहिक उपनयन संस्कार सोहळ्यासाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. या सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात येत असल्याचे संयोजन समितीने सांगितले.

## मजूर कामगारांना नोंदणी प्रमाणपत्र पूर्वीप्रमाणे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मे -**
शहरातील मजूर कामगारांना पूर्वीप्रमाणे नोंदणी, नूतनीकरण प्रमाणपत्र देण्यात यावे, म्हणून लोकप्रहार संघटनेच्या वतीने मनपाकडे सातत्याने मागणी करण्यात आली. त्यास यशही आले आहे. शहरातील मनपाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी कामगार मजुरांची नोंदणी, नूतनीकरण अर्जावर स्वाक्षरी करणे व शिक्का देणे बंद केले होते.

याबाबत लोकप्रहार संघटनेच्या वतीने चौकशी करुन कामगार आयुक्तांकडे धाव घेतली. तेव्हा त्यांनी स्वाक्षरी व शिक्का हे मनपाचे काम असल्याचे सांगून पूर्वीप्रमाणे मजुरांची नोंदणी पध्दत अवलंबवावी, असे सांगितले. दरम्यान, संघटनेच्या वतीने मनपा आयुक्तांना निवेदन देण्यात आले. तेव्हा आयुक्तांनी पूर्वीप्रमाणे कामगारांना क्षेत्रीय अधिकारी सही व शिक्का देणार असल्याचे सांगितले.

यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अजय सूर्यवंशी, रोहित सोनवणे, आकाश जाधव, लालासाहेब सोनवणे, दगडू गायकवाड, बालाजी जाधव, रवींद्र सोनवणे, जयपाल लोखंडे आदी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानासोबतच स्वतःच्या बुध्दीचा वापर करावा : डॉ. चासकर

### नोकरी मिळालेल्या 'कॉक्सिट'च्या १७३ विद्यार्थ्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मे -**
आयटी कंपन्यांमध्ये नोकरी मिळविल्या. त्यामध्ये अधिकाधिक कौशल्य दाखवून पुढे जाण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, नव्याने आलेल्या एआय तंत्रज्ञानावर अवलंबून राहण्यापेक्षा विद्यार्थ्यांनी स्वतःच्या बुध्दीचा अधिक वापर करून जीवनात यशस्वी व्हावे, असे आवाहन नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांनी केले.

येथील कॉक्सिट महाविद्यालयातील १७३ विद्यार्थ्यांना या वर्षात विविध नामांकित कंपन्यांच्या कॅम्पस मुलाखतीत नोकऱ्या मिळाल्या आहेत. त्यांच्यासह पालकांचा कॉक्सिट महाविद्यालयात गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. चासकर बोलत होते. अध्यक्षस्थानी रॉयल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील होते. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. ए. जाधव, उपप्राचार्य डॉ. व्ही. व्ही. भोसले, प्रबंधक संतोष कांबळे उपस्थित होते.

यावेळी डॉ. चासकर म्हणाले, पुढील ३० वर्षांचा वेध घेऊन डॉ. एम. आर. पाटील यांनी संगणक महाविद्यालयाची स्थापना केली. याच्या माध्यमातून हजारो विद्यार्थी आयटी क्षेत्रात उच्च पदांवर देश-विदेशात कार्यरत आहेत. कॉक्सिट मराठवाड्यात एकमेव महाविद्यालय आहे. इतर महाविद्यालयांनी याचा आदर्श घ्यावा. आजच्या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी विद्यार्थ्यांनी कौशल्याधिष्ठित शिक्षण घेण्याची गरज आहे. इतर महाविद्यालयांनीही विद्यार्थ्यांना कौशल्यक्षम बनवण्यासाठी पुढाकार घ्यावा, प्रत्येक महाविद्यालयात एक कौशल्य धोरण राबवावे. प्रभावी संवाद कौशल्य असल्यास आयटी क्षेत्रात करिअरच्या संधी आहेत. 'एआय'वर अवलंबून न राहता स्वतःच्या बुध्दीचा वापर करावा, असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. पाटील म्हणाले, महाविद्यालयात झालेल्या कॅम्पस मुलाखतीतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पायावर उभे राहण्याची, आत्मनिर्भर होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी एवढ्यावरच न थांबता पुढील शिक्षणही सुरू ठेवावे. त्यांना त्यांच्या क्षेत्रात उत्तम जॉबच्या संधी उपलब्ध होतील, असे ते म्हणाले. प्रास्ताविक ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रमुख प्रा. कैलास जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सुषमा मुंडे व प्रा. आरती पाटील यांनी केले.

# तांदूळजा येथील काँग्रेस कार्यकर्त्यांचा भाजपत प्रवेश



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मे -**
तालुक्यातील तांदूळजा येथील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी लातूर ग्रामीण मतदारसंघाचे आमदार रमेश कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून येथील भाजपच्या 'संवाद' कार्यालयात भाजपमध्ये प्रवेश केला.

तांदूळजा गावासह परिसरातील अनेक गावात भाजपचे नेते आमदार रमेश कराड यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात होत असलेल्या विकास कामांना प्रेरित होऊन तांदूळजा येथील कार्यकर्त्यांनी भाजपत प्रवेश केला. यावेळी मंडल अध्यक्ष सूरज शिंदे, मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, महादेव गायकवाड, अंकुश गंणगे, विष्णू कसबे, शहानूर बागवान यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार रमेश कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून तांदूळजा येथील ग्रामपंचायत सदस्य सचिन कांबळे, कल्याण गालफाडे, शैलेश कसबे, अजय लांडगे, अमर घोडके, विजय लांडगे, कृष्णा चव्हाण, सचिन लांडगे, लखन हजारे, आकाश चव्हाण यांच्यासह काँग्रेसच्या अन्य कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. सर्वांना सन्मानाची वागणूक मिळेल, अशी ग्वाही आमदार कराड यांनी दिली.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## सर्पदंशाने बालकाचा मृत्यू; निंबायती येथील घटना



सोयगाव,दि.२३ मे - सोयगाव सह परिसरात बदलत्या वातावरणाने विषारी साप बाहेर येत आहे दरम्यान घरात खेळत असलेल्या सहा वर्षीय बालकाला विषारी सापाने दंश करून बालकाचा मृत्यू झाला आहे. प्रथमेश गणेश राठोड(वय.०६) रा.निबायती ता.सोयगाव येथील असे सर्पदंशाने मृत झालेल्या बालकाचे नाव आहे.दरम्यान हा प्रकार पित्याच्या लक्षात येताच पित्याने त्या विषारी सापाला कडाडून चावा घेतल्या मुळे पिता गणेश राठोड (वय.३०) हे गंभीर जखमी झाले आहे.दरम्यान मृत बालकांवर बुधवारी रात्री आठ वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले आहे.याप्रकरणी महसूल विभागाने पंचनामा केला असून या बालकाच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याची मागणी होत आहे.

## साहित्यिका विद्या भोरजार आंतरराष्ट्री पुरस्काराने सन्नमानीत



श्रीलंका - श्रीलंका (कोलंबो )येथे जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ द्वारा जागतिक आंबेडकरवादी साहित्य संमेलन भरले होते.या संस्थेचे अध्यक्ष डॉ.दीपक खोब्रागडे होते.तर संमेलन अध्यक्षपदी डॉ विद्याधर बनसोडे होते.सामाजिक परीवर्तन आणि स्त्री शक्तीकरण या विषयावर प्रभावी लेखन करणार्या लेखीका,व्याख़्यात्या विद्या भोरजारे यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान करून गौरवण्यात आले.हा गौरवपूर्ण क्षणं व्यक्त करतांना त्या म्हणाल्या- .श्रीलंका या भूमीने जगाला शांती, करुणा आणि अहिंसेचा संदेश दिला. आज या पवित्र मातीवर मला हा सन्मान मिळतोय, याचा मला समाधा आहे. हा पुरस्कार केवळ माझा नाही, तर प्रत्येक त्या व्यक्तीचा आहे ज्यांनी मला प्रेरणा दिली, पाठिंबा दिला, आणि माझ्या प्रवासात साथ दिली. बुद्धांचा विचार - अत्त दीपो भव - मला नेहमी प्रेरणा देत राहिला.

## विभागात यंदा खरिपाखालील प्रस्तावित क्षेत्रात वाढ, विभागात २१.५३ लाख हेक्टरवर पेरणीची शक्यता

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : विभागात यंदा खरीप हंगामाचे प्रस्तावित क्षेत्र वाढले असले तरी संभाजीनगर जिल्ह्यात मात्र सरासरी पेरणी क्षेत्रात किंचितसी घट झाली आहे. विभागातील तीन जिल्ह्यांमध्ये पेरणीचे सरासरी क्षेत्र एकूण २१.४२ लाख हेक्टर असून, प्रस्तावित क्षेत्र २१.५३ लाख हेक्टर राहण्याचा अंदाज आहे. या संदर्भातील माहिती कृषी विभागाच्या सहसंचालक कार्यालयाकडून प्राप्त झाली.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गतवर्षी ६.८५ लाख हेक्टरचे प्रत्यक्ष पेरणी क्षेत्र होते, यंदा ते ६.८२ लाख हेक्टर दर्शविण्यात आले आहे. तर प्रस्तावित खरीप क्षेत्र ६.९१ लाख हेक्टर आहे. गतवर्षी ६.७५ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती.

जालना, बीडमध्येही वाढ

जालना व बीड जिल्ह्यात मात्र, खरिपाच्या क्षेत्रात गतवर्षीच्या तुलनेत वाढ झालेली दिसण्याचा अंदाज आहे. जालन्यात गतवर्षी सरासरी पेरणीचे क्षेत्र ६.१९ लाख हेक्टर होते, प्रत्यक्ष ६.३० हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती. यंदा ६.५१ लाख हेक्टर सरासरी पेरणीचे क्षेत्र असून, प्रस्ताविक क्षेत्रही तेवढेच आहे. बीड जिल्ह्यात गतवर्षी सरासरी पेरणीचे क्षेत्र ७.८६ लाख हेक्टर होते, तर प्रत्यक्षात खरीप पेरणीचे क्षेत्र ८.०९ लाख हेक्टर होते. यंदा बीडमध्ये सरासरी पेरणीचे क्षेत्र ८.०९ तर प्रस्तावित क्षेत्र ८.११ लाख हेक्टर आहे.

पेरणी क्षेत्रात घटणार!

काही क्षेत्रात पावसाला उशिर झालेला असेल किंवा काही क्षेत्रावर फळबागांचे नियोजन केलेले असेल तर पेरणीच्या क्षेत्रात घट होत असते. छत्रपती संभाजीनगरबाबत असेच कारण आहे. यंदा शेतकऱ्यांसाठी मुबलक प्रमाणात कृषिनिविष्ठा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. बोगस बियाणांसह खतांबाबतील काही तक्रारी असतील तर संबंधित तालुका कृषी अधिकारी किंवा जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाशी थेट संपर्क साधावा. असे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख यांनी म्हटले आहे.

## एमजीएममध्ये आफ्रिका दिवस उत्साहात साजरा

### २३ आफ्रिकन देशातील प्रतिनिधींनी घेतला सहभाग

छत्रपती संभाजीनगर, दि.२३ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठात आफ्रिका दिवस विविध उपक्रमांनी उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी ९:३० वाजता चिंतनगाह ते विनोबा भावे सभागृहापर्यंत आफ्रिकन युनियन ध्वज मिरवणूक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये २३ आफ्रिकन देशांचे प्रतिनिधी आणि मान्यवर सहभागी झाले होते. ध्वज मिरवणूक संपन्न झाल्यानंतर विनोबा भावे सभागृहात मुख्य कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमास विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, अधिष्ठाता डॉ.एच.एच.शिंदे, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना कुलपती अंकुशराव कदम म्हणाले, जग आता खूप लहान झाले आहे. आज आफ्रिका दिवसानिमित्त सर्व आफ्रिकेला मी या कार्यक्रमात पाहत आहे. आपल्यामध्ये काही अंतर राहिले नसून एमजीएममध्ये आपल्या सर्वांचे स्वागत आहे. आम्ही इथे आपल्याला भारतीय लोकांना ज्या सुविधा उपलब्ध आहेत, त्याच सुविधा आपल्यासाठीही उपलब्ध करून दिल्या आहेत. आज आपल्या सगळ्यांना इथे पाहून मनापासून आनंद झाला आहे. एमजीएममध्ये शिकण्यासाठी मीआपल्या सर्वांचे स्वागत करतो.

सर्वप्रथम आपल्या सर्वांना आफ्रिका दिवसानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा! एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य या तत्वज्ञानावर आधारित एमजीएम विद्यापीठ कार्यरत आहे. इथे आम्ही विद्यार्थ्यांमध्ये एकता, अखंडता आणि समतेची जाणीव निर्माण करत आहोत. आजचा युवा हा केवळ देशाचा नाही, तर जागतिक नागरिक बनतो आहे. अशा काळात, आम्ही विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील संधी उपलब्ध करून देत आहोत. एमजीएम विद्यापीठात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० यशस्वीपणे राबवले आहे. यामुळे विद्यार्थ्यांना बहूविद्याशाखीय आणि आंतरविद्याशाखीय शिक्षण घेण्याची संधी मिळत आहे. या शिक्षण प्रणालीमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जात असल्याचे प्रा.डॉ.विलास सपकाळ यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात भारताचे आणि आफ्रिकन युनियनच्या राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई यांनी केले. या कार्यक्रमात १० आफ्रिकन देशांच्या प्रतिनिधींनी आपले विचार मांडले. 'ग्लोबल एन्गेजमेंट थ्रू इंटरनॅशनल स्टुडंट ऑपॉर्च्युनिटीज ॲट एमजीएम कॅम्पस' ही आजच्या कार्यक्रमाची थीम होती. हे सर्व आफ्रिकन प्रतिनिधी २ दिवस एमजीएममध्ये असणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयशा तू मिनंते आणि नियती यांनी केले तर आभार डॉ.कपिलेश मंगल यांनी मानले.

## प्रकल्प सोयगांव अंतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस रिक्त पदांची भरती प्रक्रिया सुरू




तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२३ मे

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत सोयगांव तालुक्यातील (प्रकल्प सोयगांव ग्रामीण अंतर्गत ) असलेल्या बहुलखेडा,निंबायती तांडा,जरंडी,पिंप्री,मोलखेडा व शिंदोळ या महसूली गावातील अंगणवाडी सेविका या नियत वयोमानाने ३० एप्रिल रोजी सेवा निवृत्ती झाल्यामुळे सदरील रिक्त पदांवर गावातील कार्यरत असलेल्या पात्र अंगणवाडी मदतनीस मधुन अंगणवाडी सेविका पद थेट नियुक्तीने भरण्यात आले तसेच ज्या ठिकाणी मदतनीस अंगणवाडी सेविका थेट नियुक्तीस पदासाठी पात्र नाही त्या ठिकाणी जाहिरात देऊन सदरील रिक्त पदे भरण्यासाठी महसूली गावनिहाय अंगणवाडी सेविका -२ पदे आणि मदतनीस-५ पदे अशा एकूण ७ रिक्त असलेल्या पदांसाठी पदभरतीची कार्यवाही २३ मे पासून एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय सोयगांव (ग्रामीण) कडून सुरू करण्यात आली आहे.

राज्य शासनाने ३० जानेवारी २०२५ रोजी अंगणवाडी सेविका व मदतनीस भरती प्रक्रियेबाबत सुधारित नवीन शासन निर्णय जारी केला असून त्यात पद भरतीचे निकषही बदलण्यात आलेले आहेत.

अंगणवाडी सेविका व मदतनीस या दोन्ही पदासाठी शैक्षणिक पात्रता एकच असून किमान १२ वी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.१२ वी पेक्षा जास्त शिक्षण पुर्ण केलेल्या अर्जदारास शासन निर्णय दि. ३० जानेवारी २०२५ मध्ये नमूद परिशिष्ट अ नुसार अतिरिक्त गुण देण्यात येईल अतिरिक्त गुण मिळविण्यासाठी अर्जदाराने पदवी,पदव्युत्तर पदवी,डी. एड.,बी.एड.एम.एस.सी.आय. टी.अथवा शासनाने ठरविलेल्या समकक्ष संगणक परीक्षा प्रमाणपत्र उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. विधवा अथवा अनाथ,मागास प्रवर्गातील,सेविका,मिनी सेविका,मदतनीस पदाचे किमान २ वर्ष अनुभव असणाऱ्या अर्जदाराला अतिरिक्त गुण देण्यात येईल. सोयगांव तालुक्यात एप्रिलच्या अहवालानुसार अंगणवाडी सेविका ०२ पदे तर मदतनीसची ०५ पदे रिक्त आहेत.सदरील पदे भरण्यासाठी राज्याचे महिला व बाल विकास विभाग आयुक्त यांची ३१ जानेवारी रोजी परवानगी मिळाल्यामुळे भरली जाणार आहे.

सोयगाव तालुक्यातील ( ग्रामीण प्रकल्प अंतर्गत) रिक्त असलेल्या निंबायती तांडा,जरंडी,पिंप्री,मोलखेडा व काळदरी येथील प्रत्येकी एक मदतनीस पदासाठी तसेच शिंदोळ व बहुलखेडा येथील प्रत्येकी एक अंगणवाडी सेविका पदासाठी प्रकल्प कार्यालयाने २३ मे रोजी जाहिरात ग्राम पंचायत कार्यालय,अंगणवाडी केंद्र,तालुका प्रकल्प कार्यालय येथे नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करून अर्ज स्विकारण्याची तारीख २६ मे ते ०६ जून पर्यंत शासकीय सुटीचे दिवस वगळून निश्चित केली आहे. तरी पद भरती असलेल्या महसुली गावातील पात्र असलेल्या महिला, मुलींनी अर्ज करण्याचे आवाहन केले आहे .

सदरील पदभरती साठी विहित अर्जाचा नमुना महसूली गावातील अंगणवाडी सेविका,तालुका प्रकल्प कार्यालय येथे उपलब्ध आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पामधील ज्या प्रकल्पांमध्ये शासन निर्णयापूर्वीच्या निकषांनुसार जाहिरात देऊन निवड समितीने निवडलेल्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना नियुक्तीचे आदेश निर्गमित केले आहेत. त्याचप्रमाणे निवड समितीने अंतिम केलेली गुणवत्ता पडताळणी यादी प्रकल्प कार्यालयाने प्रसिद्ध केलेली प्रकरणे वगळून उर्वरित कोणत्याही टप्प्यावर स्थगित ठेवण्यात आलेली भरती प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. त्याऐवजी नव्याने जाहिरात देऊन सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार भरती प्रक्रिया राबविण्यात यावी,असे आयुक्त एबाविसेयो महाराष्ट्र राज्य नवी मुंबई यांच्या ३१ जानेवारीच्या पत्रात म्हटले आहे.अशी माहिती तालुका बाल विकास प्रकल्प अधिकारी सुभद्रा सैवर तसेच कनिष्ठ सहायक युसूफ सय्यद यांनी दैनिक तरुण भारत दिली.

## जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या आदेशाची अंमलबजावणी; शहरातील सात सी.सी.टी .व्ही.फुटेज कार्यान्वित

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२३ मे

शहरातील चोऱ्या व इतर घटनांवर लक्ष ठेवण्यासाठी सोयगाव पोलीसांनी शहरात मुख्य सात ठिकाणी गुरुवारी सी.सी.टी. व्ही.फुटेज सुरू केल्याने आता शहरावर सोयगाव पोलीसांच्या तिसऱ्या डोळ्यांची नजर राहणार आहे. शहरातील विविध घटना व चोऱ्या वर नियंत्रण ठेवण्यासाठी छत्रपती संभाजीनगर ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.विनायकुमार राठोड त्यांनी तातडीने शहरात सी.सी. टी. व्ही.फुटेज लावण्याचे आदेश सोयगाव पोलीसांना दिले होते. त्याची सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांनी तातडीने अंमलबजावणी करत गुरुवारी शहरात बस स्थानक परिसर,संत ज्ञानेश्वर महाविद्यालय,संत गाडगे महाराज चौक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा,जूना बाजार चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक या सात ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित केले आहे. दरम्यान शहरावर आता सोयगाव पोलीसांची नजर राहणार असून गुन्ह्यांच्या तपासासाठी हे उपयुक्त ठरणार असल्याचे सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांनी सांगितले.

## रॉयल एनफिल्डची चोरी

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२३ : शहरातील लासूर रस्त्यावरील फुलेनगर मध्ये राहणारे किरण सुरेश पोळ ( वय ३२) यांची बुधवार (ता.२१) च्या रात्री घरासमोरील दुकानाच्या शेडमध्ये लावलेली रॉयल एनफिल्ड कंपनीची बुलेट गाडी क्र. एम एच २० एफ ए ७३०२ अज्ञात चोट्याने चोरून नेली. या रात्री पाऊस असल्यामुळे शहरातील संपूर्ण विद्युत पुरवठा खंडित झालेला होता. या अंधाराचा फायदा घेत चोरट्यांनी ही गाडी लांबवली. याविषयी गंगापूर पोलीस ठाण्यात शुक्रवार (ता.२३) रोजी तक्रार नोंदवण्यात आली असून गंगापूर पोलीस पुढील तपास करीत आहे.

## भिंतींच्या मजबुतीसाठी मॅसोनरी रिइन्फोर्समेंटच्या गरजेवर भर

मुंबई - दिल्ली एनसीआरआणि भारतातील इतर भागांमध्ये अलीकडील वादळांमुळे भिंती कोसळण्याच्या घटना वाढल्या आहेत. यामुळे भारतातील अग्रगण्य आणि आद्य एएसी ब्लॉक उत्पादक असलेल्या बिलटेक बिल्डिंग एलिमेंट्स लिमिटेडने भिंतींच्या मजबुतीसाठी रिइन्फोर्समेंटची आवश्यकता अधोरेखित केली आहे. कंपनी मरफोरएँ कॉम्पॅक्टला पुढे आणत आहेएक आंतरराष्ट्रीय स्तरावर विश्वासार्ह मॅसोनरी रिइन्फोर्समेंट उपाय, जो जोरदार वाऱ्यांमुळे आणि भूकंपजन्य हालचालींमुळे होणाऱ्या संरचनात्मक ताणांपासून भिंतींचे रक्षण करतो. जोरदार वाऱ्यांमुळे भिंती कोसळून झालेल्या मृत्यूमुळे जलदगतीने किंवा कमकुवत डिझाइन केलेल्या इमारतींच्या स्थैर्याबद्दल प्रश्न निर्माण झाले आहेत. हवामान बदलामुळे हवामानाशी संबंधित घटना अधिक तीव्र होत आहेत आणि भारत भूकंपप्रवण क्षेत्रात असल्याने प्रतिबंधात्मक उपायांची गरज आणखी वाढली आहे.

## ऑटोमॅटिक ट्रान्समिशन पर्यायांमध्ये उपलब्ध

मुंबई : टाटा मोटर्स या भारतातील आघाडीच्या ऑटोमोबाइल उत्पादक कंपनीने आज ऑल-न्यू अल्ट्रोजच्या लाँचची घोषणा केली, जिची सुरूवातीची किंमत ६.८९ लाख रूपये आहे. आकर्षक डिझाइन, लक्झरीअस इंटीरिअर्स आणि प्रगत वैशिष्ट्यांसह प्रीमियमनेसच्या नवीन युगामध्ये प्रवेश करत ऑल-न्यू अल्ट्रोज लक्ष वेधून घेण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे, तसेच प्रीमियम डिझाइन, अद्वितीय सुरक्षितता, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि थरारक कार्यक्षमता या मुलभूत आधारस्तंभांवर निर्माण करण्यात आली आहे. नवीन एक्स्टीरिअर व लक्झरीअस तंत्रज्ञान-संपन्न केबिनपासून सुधारित कनेक्टीव्हीटी आणि विस्तारित मल्टी-पॉवरट्रेन लाइन-अपपर्यंत - जे आता पहिल्यांदाच एएमटी पर्यायामध्ये देखील आहे - अल्ट्रोज दैनंदिन ड्राइव्ह्जना असाधारण प्रवासामध्ये बदलण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे.

## कियाकडून नवीन कॅरेन्स क्लॅव्हिससाठी किमतींची घोषणा

नवी दिल्ली: किया इंडिया या आघाडीच्या मास-प्रीमियम ऑटोमेकरने आज भारतातील ग्राहकांसाठी त्यांची बिग, बोल्ड फॅमिली वेईकल नवीन किया कॅरेन्स क्लॅव्हिस ११.४९ लाख रूपयांच्या आकर्षक सुरूवातीच्या किमतीमध्ये लाँच केली. आधुनिक, मोठ्या कुटुंबांसाठी डिझाइन करण्यात आलेली ही प्रीमियम उत्साहवर्धक वेईकल एमपीव्ही व एसयूव्हींमधील तफावत दूर करते. आकर्षक एक्स्टीरिअर, ऐसपैस इंटीरिअर आणि प्रगत वैशिष्ट्ये असलेली कॅरेन्स क्लॅव्हिस आरामदायीपणा, वैविध्यता आणि स्टाइलचा शोध घेत असलेल्या आधुनिक काळातील कुटुंबांच्या गरजांची पूर्तता करते.

## सोनी सबवर 'तेनाली रामा'

आकर्षक वळणे आणि गुंतगुंतीच्या व्यक्तिरेखा यांच्यामुळे सोनी सबवरील 'तेनाली रामा' मालिकेने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. वेधक रहस्ये आणि जबरदस्त नवीन व्यक्तिरेखा यांच्यासह मालिकेत एक नवीन अध्याय सुरू झाला आहे. आता अंकित भारद्वाजच्या एंट्रीसह मालिकेने एक थरारक वळण घेतले आहे. अंकित अनंतय्या या मोहक व्यक्तिमत्त्वाच्या माणसाची भूमिका करत आहे, ज्याची काळी आणि धक्कादायक बाजू हळूहळू उघड होत जाते. अनंतय्या हा राघवन (प्रदीप सोनी) नामक एका सन्मान्य प्रधानाचा मुलगा आहे आणि मोहकता, बुद्धिमत्ता आणि शक्तीचे मूर्तिमंत रूप आहे. तो वर्तनाने सुसंस्कृत आणि दिसायला कुलीन आहे. तो सहजगत्या लोकांचे मन जिंकतो- खास करून धरणीचे (मृणाली शिर्के)! पण त्याच्या या मोहक मुखवट्याच्या मागे एक अधिक गुंतागुंतीचे सत्य दडलेले आहे.

## 'भाबीजी घर पर है'मध्ये अनिता भाबी

अद्वितीय विनोदी शैली आणि टेलिव्हिजनवरील विनोदी मालिकांमधील उत्तम अभिनयासाठी प्रसिद्ध असलेले अभिनेता पवन कुमार सिंग एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय विनोदी मालिका 'भाबीजी घर पर है'च्या कलाकारांमध्ये सामील झाले आहेत. पवन अनिता भाबीचा (विदिशा श्रीवास्तव) माजी प्रियकर चंदनची भूमिका साकारताना पाहायला मिळणार आहेत. चंदनच्या अनपेक्षित आगमनाने मालिकेच्या कथानकाला अचंबित करणारे ट्विस्ट मिळेल, ज्यामुळे मॉर्डन कॉलनीमधील रहिवाशांना धक्का बसेल. आपला आनंद व्यक्त करत पवन कुमार सिंग म्हणाले, ''पहिल्यांदा पात्राबाबत ऐकल्यानंतर मला खूप आनंद झाला.

## काटेपिंपळगाव येथे भर पावसात देशप्रेमाने उजळली तिरंगा रॅली

तभा वृत्तसेवा

गंगापुर दि.२३:काटेपिंपळगाव येथे राष्ट्रभक्तीचा जागर करत भर पावसात तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीस ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, पावसाच्या सरींना न जुमानता नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



या वेळी जिल्हा परिषद सदस्य मधुकरजी वालतुरे, सरपंच प्रकाश पिंपळे, माजी सरपंच मनीषाताई व्यवहारे, उपसरपंच लक्ष्मीबाई सोनवणे यांच्यासह गीतांजली धोत्रे, नवनाथ थोरात, भाऊराव पवार, कृष्णकांत व्यवहारे, सचिन धोत्रे, ज्ञानेश्वर धोत्रे, भाजपा तालुकाध्यक्ष हरिभाऊ राऊत, लक्ष्मण शेळके, भगवान राऊत, सोमनाथ काळे, आप्पासाहेब धनाड, अरुण धोत्रे, प्रवीण जाधव, तुषार जाधव, विलास धोत्रे, बाळू जगताप, अशोक धोत्रे, संतोष धोत्रे, पंकज सुराशे, सचिन पारखे, कैलास मामा राऊत, रमेश पवार, अण्णाभाऊ धोत्रे, जगन्नाथ धोत्रे, नानासाहेब धनाड, दिनेश धोत्रे, तुळशीराम सोनवणे, भरत महाराज राऊत, नानाभाऊ राऊत, अजय धोत्रे, अजय चव्हाण, दत्तू निकम, कृष्णा धोत्रे, अण्णासाहेब सोनवणे, हौशीराम मोरे, बापू राऊत, सागर धोत्रे, नंदू घाडगे, राहुल सदाशिव, सोमनाथ उदावंत, रत्नाकर तासकर, पंढरीनाथ धोत्रे यांच्यासह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले.

रॅलीदरम्यान 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्', 'जय हिंद' अशा घोषणांनी गावाचा परिसर दुमदुमून गेला होता. या उपक्रमातून देशभक्तीची प्रेरणा देत नव्या पिढीसमोर देशप्रेमाचा आदर्श ठेवण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात पार पडले.

## शिवकालीन दुर्मिळ शस्त्र प्रदर्शनातून छत्रपतींच्या पराक्रमाचे सजीव दर्शन !

### सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव



फोंडा, गोवा : फोंडा येथे पार पडलेल्या 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'त शिवकालीन ऐतिहासिक आणि दुर्मिळ शस्त्रांचे भव्य प्रदर्शन धर्मप्रेमींसाठी विशेष आकर्षण ठरले. ६ हजार चौरसफुट क्षेत्रात मांडण्यात आलेल्या या आगळ्या-वेगळ्या प्रदर्शनाने छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर संभाजी महाराजांच्या पराक्रमाचे सजीव चित्र उभे केले. ३० हजारांहून अधिक धर्मप्रेमी नागरिक, तसेच संत, महंत आणि आध्यात्मिक मार्गदर्शकांच्या उपस्थितीत झालेल्या या महोत्सवात शिवकालीन शौर्य, पराक्रम आणि बलिदान यांची आठवण प्रत्येकाच्या मनात ठसठशीतपणे कोरली गेली.

प्रदर्शनात कोल्हापूरच्या सव्यासाची गुरुकुलम आणि पुण्याच्या शिवाई संस्थान यांचे शस्त्रप्रदर्शन, गोव्यातील सौंदेकर घराण्याची प्राचीन शस्त्रे, तसेच सरदार येसाजी कंक यांची तलवार आणि सरदार कान्होजी जेधे यांचे चिलखत प्रमुख आकर्षण ठरले. त्यात सर्वात हृदयस्पर्शी ठरले ते छत्रपती संभाजी महाराजांना औरंगजेबाने बंदिस्त करताना वापरलेले मूळ साखळदंड, जे शिवले कुटुंबाने पिढ्यान्पिढ्या जतन केले आहेत. या साखळदंडांचे प्रथमच सार्वजनिक दर्शन याच महोत्सवात झाले.

या प्रसंगी शिवले कुटुंबातील वंशज सर्वश्री सागर शिवले, कुमार शिवले, सोमनाथ शिवले, दीपक टाकळकर आणि वेदांत शिवले यांचा हिंदु जनजागृती समितीचे पूर्वोत्तर भारताचे धर्मप्रचारक सद्गुरु नीलेश सिंगबाळ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या वेळी श्री. कुमार शिवले म्हणाले, राजांच्या बलिदानातून प्रेरणा घेऊन समाजात धर्मप्रेम जागवण्यासाठी हे प्रदर्शन आयोजित केले गेले आहे.

प्रदर्शनात शिवकालीन युद्धकलेत वापरण्यात येणारी दुर्मिळ शस्त्रे : विविध प्रकारच्या तलवारी, बंदुका, ढाली, जांबिया, तोफा, कट्यारी, चिलखत, शिरस्त्राण, भाले, कुर्हाडी, त्रिशूल, अंकुश, सिकल, पुरबा इत्यादींचे प्रदर्शन करण्यात आले. याशिवाय छत्रपतींच्या सैन्यातील सरदारांची सचित्र पराक्रमाची माहितीही उपस्थितांना इतिहासाचे प्रत्यक्ष दर्शन घडवणारी ठरली.

## देवगड संस्थानच्या वतीने गोशाळांना कडबा कुट्टी मशीनचे गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराजांच्या हस्ते वाटप

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२३:श्री क्षेत्र देवगड गुरूदेव दत्त पीठ संस्थानच्या वतीने सामाजिक संस्थेच्या वतीने सुरू असलेल्या दहा गोशाळांना कडबा कुट्टी मशीनचे वाटप गुरूदेव दत्त पिठाचे प्रमुख राष्ट्र संत परमपुज्यनिय गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.




गो मातेला राजमाता म्हणून शासनाने दर्जा दिल्यानंतर तिचे संगोपन ही व्यवस्थित होण्यासाठी राज्यातील सामाजिक व धार्मिक संस्थानच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या गोशाळांना कडबा कुट्टी मशीन भेट देण्याचा उपक्रम श्री गुरूदेव दत्त पीठ देवगड संस्थानच्या वतीने गुरुवर्य श्री भास्करगिरी बाबांच्या संकल्पनेतून जातो यावर्षी राज्याच्या कानाकोपऱ्यातील सुमारे दहा गोशाळांना देवगड येथे कडबाकुट्टी मशीनचे वाटप करण्यात आले.

यावेळी बोलतांना गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज म्हणाले की गोमाता ही विश्वाची माता आहे,गोरक्षा ही देश रक्षा करण्यासारखे पुण्याचे कार्य आहे,गोमतेची जेवढी सेवा कराल तेवढे फळ आपल्याला मिळते,परंतु गोमातेची म्हणावी तशी सेवा आज घडत नाही याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली ते म्हणाले की आज गोमातेचे फायदा पाहणारी माणसे आहेत,दूध न देणारी गाय जरी आपण दारात बांधली तरी ही येणारे अनिष्ट ही तिच्या कृपेने नष्ट होऊन जातात असे सांगून त्यांनी गो मातेचे पालन करणे तिचे रक्षण करणे ही काळाची गरज असून यासाठी प्रत्येकाने पुढे यावे असे आवाहन त्यांनी यावेळी बोलतांना केले.

यावेळी राशीन कर्जत येथील यशोदानंद गोशाळा, परभणी जिल्ह्यातील कोठाळा तांडा,जामखेड धामणगाव येथील श्री संत नंदराम महाराज गोशाळा, कुसळंब बीड येथील खंडेश्वरा गोशाळा,हिवरा रोशनगाव जालना येथील श्रीकृष्ण गोशाळा,उंबर विहरा बीड येथील राधाई गोवंश गोसंवर्धन केंद्र,कर्जत दगडवाडी येथील श्री रुख्मिणी माता गोशाळा,नांदेड घुंगराळा येथील गोवंश सुधार प्रकल्प,बीड कारेगाव येथील कै.नयना तांबे गोशाळा, जामखेड फकराबाद येथील श्री गांगेय गोशाळा या गो-शाळांना कडबा कुट्टी मशीन गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी देवगड संस्थानचे कार्यालयीन अधिकारी महेंद्र फलटणे,चांगदेव अण्णा साबळे,तात्या महाराज शिंदे,मुरमे गावचे सरपंच अजय साबळे,सेवेकरी संदीप साबळे,अँड. रविंद्र सारंगधर, मशीन निर्माते ढवळे,मेजर देशपांडे, बंटीभाऊ पठाडे यांच्यासह गोशाळा चालक उपस्थित होते

## काशिनाथ परदेशी यांचे निधन



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२३ मे : येथील प्रगतिशील शेतकरी काशिनाथ मोतीराम परदेशी (वय.१०५)यांचे गुरुवार रोजी रात्री १०:२० वा. वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार रोजी सकाळी ११:०० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात चार मुले,दोन मुली,सुना,नांतु,नातवंडे,असा परिवार आहे.ते सुभाष परदेशी यांचे वडील होत.

## अग्रलेख...

# नक्षलवादाच्या नि:पाताची नांदी...

महाराष्ट्राच्या सीमेपासून अवघ्या १५ किलोमीटर अंतरावरील अबुझमाडच्या दाट जंगलात बुधवारी सकाळी झालेल्या तुंबळ संघर्षात सुरक्षा जवानांनी तब्बल २७ नक्षलवाद्यांना कंठस्नान घातले. छत्तीसगडमधील नारायणपूर परिसरातल्या इंद्रावती राष्ट्रीय उद्याननजीकची ही जोरदार चकमक २०२६ पर्यंत या देशातून नक्षलवाद संपवण्याच्या मोदी सरकारच्या निर्धाराची नांदी ठरावी अशीच आहे. कारण या दमदार कारवाईत माओवाद्यांचा देशातील सर्वोच्च नेता, सीपीआय (माओवादी) संघटनेचा सरचिटणीस, 'पॉलिट ब्युरो' सदस्य आणि नक्षलवादी चळवळीचा कणा असलेला नंबाला केशव राव ऊर्फ बसवराजू याचा खात्मा झाला. एकीकडे 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून भारताने दहशतवाद्यांमध्येच दहशत पसरवली आहे तर दुसरीकडे 'ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट' राबवून देशांतर्गत माओवाद्यांचे खच्चीकरणही केले जात आहे. या देशात आतंकवाद निर्माण करणाऱ्यांविरुद्ध 'शून्य सहिष्णुते'चे धोरण आता खऱ्या अर्थाने मूर्त रूप घेत असल्याचे दिसते.

परवा गडचिरोली पोलिस दल आणि राज्य राखीव पोलिस दलाच्या जवानांनी 'डीव्हीसीएम' व 'एसीएम' दर्जाच्या माओवाद्यांसह अन्य तीन प्लाटून सदस्यांना अटक केली. या नक्षलवाद्यांच्या शिरावर एकूण ३६ लाखांचे बक्षीस होते. शिवाय यावेळी मोठ्या प्रमाणात दारूगोळा जप्त करून घातपाताचा कट उधळून लावला गेला. त्यापाठोपाठ नारायणपूर परिसरात झालेल्या चकमकीत २७ कडवे माओवादी ठार करण्यात सुरक्षा जवानांना यश आले. या चकमकीनंतर बेवारस पडलेला ७० वर्षीय बसवराजू हा काही साधासुधा नक्षलवादी नव्हता, तर त्याने दंडकारण्यात नक्षल चळवळीचा पाया रोवला होता. माओवाद्यांनी स्वप्नातही विचार केला नव्हता अशी ही कारवाई त्यांच्या एकूणच चळवळीला मोठा धक्का देणारी, त्यांना सैरभैर करणारी आहे. गेल्या दशकातील अनेक भीषण माओवादी हल्ल्याचा हा बसवराजू 'मास्टरमाईंड' होता. अबुझमाडचे जंगल त्याच्या दहशतीने खचून गेले होते. त्याने घडवलेल्या कारवायांचा रक्तरंजित इतिहास अंगावर काटा आणणारा आहे. बसवराजू हा आंध्रप्रदेशातील श्रीकाकुलम जिल्ह्यातील जियान्नापेट गावचा रहिवासी होता. त्याने वारंगल येथील राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेतून अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले. महाविद्यालयीन जीवनातच तो डाव्या विचाराने पछाडला गेला. मुळात हुशार असलेल्या बसवराजूने स्फोटकाच्या तंत्रज्ञानात प्रभुत्व मिळविले होते आणि त्याचा वापर निष्पापांच्या हत्येसाठी केला. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, केवळ बुद्धिमत्ता असून ती कामाची नसते, तर तिला विवेकाची जोडही आवश्यक असते. अन्यथा ती विध्वंसक ठरते. १९८७ मध्ये बस्तरच्या जंगलात बसवराजू याने काही जहाल नक्षल नेत्यांसोबत श्रीलंकेतल्या लिट्टेच्या (लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ इलम) माजी सैनिकांकडून 'ॲम्बुश' रणनीती आणि 'जिलेटिन' हाताळण्याचे प्रशिक्षण घेतले होते. पुढे तो या कामात निष्णात झाला. आपल्या विनाशक बुद्धिमत्तेचा वापर करीत त्याने २०१० मध्ये दंतेवाडा येथे भीषण हल्ला घडवून आणला; ज्यात ७६ केंद्रीय राखीव पोलिस दलाचे जवान हुतात्मा झाले होते. पोलिसांसह निष्पाप गावकऱ्यांची हत्या करणे, खाण कंपन्या व कंत्राटदारांकडून खंडणी वसूल करणे, जीराम घाटी हल्ल्यात माजी राज्यमंत्री महेंद्र कर्मा आणि छत्तीसगड काँग्रेसचे नेता नंदकुमार पटेल यांच्यासह अन्य २७ जणांचा मृत्यू घडवून आणण्याचा आरोपही या बसवराजूवर आहे. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, तेलंगणा, झारखंड, मध्यप्रदेश, वेस्ट बंगाल या सर्व नक्षलग्रस्त राज्यात सक्रिय असलेल्या या कुख्यात नक्षलवाद्यावर चक्क सहा कोटी रुपयांचे इनाम होते. त्याचा खात्मा करून सुरक्षा दलाने निर्भान झालेल्या नक्षलवादाचे कंबरडेच मोडले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या उल्लेखनीय कारवाईचे कौतुक करीत देशात माओवाद्यांचा धोका दूर करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे म्हटले आहे. तर, ३१ मार्च २०२६ पर्यंत या देशातून नक्षलवाद समूळ नष्ट करण्याचा इशारा देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेच्या निवडणुकीदरम्यान थेट चंद्रपुरात येऊन दिला होता, त्याचा पुनरुच्चार त्यांनी पुन्हा एकदा या घटनेनंतरच्या त्यांच्या ट्विटमधून केला आहे. त्यांचे ते शब्द आता खरे ठरत असल्याचे दिसते. अबुझमाडच्या जंगलातील कारवाई ही नक्षलवाद संपवण्याच्या मार्गावरील मैलाचा दगड ठरणार आहे, यात शंका नाही. नक्षलवादाविरुद्धच्या तीन दशकाच्या लढ्यातील ही चकमक त्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. या लढाईत पहिल्यांदाच माओवाद्यांचा सरचिटणीस दर्जाचा नक्षलवादी मारला गेला. तर, 'ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट'च्या माध्यमातून छत्तीसगड, तेलंगणा व महाराष्ट्रातील ५४ नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली. ८४ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे, हे या नक्षल चळवळीला ग्रहण लागल्याचेच लक्षण आहे.

खरे तर, गत पाच-सहा वर्षांत नक्षलवादाची पाळेमुळे जोरकसपणे उद्ध्वस्त केली गेली. त्याचवेळी आदिवासींना विश्वासात घेण्यासाठी 'सोशल पोलिसिंग'सारख्या प्रभावी योजनेवरही काम केले गेले. त्यामुळेच माओवाद्यांना स्थानिक आदिवासींकडून याआधी मिळणारे सहकार्य एकदम कमी झाले आहे. आधी नक्षलवाद असलेल्या गावांमध्ये राहणारा आदिवासी बांधव माओवादी आणि पोलिसांच्या मध्ये पिसला जायचा. शेवटी जिवाच्या भीतीने, पैशाच्या गरजेपोटी तो नक्षलवाद्यांना मदत करायचा. पण आता आदिवासींच्या मुलांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी पोलिसांकडून रोजगार व जनजागरणाचे मेळावे घेतले जात आहेत. पोलिस भरतीतही आदिवासी पाड्यातील बेरोजगार तरुण सहभागी होत आहेत. सुरजागड येथे गौण खनिजाच्या खाणी आल्याने रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. शिवाय आता तेंदुपत्ता हंगाम कंत्राटदाराच्या हातून काढून ग्रामसभेकडे दिल्याने कंत्राटदाराकडून नक्षलवाद्यांना मिळणारी खंडणी बंद झाली आहे. पेपर उद्योगांसाठी लागणारा बांबू तोडणाऱ्या आणि त्याची वाहतूक करणाऱ्या घटकांकडूनही आधी हे माओवादी पैसा वसूल करायचे. आता बांबू पुरवठाच मर्यादित झाल्याने नक्षल्यांची ही रसदही संपली आहे. माओवाद्यांनी साठवून ठेवलेला मोठा पैसा मोदी सरकारने राबविलेल्या नोटाबंदीने पाण्यात गेला. एकूण काय, तर त्यांचा साऱ्याच आघाडीवर शक्तिपात झाला आहे. अनेक दलममध्ये त्यांच्या दोन वेळच्या जेवणाचे वांदे झाले आहेत. खऱ्या अर्थाने त्यांची आता हातातोंडाशी गाठ पडली आहे. दुसरीकडे 'दादालोरा खिडकी' योजनेच्या माध्यमातून आदिवासी जनतेला विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, शासकीय दाखले, उच्च दर्जाचे कृषी बियाणे व स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्याचे अभिनव कार्य सुरू आहे. 'दादालोरा' हा आदिवासी भाषेतील शब्द आहे. त्याचा अर्थ मोठा भाऊ असा होतो. 'पोलिसदादा' या अर्थाने तो तिकडे वापरला जातो. त्यांच्याच भाषेत त्यांच्याशी साधलेला हा संवाद फलदायी ठरत आहे तर दुसऱ्या आघाडीवर मोठ्या धैर्याने आणि निडरपणे सीआरपीएफ , एसआरपीएफ, सी-६० यांसारख्या सुरक्षा यंत्रणांनी माओवादाविरुद्ध दंड थोपटले असून चातगावसारखे दलम समूळ नष्ट केले आहे. २०१४ मध्ये भारतातील १२६ जिल्हे नक्षलवादाने प्रभावित होते. आता मात्र २०२५ येईपर्यंत केवळ १२ जिल्ह्यातच त्यांचा तुटपुंजा प्रभाव उरला आहे. सगळीकडे त्यांचे हात तोकडे पडत आहेत. नजीकच्या काळातील सुरक्षा यंत्रणांच्या कारवायांना मिळणारे हे यश नक्षलवाद संपण्याचे शुभसंकेत मानले पाहिजे. सीमेवर पाकिस्तान-चीनसारख्या शत्रूंशी दोन हात करताना देशांतर्गत दहशतवाद आता आम्हाला परवडण्यासारखा नाही, असा स्पष्ट संकेत एव्हाना नक्षलवादाविरुद्धचे धोरण आखताना भारत सरकारने दिला आहे आणि तो अतिशय योग्य आहे.

## प्रासंगिक

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

# महाभारत ते भारत (११)

महाभारत हे महाकाव्य म्हणजे भारतीय संस्कृतीच्या सर्वांग परिपूर्ण विकसन प्रक्रियेचा, वैदिक काळापासून तो द्वापार युगाच्या अंतापर्यंतच्या वाटचालीचा इतिहास आहे. द्वापार युगाचा अंत आणि कलियुगाचा प्रारंभ अशा कालसीमेवरील सर्व ज्ञात अशा घटनांचा साक्षी असणारा हा ग्रंथ म्हणजे भारतीयांना जीवनाच्या सर्व क्षेत्रात अखंडपणे प्रकाश दाखविणारा दीपस्तंभ आहे. त्या प्रकाशात वैयक्तिक जीवनापासून तो राजकीय, सामाजिक, धार्मिक, नैतिक, राष्ट्रीय, वैश्विक क्षेत्रातील सर्व समस्यांचे अचूक मार्गदर्शन या ग्रंथातून आपल्याला प्राप्त होऊ शकते जर, त्या श्रद्धेने, विश्वासाने या ग्रंथाकडे पाहिले तर! भारतीय तत्त्वज्ञानाचे कालातीत व संजीवक सामर्थ्य असणारा भगवद्गीता हा ग्रंथ, महाभारताच्या उदरातूनच जन्माला आला, ही एकमेव घटनाच या ग्रंथाचे माहात्म्य सिद्ध करणारी आहे.

**कुरुक्षेत्र - फाळणीचा अपरिहार्य परिणाम**

'कुरुक्षेत्र' म्हणजे युद्धभूमी; हा कोणत्याही युगातील फाळणीचा अपरिहार्य असा परिणाम असतो, हा शाश्वत सिद्धांत वा प्रमेय महर्षी व्यासांनी महाभारतात संपूर्णपणे विशद केला आहे. फाळणी मग ती द्वापार युगातील, हस्तिनापूरची म्हणजे चक्रवर्ती भरताच्या समुद्र वलयांकित महाराज्याची असो वा कलियुगीन त्याच्याच नावाने अस्तित्वात असलेल्या भारताची असो, परिणाम एकच युद्ध! धृतराष्ट्री मनोवृत्तीचा समूळ नायनाट, संपूर्ण विध्वंस! प्रत्येक पापाचे, अपराधाचे पूर्ण माप त्यांच्या पदरात टाकणारे, प्रत्येक कृतीचे, दुस्साहसाचे परिणाम त्यांना भोगायला भाग पाडणारे, आपल्याच भावांच्या पत्नीला जांघेवर, मांडीवर येऊन बैस म्हणणाऱ्यांची जंघा गदेच्या घणाघाती प्रहाराने विदीर्ण करणारे, आपल्या धर्मपत्नीला नग्न करण्यासाठी तिच्या वस्त्राला घातलेला हात उपटून टाकणारे त्याच्या रक्ताने तिच्या मोकळ्या केसांना भिजविणारे, प्रतिशोधाच्या धगधगत्या ज्वालेने पेटलेले सर्वंकष युद्ध! युद्ध!! आणि युद्ध!!! महाभारताचा हाच संदेश आहे. आधुनिक भारतालाही इच्छा असो वा नसो. याच पूर्वकालीन, अनुभूत आणि अंतिम विजयाच्या दृष्टीने वाटचाल करावी लागणार आहे. त्याला पर्याय नाही. महाभारतात कणिक नीती आहे. विदूर नीती आहे. शरपंजरी पडलेल्या भीष्म पितामहांनी नूतन राज्याधिपती युधिष्ठिराला केलेला उपदेश आहे. या सर्वांचे सार एकच आहे- 'शस्त्रेण रक्षिते राष्ट्र शास्त्र चिंता प्रवर्तते।'

शत्रूचा समूळ नायनाट करावा. शिल्लक राहिलेली ठिणगीही पुढे वणव्याचे स्वरूप धारण करते. सापाला दूध पाजले तरी त्याचे विषच होते. सापाप्रमाणे डूक धरून बसलेला शत्रू त्याला योग्य संधी मिळताच दंश केल्याशिवाय राहत नाही त्यामुळे हे राजन्!

'यस्मिन्यथा वर्तते यो मनुष्यस्तास्मंस्तथा वर्तितव्य स धर्मः
मायाचारो माझ्या वर्तितव्यः साध्वाचारः साधुना प्रत्युमेयः॥'

म्हणजे ज्यांच्याशी जो मनुष्य जसा वागतो त्याच्याशी तसे वागावे हा धर्म आहे. कपटाने वागणाऱ्याशी कपटाने वागावे आणि भलेपणाने वागणाऱ्याशी भलेपणाने वागावे हासुद्धा धर्म आहे. शत्रू-मित्र विवेकाच्या दृष्टीने आणि राष्ट्रजीवनाच्या सुरक्षिततेच्या आणि प्रगतीच्या संदर्भात वरील विवेचन किती अचूक आहे, याचा पडताळा वा प्रत्यंतर सन १९४७ च्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सन २०१४ पासून जो नेतृत्वाचा बदल झाला आहे आणि सध्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने जो भारत-पाकिस्तान संघर्ष चालू आहे त्या घटनांवरून सहजपणे येते. या दृष्टीनेही महाभारतात भविष्यकालीन वाटचालीच्या पाऊलखुणा सहज सापडतात. त्या अशा की, सैन्यबळाच्या दृष्टीने हे 'विषम द्वंद्व' आहे. कारण एकीकडे ७ अक्षौणिही आणि दुसरीकडे ११ अक्षौणिही सेना अस्त्रवेत्तेपणातही एकटा अर्जुन विरुद्ध द्रोणाचार्य, भीष्माचार्य, कृपाचार्य, अश्वत्थामा आणि सुडाने पेटलेला कर्ण! काहीही तुल्यबलता नाही. पण तरीही विजयश्रीने पांडवांना माळ घातली. याचे कारण म्हणजे धृतराष्ट्री मनोवृत्तीच्या लोकांच्या पापाचा घडा भरला असल्याने कालपुरुषानेच त्यांना ग्रासले होते. ती त्यांची नियती आधीच ठरली होती. त्याचमुळे भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला 'निमित्तमात्र भव सव्यसाचिन्' असा आदेश दिला. तीच अवस्था आज भारताची आहे. कारण पाकिस्तानची, इस्लामची कालपुरुषाने तीच नियती (डेस्टिनी) शेकडो वर्षे आधी ठरवून दिली आहे. तिचे प्रतिबिंब पुढील भविष्यवाणीत स्पष्ट दिसते. ती कथा अशी - भारतावरील मुस्लिम आक्रमणाचा इतिहास महंमद गजनी आणि शहाबुद्दीन महंमद घोरी यांच्या काळापासून चालू होतो. महंमद घोरी आणि पृथ्वीराज चव्हाण यांच्यातील १७ वेळा झालेल्या संघर्षाची गाथा स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या भाषेत हिंदू समाजाच्या सद्गुण विकृतीची कथा सर्वांना ज्ञातच आहे. सतत पराभवामुळे दुर्मुखलेला, उदास झालेला महंमद घोरी बुखारा येथे वास्तव्याला असलेले प्रसिद्ध संत फकीर हजरतशहा नियामत उलवली यांचे दर्शनाला गेला. आपली व्यथा प्रकट केली. त्यांच्यात संवाद झाला. फकीर साहेब त्याला म्हणाले,

"बंदा बनके आया है या बादशहा?" महंमद घोरीने उत्तर दिले,

"बंदा बनके आया हूं." तीव्र स्वरात त्यांनी त्याला पुन्हा विचारले,

"तूं अल्ला के सामने लोगों को झुकाना चाहता है की तेरे सामने?" घोरीने मवाळ आवाजात अदबीने उत्तर दिले,

"नही, मै तो इस्लाम का बंदा हूं. उसके सामने सबको झुकाना चाहता हूं."त्याच्या उत्तराने खूश झालेल्या हजरतशहांनी पुढील भविष्य वाणी केली,

"लौट जा, वापस हिंद लौट जा! तू जितेगा! जिससे तू हारा है, उसे तू शिकस्त देगा! वही तेरे हाथो शहीद होगा! तू हिंद मे इस्लाम की हुकूमत कायम करने वालो में होगा! डेढ सौ सालो में तुम लोग हिंद के आखिरी शहर तक फैल जाओगे! (म्हणजे रामेश्वपर्यंत) फिर एक रोज इसी हिंद का हिस्सा लेकर अलग होंगे! (म्हणजे पाकिस्तानची निर्मिती). लेकीन एक दिन खुद कई टुकडो में बटने के लिये!" हजरत नियामत उलवलींनी केलेल्या भाकिताप्रमाणे 'वह एक दिन' 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने येऊन ठेपला आहे. बलुचिस्थान, पख्तुनिस्थान, सिंधस्तान आणि व्याप्त काश्मीर इत्यादी अनेक तुकड्यांमध्ये पाकिस्तान विभाजनाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. पानिपतच्या रणांगणात लक्षावधी आयाबहिणींच्या सांडलेल्या कुंकवाचा बदला घेण्यासाठी महादजी शिंद्यांनी उत्तरेकडे आक्रमण करीत सत्ता खिळखिळी केली. पहेलगाम येथे सांडलेल्या कुंकवाने सिंदुराने इस्लामी आतंकवादाचे माहेरघर पाकिस्तान छिन्नविच्छिन्न केले. असा सतित्त्वदर्शक भारतीय नारीच्या सामर्थ्याचा हा प्रत्यय आहे.

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# लिंबू आणि सोनं

समाजमाध्यमं आता गांभीर्याने घेऊच नयेत असे प्रकार दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. त्यापैकी एक 'व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटी' असा शब्द प्रचलित झाला आहे. येथे कल्पना जन्माला येतात आणि टोकाचे भांडणंही होतात. अगदी लग्न तुटेपर्यंतचे या समाजमाध्यमांची मजल गेली आहे. आपल्याकडे चांगले ते घेण्याची प्रथा असताना वाईट ते घेण्यावर आपलाच भर असल्याने असा बाका प्रसंग आपणच ओढवून घेतो. त्याला हात दाखवून अवलक्षण म्हणता येईल. आता तुम्ही म्हणाल हे रोजचेच रडगाणं झालं आहे. उठसूट मोबाईल बघणं वाईट म्हटले जात असले, तरी आपले डोळे लागल्यानंतर तेवढाच मोबाईलला आराम मिळतो. पुन्हा डोळे चोळत उठत असतानाही 'कराग्रे वसते लक्ष्मी' ऐवजी 'कराग्रे बसतो भ्रमणध्वनी' असे काहीसे जीवन झाले आहे. तुम्ही कितीही वाईट म्हणा, पण 'मोबाईल के बिना सब कुछ अधुरा है!' सध्या देशात सर्वात जास्त दुःखी कोण असेल तर शेतकरी... त्याच्याविषयी राजकारण्यांना जी तळमळ आहे ना तीही मतांपुरतीच बरं का... बाकी त्याचा तारणहार तोच! देवही त्याची जमेल तेवढी परीक्षा घेतो. तोही देवाच्या परीक्षेला तेवढ्याच ताकदीने उत्तर देतो. शेतकऱ्यांचा 'वाली' सध्या तरी कोणीच नाही. सर्व काही देवाच्या हवाली करून तो आषाढीला पांडुरंगाच्या दर्शनाला पायी वारीत सहभागी होतो. हे सारं सांगण्याच्या मागे वेदना आहेत. त्या समजून घेणे अवघडही असेल. काल-परवा एका वैदर्भीय युवकाने केलेली रिल बघितली. कोण काय शोधून काढेल, याचे नवल वाटले. आम्ही शेतकऱ्याची मुलं असल्याचे ठासून सांगत असलो, तरी शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेण्याऐवजी टीका करण्याची संधी सोडत नाही. उन्हाळ्याच्या सुरुवातीपासून लिंबाचे भाव वाढलेले असतात. एरवी लिंबाला फारशी मागणी नसते. उन्हाळ्यात सरबत वगैरेसाठी लिंबू लागत असल्याने १ रुपयाला १ लिंबू मिळणारे उन्हाळ्यात १ लिंबू ५ रुपयाला १ आणि २० रुपयाला ३ लिंबू विकत मिळतात. एप्रिल ते मेच्या पहिल्या आठवड्यापर्यंत १० रुपयाला १ लिंबू असे भाव होते. गाव वा जिल्हापरत्वे त्यात कमी-जास्त भाव असतीलही. पण, एप्रिलमध्ये एका वृत्तवाहिनीने जळगाव जिल्ह्यात लिंबाचे भाव गगनाला भिडल्याची बातमी पंधरवड्यात दोन वेळा दाखवली.



असो. ते चोवीस तास दाखवण्याच्या भानगडीत वेगळे काय दाखवणार. पण, दोन दिवसांपूर्वी जे काही समाजमाध्यमावर व्हायरल झाले, त्याने आम्ही किती दरिद्री विचारांचे आहोत, हेच वाटू लागले. श्रद्धेपोटी नजर लागू नये म्हणून काही जण वाहनाला लिंब-मिरची बांधतात. त्यावर अंधश्रद्धा निर्मूलनवाले टीकाही करतात. तरीही लोकं लिंबू-मिरची बांधल्याशिवाय राहत नाहीत. रिल निर्मात्याने मात्र आता लिंबू परवडत नसल्याने मिरचीसोबत 'लिंबा' ऐवजी 'व्हीमबार' लावल्याचे दाखवले. घटका भर आपण दातही दाखवले असतील. पण, सध्या लिंबूच महाग आहेत का? पण, कोटी करायला लिंबूच मिळाले. हो, अर्थशास्त्रानुसार पुरवठा कमी आणि मागणी जास्त असल्यास भाव वधारतात. बरं, हे लिंबाचे भाव वाढले तो पैसा शेतकऱ्यांच्या हातात लागतो का? तर, याचे उत्तर १०० टक्के नाही असे आहे. मधला पैसा दलाल, ठोक विक्रेता व किरकोळ व्यावसायिकाच्या खिशात जातो. शेतकऱ्यांच्या पदरी मेहनतीनंतर दोन-अडीच रुपये पडतात. पिकवणाऱ्या पेक्षा विकणारा फायद्यात राहू लागला आहे. ही कथा झाली लिंबाची, पर्यायाने शेतकऱ्यांची आणि हे सर्व शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पुजलं आहे. आता पुढचा भाग सोन्याचा! तुम्ही म्हणाल सोनं आणि लिंबाची तुलना तरी होऊ शकते का? तर याचेही उत्तर नकारार्थीच... पण, सोन्याचे भाव वाढले कौतुकाने दाखवले जाते. शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाचे भाव वाढले म्हणजे सामान्यांच्या डोळ्यात पाणी येतं, महिलांच्या स्वयंपाकघराचे बजेट बिघडतं. पण, अक्षय्य तृतीया, गुढीपाडवा, दसरा या साडेतीन मुहूर्ताशिवाय गुरुपुष्यामृताला नेमाने सोने खरेदी करणाऱ्यांची संख्या बघा; त्यातही सामान्यांची संख्या मोठी असते. आपल्या संस्कृतीत अनेक अशा वस्तू आहेत ज्यांचा उपयोगच नाही तर त्याला गूढ अर्थ आणि परंपरा आहे. त्यातलेच 'सोनं आणि लिंबू!' दोन्हीही पिवळेच! त्यांचे स्थान आणि महत्त्व वेगळं आहे. लिंबू सामान्य फळ तर सोनं मौल्यवान धातू! आध्यात्मिकदृष्ट्या विचार केला तर लिंबू नकारात्मक ऊर्जा शोषते म्हणजे ते सकारात्मकतेला वाव देते. दुसरीकडे सोनेही सकारात्मकचे प्रतीक! लिंबू चोरी जातात आणि सोन्यावर तर कायम चोरट्यांची नजरच असते. पण, जी टीका लिंबाचे भाव वाढल्यानंतर करण्यात आली ती सोन्याचे दर लाखाच्या घरात गेल्यावर झाली नाही. कारण ते शेतकरी पिकवतात. सोनं श्रीमंतांच्या घरात आणि गळ्यात असतं. लिंबाचे दर फक्त उन्हाळ्यात दोन-चार रुपयांनी वाढतात. सोन्याचे दर एक वर्षात जवळपास १९ हजारांनी वाढले. बोंब मात्र लिंबाचे दर वाढल्याची... 'श्रीमंताच्या घरचे श्वान त्याला सर्व देती मान' असेच काहीसे आहे नाही का...!

९८८१९०३७६५

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# फडणवीस सरकारची ताकद वाढली

राजकारणात काहीही घडू शकतं. 'जहाँ नहीं चैना, वहा नहीं रहना' असे अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी सहा महिन्यांपूर्वी आपल्याच पक्षप्रमुखाला सुनावले होते. त्याच भुजबळांनी आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारमध्ये मंत्रिपदाची शपथ घेतली. राजकारण किती प्रवाही असतं याचा साक्षात्कार जनतेला पुन्हा एकदा झाला. महायुती सरकारच्या विस्तारात मंत्रिपद नाकारल्याने भुजबळ प्रचंड नाराज झाले होते. ही नाराजी त्यांनी लपवलीही नव्हती. थेट अजितदादांना टार्गेट केले होते. 'मी यांच्या हातचे खेळणे नाही' अशा शब्दात भुजबळांनी आपल्या संतापाला वाट मोकळी करून दिली होती. नागपूरचे विधानसभा अधिवेशन सोडून ते परतले होते. त्यानंतर भुजबळ पक्षात फारसे सक्रिय नव्हते. भुजबळ भाजपाच्या वाटेवर असल्याची चर्चा जोरात होती. गेल्या १० वर्षांत काँग्रेस आणि इतर अनेक पक्षांच्या नेत्यांनी भाजपामध्ये आश्रय शोधला आहे. भुजबळही भाजपामध्ये दिसतील, असं अनेकांना वाटत होते. खासकरून या संघर्षाच्या काळात फडणवीस यांनी ज्या पद्धतीने भुजबळांना सांभाळलं, ते प्रत्येक राजकीय पक्षाने अभ्यास करण्यासारखे आहे. अजितदादांना धनंजय मुंडे यांचे बीडचे राजकारण सांभाळायचे होते. त्यापायी दादांनी मुंडे यांची खूप मस्ती सोसली. मात्र मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर मराठवाड्यात विशेषतः मराठा समाजात उसळलेला असंतोष अजितदादांना रोखता आला नाही. मुख्यमंत्र्यांनी मुंडेंचा राजीनामा घेतला. रिकाम्या झालेल्या त्या जागेवर राष्ट्रवादीने भुजबळांना संधी दिली. 'शेवट गोड झाला' अशा शब्दात भुजबळांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. अजितदादा आणि भुजबळ यांच्यातला दुरावा कमी करण्यासाठी खुद्द फडणवीसांनी पुढाकार घेतला होता, हे लपून राहिलेले नाही. अजितदादा, त्यांच्याशी पंगा घेणाऱ्या कोणाला माफ करीत नाहीत. पण भुजबळांच्या बाबतीत त्यांचा नाईलाज झाला असावा. समोर निवडणुका आहेत. ७७ वर्षे वयाचे भुजबळ हे या सरकारमधले सर्वात ज्येष्ठ नेते आहेत. त्यांच्या खालोखाल गणेश नाईक हे ७३ वर्षांचे आहेत. भुजबळांसारखा मातब्बर तसेच आक्रमक ओबीसी चेहरा मंत्रिमंडळात दाखल झाल्याने फडणवीस सरकारची ताकद नक्कीच वाढली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लवकरच व्हायच्या निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर महायुतीच्या नेतृत्वाला आणखी धार आली आहे.

राज्यात एकूण ४० मंत्री घेऊ शकतात. त्या हिशोबाने मंत्रिमंडळातील आणखी एक जागा रिकामी आहे. भाजपाच्या वाट्याला असलेले हे मंत्रिपद कोणाला जाते की तसेच रिकामे ठेवले जाते, याची उत्सुकता आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासाठी ते राखून ठेवल्याची जुनी चर्चा आहे. पण तसे व्हायचे तर तो मोठा भूकंप असेल. राज्याचे



राजकारणच उलटेपालटे होईल. त्याची सुरुवात झाली आहे. पत्ते कसे पडतात ते पाहायचे. महाराष्ट्राच्या राजकारणात खूप मोठ्या उलथापालथी पाहायला मिळू शकतात. एकट्या भुजबळांनाच का घेतले? केवळ एकासाठी एवढा तामझाम का केला, असा प्रश्न अनेकांना पडू शकतो. भुजबळांना घेतले नसते तर फडणवीस सरकार चालले नसते अशातला भाग नव्हता. मग नक्कीच काही खास कारण असावे. भुजबळांना डच्चू दिला होता तेव्हा नव्यांना संधी द्यायची आहे, असे सांगितले गेले. सहा महिन्यांपूर्वी म्हातारे झालेले भुजबळ आज दादांसाठी एकदम तरणेबांड कसे झाले? याचेच नाव राजकारण आहे. शिर्डीचे साईबाबा दोन गोष्टी सांगून गेले. पहिली म्हणजे श्रद्धा आणि दुसरी सबुरी; ज्यांना या दोन गोष्टी साधता आल्या ते आयुष्यात पुढे गेले आहेत. दिवंगत मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे उदाहरण आहे. दोन-दोन निवडणुका हरल्याने विलासराव संपल्यात जमा झाले होते. १९९९ ची गोष्ट आहे. काँग्रेसला सत्ता मिळणार नाही, अशी हवा होती. त्यामुळे विलासरावांना विरोधी नेता जाहीर करून काँग्रेस मोकळी झाली होती. पण पुढे हवाच बदलली. परिस्थितीने विलासरावांना मुख्यमंत्री बनवले. देवेंद्र फडणवीस यांचे उदाहरण तर ताजे आहे. भाजपा-शिवसेना युतीने मिळून निवडणुका लढवल्या. निकालानंतर उद्धव ठाकरे यांनी दगा दिला. निवडणूक जिंकूनसुद्धा फडणवीस यांना विरोधी बाकांवर बसावे लागले. त्या काळात 'सबुरी' म्हणजे संयम राखण्याचा फायदा फडणवीसांना आज मिळतो आहे. तावातावात भुजबळांनी अजितदादांना सोडले असते तर आज धनंजय मुंडे यांच्या रिकाम्या जागी दुसरे कोणी असते. भुजबळ सोबत असण्याचे अनेक सुप्त फायदे आहेत. 'जेल रिटर्न' आहेत म्हणून भुजबळांची उपयोगिता संपत नाही. फडणवीसांनी ते हेरले. त्याला कारणं आहेत. पहिली गोष्ट म्हणजे भुजबळांना लढायला आवडते. एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाचा मोठा झंझावात उभा केला तेव्हा भुजबळांनीच त्यांना अंगावर घेतले होते. त्या काळात शिंदे मुख्यमंत्री असले, तरी जरांगे यांचे टार्गेट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. जरांगे यांच्या 'अरे'ला भुजबळांनी 'कारे' केले. त्यातून फडणवीस यांच्याशी भुजबळांची जवळीक वाढली. ओबीसी ध्रुवीकरणासाठीही फायदा झाला. नव्या हवेतही भुजबळ सोबत हवेत यासाठी फडणवीस विशेष आग्रही होते. पण अजितदादांनी धनंजय मुंडे यांना उचलले. मुंडे यांना त्यांच्याच माणसाने म्हणजे वाल्मीक कराड याने गिळले. अनेक नेत्यांना हा धडा आहे. कुणी 'वाल्मीक कराड' बंदोबस्ताला ठेवले असतील तर लगेच त्याला मोकळे करा. नाहीतर तुमचा 'मुंडे' ठरला आहे. फडणवीसांना मराठ्यांच्या आंदोलनाशी पुन्हा एकदा सामोरे जावे लागू शकते. भुजबळ आल्याने मराठा विरुद्ध ओबीसी हा वाद नव्याने भडकणार आहे. जरांगे पाटील नव्याने हल्लाबोल करणार आहेत. अशा वेळी जरांगे यांना रोखायला भुजबळ हा मोठा चेहरा असेल. पावसाळ्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागू शकतात. केंद्र सरकारने जातीय जनगणना करायचे योजिले आहे. अशा वातावरणात ओबीसी व्होट बँकेसाठी प्रतिष्ठेची लढाई राहणार आहे.

जे व्हायचेच नाही त्या गोष्टींवर आपल्याकडे खूप चर्चा होते. ठाकरे बंधू एकत्र येणार का? पवार ताई-बंधू एकत्र येणार का? हे असेच नेहमीचे प्रश्न आहेत. राज ठाकरेंनी २५ वर्षांपूर्वी शिवसेना सोडली. त्या नंतरच्या काळात अनेकदा राज आणि उद्धव यांच्या एकत्र येण्याच्या चर्चा झाल्या. ज्या कारणासाठी हे दोन भाऊ वेगळे झाले त्याच कारणासाठी ते एकत्र येणार नाहीत. पण मीडियाला तसली चर्चा चघळायला आवडते. तोच मामला पवार काका-पुतण्या यांच्या एकत्र येण्याचा. 'तो निर्णय सुप्रियाने घ्यायचा आहे' असे शरद पवारांनी नुकतेच एक वक्तव्य केले. सुप्रियाला निर्णय घेऊ देत नाहीत म्हणूनच तर पुतण्या काकाचा पक्ष फोडून बाहेर पडला होता. लोकांना हे सारं ठाऊक आहे. तरीही मीडिया ते सारखं वाजवते. लोक कंटाळले आहेत. पवार किंवा ठाकरे एकत्र आले नाहीत तर जग थोडेच बुडणार आहे? तरीही पवार तसेच ठाकरे कुटुंबाला चर्चेत खेचले जाते. काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ल्यानंतर तर शरद पवारांनी भूमिका एकदम बदलली आहे. उद्धव ठाकरेही नरमले आहेत. पाकिस्तानचा दहशतवादी बुरखा फाडण्यासाठी भारताने विदेशात शिष्टमंडळं पाठवायचे योजिले आहे. एका शिष्टमंडळाचे आपल्यालाही प्रमुख बनवले जाईल, अशी आशा उद्धव ठाकरे यांचे हनुमान खासदार संजय राऊत यांना होती. पण उद्धव यांनी त्यांच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी यांचे नाव सुचवले. त्यामुळे संजय राऊत तोंडावर आपटले आहेत.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## डॉ. जयंत नारळीकरांना श्रद्धांजली

सुप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ व विज्ञानकथा लेखक पद्मविभूषण डॉ. जयंत नारळीकर यांच्या निधनाची बातमी धक्कादायक आहे. त्यांच्याशी संबंध आला तो विज्ञानकथा लेखक या नात्याने. 'यक्षांची देणगी' हा त्यांचा राज्य पुरस्कार प्राप्त विज्ञान कथासंग्रह अतिशय रंजक आहे. हॉयल-नारळीकर सिद्धांतामुळे डॉ. नारळीकर प्रसिद्धीच्या झोतात आले. त्याच सुमारास नागपूर विद्यापीठाच्या फिजिक्स डिपार्टमेंटमध्ये त्यांचे एक व्याख्यान होते. तेव्हा आम्ही दुसऱ्या विभागात पदव्युत्तर विद्यार्थी होतो. त्यांना केवळ पाहण्यासाठी त्या व्याख्यानाला जाऊन बसलो. विषय कळण्याचा काही संबंधच नव्हता. पुढे मराठी विज्ञान परिषद नागपूरने त्यांच्या वार्षिकोत्सवात डॉ. नारळीकरांना आमंत्रित केले होते. इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समधल्या त्यांच्या व्याख्यानाला प्रचंड गर्दी झाली होती. 'यक्षांची देणगी' ही विज्ञानकथा डॉ. नारळीकरांनी टोपण नावाने एका कथा स्पर्धेत दिली होती. या कथेला प्रथम पुरस्कार मिळाला, ती किर्लोस्कर मासिकात प्रसिद्ध झाली व नारळीकरांना एक विज्ञानकथा लेखक म्हणून लोकप्रियता मिळाली. पुढे त्यांनी धोंड, कृष्णमेघ यासारख्या अनेक विज्ञानकथा लिहिल्या. 'वामन परत न आला' ही त्यांची विज्ञान कादंबरी चांगलीच लोकप्रिय झाली होती. डॉ. नारळीकर यांच्या निधनाने आंतरराष्ट्रीय कीर्तीचा खगोलशास्त्रज्ञ, श्रेष्ठ वैज्ञानिक व अतिशय लोकप्रिय विज्ञान कथाकार काळाच्या पडद्याआड गेला आहे. या थोर शास्त्रज्ञाला विनम्र श्रद्धांजली.

**विश्वेश्वर सावदेकर**/नागपूर

●● ●●

## वाचक पत्रे

### पाण्याचा अपव्यय टाळा

गेल्या काही वर्षांत वातावरणीय बदलामुळे पाऊस लहरी झाला आहे. त्यामुळे राज्याला पाणीपुरवठा करणाऱ्या धरण क्षेत्रातही पावसाचे आगमन उशिरा होते आणि जनतेला पावसाच्या मोसमात पाणी कपातीला सामोरे जावे लागते. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत आणिबाणी स्थिती निर्माण झाली तर त्याची ओरड होते. नळाला पाणी आले, काम झाले, तर नळ बंद करणे हा प्रकार होत असतो. पाण्याचा अपव्यय टाळणे हे तुम्हा-आम्हा सर्वांच्या हातात असते. मात्र, पाणी वाया घालवणे हा आपल्या सवयीचा जणू भागच झाला आहे. पाणी हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे. भविष्यात रोजच्या पाणीपुरवठ्याच्या मागणीत प्रचंड वाढ होण्याचे संकेत वाढत्या लोकसंख्येमुळे मिळू लागले आहेत. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळत पाण्याची टंचाई निर्माण होणार नाही. समुद्राचे पाणी गोडे करणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पिण्यायोग्य उपलब्ध करणे यासाठी पालिका प्रशासनाने नियोजनबद्ध प्रयत्न केले तर भविष्यात पाणीबाणी परिस्थिती निर्माण होणार नाही. एप्रिल-मे महिन्यात तर ग्रामीण भागातील लोकांना पाण्यासाठी मोठी पायपीट करावी लागते. प्रत्येकाच्या घरात पिण्याच्या पाण्याचे थेट नळ कनेक्शन व्हावे म्हणून केंद्राने सुरू केलेल्या जल जीवन मिशन योजनेंतर्गत अनेक जिल्ह्यांत, तालुक्यात कामे अतिशय संथ गतीने सुरू आहेत. जल जीवन मिशन या योजनेसाठी महाराष्ट्र राज्य सरकारने कोट्यवधी रुपये खर्च केले. मात्र, केंद्र सरकारने सुरू केलेल्या या महत्त्वाकांक्षी योजनेला महाराष्ट्रातील तालुक्यात घरघर लागली आहे. त्यामुळे पाणी हे जीवन असून पाण्याची चोरी म्हणजे जनतेच्या सहनशीलतेचा उद्रेक होणार आणि याला तुम्ही-आम्ही सगळेच जबाबदार असणार. गेल्या दोन दशकांपूर्वी एखाद्याच्या लग्नकार्यात हवा तसा पैसा खर्च केला, तर त्यावेळी लाईक म्हणत, असे काय पाण्यासारखा पैसा खर्च केला. याचा अर्थ त्यावेळी पाण्याला फारसे महत्त्व दिले जात नसावे; मात्र आजच्या घडीला राज्यातील विविध भागात पिण्याच्या पाण्याची भयंकर टंचाई जाणवू लागली आहे.

**मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

●● ●●

### नियोजनाचा अभाव की सुजलेली शहरे?

शहरांच्या विस्ताराच्या नादी लागलेली आपली शहरे आज पर्यावरणाच्या आणि नियोजनाच्या दुहेरी संकटात अडकली आहेत. याचे जिवंत उदाहरण म्हणजे नद्यांच्या पूर रेषेत बांधले गेलेले बंगले, अपार्टमेंट्स आणि उच्चभ्रू वसाहती जे आज एका पावसात जमीनदोस्त होत आहेत. अनेक राज्यांतील महत्त्वाच्या शहरांमध्ये वाढत्या शहरीकरणामुळे नद्यांची पात्रे आकुंचन पावत गेली. पररेषा म्हणजे नदीच्या नैसर्गिक प्रवाहासाठी राखून ठेवलेली जागा. मात्र, बिल्डर-राजकारणी-प्रशासन या त्रिकुटाच्या गाठोड्यात ही जागा 'सोन्याची खाणी' ठरली. या क्षेत्रांमध्ये मोठमोठे बंगले आणि प्रकल्प उभे राहिले. पावसाळ्यात पुराचे पाणी थेट या वसाहतींत घुसते. नुकत्याच आलेल्या मुसळधार पावसात अनेक शहरांमध्ये पूररेषेतील घरांचे मोठे नुकसान झाले. काही ठिकाणी स्थानिक प्रशासनाने अशा घरांवर कारवाई करत ती जमीनदोस्त केली, पण हा उपाय उशिरा आणि अपुरा वाटतो. हा केवळ बांधकाम व्यावसायिकांचा वा घरमालकांचा प्रश्न नाही ही एक व्यापक शहरी नियोजनाची चूक आहे. नागरिकांनी घर घेताना थोडे अधिक सजग राहणे गरजेचे आहे, पण त्याहून अधिक गरज आहे ती स्थानिक प्रशासनाने नियमांचे कडक पालन करण्याची.आज पूररेषेतील बंगले जमीनदोस्त करण्याची वेळ आली, ती केवळ निसर्गाच्या रौद्र रूपामुळे नाही, तर मानवी बेफिकिरीमुळे. आपण जर आजही शहाणपण शिकलो नाही, तर उद्याचे शहर हे अपयशी नियोजनाचा स्मारक बनून राहील.

**सागर पिंगळे**/७७५६८३६०९१

●● ●●

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

बेटर हाफ

सोनाली ठेंगडी / ७७५५९३८८२२

# व्ही. शांतारामांचे जावई... पंडित जसराज!



आपल्याला सेलिब्रिटींमधील जवळच्या नात्यांचा बरेचदा अंदाज नसतो. त्याविषयी माहिती नसते. मात्र, अनेक मान्यवरांचं आपसात नातं असतं. असंच एक नातं म्हणजे पंडित जसराज आणि व्ही. शांताराम. बहुतांश लोकांना हे माहिती नसावे की आपल्या जमान्यातील गाजलेले फिल्ममेकर व्ही. शांताराम हे पंडित जसराज यांचे सासरे होते. आज दोघेही हयात नाहीत. मात्र, त्यांचे आपआपल्या क्षेत्रातील योगदान नक्कीच अतुलनीय असे आहे.

पंडित जसराज यांचे जीवन अनेक उतार-चढावांनी भरलेले होते. बालपणही साधारण नव्हते. जसराज यांना जन्मानंतर लगेचच वडील पंडित मोतीराम यांनी सहद चाटवले होते. त्याकाळी बरीच मुले व्हायचे. जसराज यांच्या मातोश्रींनी कृष्णाबाईंनी सांगितले की, आमच्या अपत्यांपैकी केवळ जसराजलाच सहद चाटवण्यात आले. कदाचित यामुळेच त्याचा आवाज चांगला तयार झाला असावा. हरयाणातील हिसार येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील पट्टीचे गायक होते. ते ठिकठिकाणी गाण्याचे कार्यक्रम करायचे. गावापासून रेल्वे स्टेशन जवळपास १२ किलोमीटर अंतरावर होते. एकदा पंडित मोतीराम कुठेतरी कार्यक्रम आटोपून घरी परतत होते. गाव लांब असल्याने ते उंटावरून आले. त्यांचे कपडे अगदी स्वच्छ, नीटनेटके होते. त्यांनी पाहिले की जवळच मैदानात बरीच मुले खेळत आहेत. त्यांतील एका मुलाकडे बोट दाखवून त्यांनी विचारले की, हा कोणाचा मुलगा आहे? त्यावर उत्तर मिळाले की, हा तुमचाच मुलगा आहे. त्यावेळी धुळीने माखलेल्या त्या चिमुकल्याला पाहून त्यांच्यातील पिता भावूक झाला आणि त्यांनी त्याला कडेवर उचलून पायी चालत घरी आले. जसराज हे नवव्या क्रमांकाचे अपत्य होते. वडिलांच्या तालमीत तयार झाले आणि ख्यातकीर्त शास्त्रीय गायक बनले.

पंडित जसराज यांनी वयाच्या ९० व्या वर्षी न्यू जर्सी अमेरिका येथे अखेरचा श्वास घेतला. जसराज यांनी हिंदी चित्रपटसृष्टीसाठी पहिले आणि एकूलते एक रोमँटिक गाणे वयाच्या ७८ व्या वर्षी गायले होते. चित्रपट होता '१९२०' आणि गाणे होते 'वादा तुमसे है वादा'.... या चित्रपटाचे दिग्दर्शक विक्रम भट्ट होते. याचे संगीत अदनान सामीने दिले होते. असे असले तरी पंडित जसराज यांचे सिनेसृष्टीसोबत अतिशय जवळचे नाते होते. आधी सांगितल्याप्रमाणे व्ही. शांताराम यांचे ते जावई होते.

व्ही. शांताराम यांच्या कन्या मधुरा यांचा जन्म १९३७ मध्ये झाला. व्ही. शांताराम हे त्या काळात सिनेसृष्टीतील फार मोठे प्रस्थ होते. त्यांचे कार्य फार मोठे होते. ते स्वत:देखील उत्तम कलाकार होते. आपल्या चित्रपटात नवनवीन प्रयोग करण्यासाठी ते ख्यात होते. त्यांनी आपल्या चित्रपटात शास्त्रीय गायन आणि नृत्यांचा यशस्वी प्रयोग केला. आपल्या मुलांमध्येही त्यांनी कोणत्या ना कोणत्या कलेविषयी जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

मधुराने १९५२ पासूनच गाणे शिकण्यास सुरुवात केली होती. गुरू विपीन सिंह यांच्याकडून मणिपुरी आणि भरतनाट्यम शिकल्यानंतर 'झनक झनक पायल बाजे' तयार होताना त्यांनी गोपीकिशन यांच्याकडून कत्थकचेही धडे गिरवले. कलाक्षेत्रात असल्याने त्यांची ओळख पंडित जसराज यांच्यासोबत झाली होती. त्या काळात पत्रानेच संवाद साधण्याची पद्धत होती. १९६० च्या दरम्यान पंडित जसराज आणि मधुरा यांच्यात पत्रव्यवहार सुरू झाला. पंडितजींची भाची सांगते की, मी त्यांच्या वतीने पत्र लिहायची. मात्र, त्यावर स्वाक्षरी 'चाचाजी' म्हणजे पंडित जसराज करत असायचे. अर्थात, हे पत्र अतिशय छोटे आणि खूपच औपचारिक स्वरूपाचे असायचे. त्या काळातील प्रेमही फार संयमित आणि मर्यादेच्या कक्षेतील होते. कधीही त्यात उत्तानपणा, बेपर्वाई दिसून येत नाही. या पत्रात मजूक एवढाच असायचा की तुमचा रियाज कसा सुरू आहे, मी अमूक तारखेला येणार आहे. एकदा मधुरा यांनी एका भेटीत पंडितजींना आपले गाणे ऐकवले आणि त्यांना ते खूप आवडले. शांताराम यांनाही जसराज आवडले होते. हळुहळू व्ही. शांताराम यांना लक्षात आले की, मधुराचा जीव जसराज यांच्यात अडकला आहे. त्यावेळी शांतारामांचा चित्रपट 'स्त्री' पूर्ण होण्याच्या बेतात होता. त्यांनी विचार केला की, मधुराचा मुद्दा निकालात काढणे गरजेचे आहे. मात्र, पहिले 'स्त्री' प्रदर्शित करूया आणि त्यानंतरच या विषयाकडे लक्ष देऊया. मधुरा 'स्त्री' च्या रिलीजसाठी छोटी बहीण चारूशीलासोबत कोलकात्याला गेली होती.

चित्रपटाचा गड सर झाल्यानंतर व्ही. शांताराम यांनी मनाशी ठरवल्याप्रमाणे मधुरा आणि जसराज यांच्या विषयाकडे लक्ष दिले. प्रथम त्यांनी मनाशी पक्के केले होते की, जसराजसोबत आपल्या मुलीचे लग्न लावणार नाही. कारण त्यांना वाटायचे की जसराजचे पहिले लग्न झाले आहे. हा गैरसमज दूर झाल्यानंतर त्यांनी मुलाला भेटायला बोलावले. त्यांनी बाप म्हणून पहिला प्रश्न जसराज यांना विचारला की, तुमची मिळकत किती आहे? तेव्हा जसराज यांनी उत्तर दिले की, महिन्याला २०० ते ३०० रुपये कमावतो. त्या काळात २००-३०० रुपये खूप जास्त रक्कम होती. एकदा विषय समोर आल्यानंतर मधुराने आपल्या वडिलांना ठणकावून सांगितले की, मी लग्न यांच्याशीच करणार आहे, नाहीतर लग्नच करणार नाही.

व्ही. शांताराम फार मोठे निर्माता-दिग्दर्शक होते. त्यांना वाटले की, मुलगा पंजाबी आहे. त्यावेळी हरयाणा पंजाबचा भाग होता. कमाईचा आकडा कळल्यानंतर विचारले की, हा आकडा वाढेल का? त्यावर जसराज यांनी मोठे चमत्कारिक उत्तर दिले की, वाढेल का माहिती नाही पण, कमी होऊ शकतो. एरवी दुसरा तरुण राहिला असता तर त्याने जरा बढाई मारली असती आणि मुलीचा अन्य कोणी सामान्य बाप राहिला असता तर या वाक्यावर मुलाला हाकलून लावले असते. मात्र, तो तरुण पंडित जसराज होते आणि मुलीचे वडीलही कोणी साधारण व्यक्ती नाही तर व्ही. शांताराम होते. म्हणूनच त्यांना हे प्रामाणिक उत्तर आवडले आणि त्यांनी दोघांचे साक्षगंध उरकले. ही घटना १९६२ च्या सुमारास घडली होती.

१९ मार्च १९६२ रोजी मधुरा शांतारामची मधुरा जसराज बनली. व्ही. शांतारामांच्या मुलीचे लग्न ज्या धडाक्यात होणे अपेक्षित होते तितक्याच धडाक्यात झाले. असे सांगतात की, शांताराम यांच्याकडे त्या काळात एक हत्ती होता. हा हत्ती यांनी 'नवरंग' चित्रपटातही वापरला होता. गाणे होते 'अरे जा रे हट नटखट'.... या गाण्याचे चित्रीकरण त्याच हत्तीवर झाले होते. मधुरा-जसराजच्या विवाह समारंभात पाहुण्यांच्या स्वागतासाठी हा हत्ती सजवून प्रवेशद्वाराजवळ उभा करण्यात आला होता.

## मधुरा जसराज यांचे करिअर

मधुरा जसराज एक लेखिका, दिग्दर्शिका आणि नृत्य दिग्दर्शनासाठी ख्यात होत्या. त्यांनी अनेक प्रोजेक्ट्समध्ये काम केले. त्यांनी आपले पती पंडित जसराज यांच्यावर आधारित पुस्तकही लिहिले, ज्यात त्यांनी पंडितजींच्या करिअरचा अद्भुत प्रवास वर्णन केला. याशिवाय त्यांनी आपले पिता व्ही. शांताराम यांच्यावरही दोन पुस्तके लिहिली. त्यापैकी एक मराठीत 'शांताराम' नावाने तर दुसरे इंग्रजीत 'शांताराम: द मॅन हू चेंज्ड इंडियन सिनेमा' याचा समावेश होता. हे भारतीय सिनेजगतातील मधुरा यांचे मोठे योगदानच म्हणावे लागेल. ज्यांचे वडील इतके महान आणि पतीही तितक्याच तोडीचे कलावंत होते त्यांचे जीवन किती अद्भुत असेल, याची आपण कल्पनाही करू शकत नाही. आपल्या जीवनातील या दोन महत्त्वाच्या विभूतींवर लिहिण्यासाठी तितक्याच मोठ्या प्रतिभेची गरज लागते. ती प्रतिभा मधुरा यांच्या ठायी होती. त्यामुळेच त्या तितक्याच तेज:पूंज असाव्यात, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. पंडितजींच्या जीवनातही अनेक चढ-उतार आले. मात्र, मधुरा यांनी प्रेमाचा धागा शेवटपर्यंत तुटू दिला नाही. ते प्रेम कायम राहिले. ज्या निर्धाराने त्यांनी लग्न केले त्याच जाणीव आणि निष्ठेने ते निभावलेसुद्धा.... त्यांनी कदाचित एकमेकांसाठी म्हटले असेल.....

*मुझे तेरा साथ जिंदगी भर नही चाहिए*
*बल्कि जब तक तुम साथ हो*
*तब तक ही जिंदगी चाहिए.....*

# चौफुलीवरचा मामा...!

'**यांना विचारू या !**' रस्त्याच्या चौफुलीवर एक गुरुशर्ट पायजमा घातलेलं व्यक्तिमत्व उभं होतं. आमची गाडी त्यांच्याजवळ जाऊन थांबली.

'शिळफाटा कुठे येईल? जरा सांगता का?'

'वा...वा ! का नाही? असं जायचं...तसं जायचं...डावीकडे, उजवीकडे मग सरळ!' प्रवासात सगळ्यांचेच मेंदू जरा जास्त काम करतात कारण मागच्यांना काहीच काम नसते. जास्त चर्चा, जास्त गोंधळ! बऱ्यच जणांनी संवादात भाग घेतल्यामुळे, शिळफाटा कोणालाच कळला नव्हता. प्रत्येकाच्या डोक्यात एक शीळफाटा, तोपर्यंत उभाही झाला होता. 'मीही तिकडे चाललो आहे. येऊ का तुमच्या गाडीत जागा असेल तर?' आणि आम्हाला सगळ्यांना आनंद झाला. आपल्या गाडीत आम्ही त्यांना बसवून घेतलं. आरशातून त्यांना अधून मधून न्याहाळत होतो. इतक्या वेळचं एक चक्र डोक्यात चाललं होतं. पांढरा पायजामा, गुरु शर्ट, डोक्यावरील अर्धा बगीचा साफ, फक्त झालर उरलेली! कपाळाची ठेवण, उंची, प्रसन्नपणे बोलणं! मी कुठेतरी हरवलो होतो. विदर्भातील पाहुण्यांना मुंबईत पत्ता सापडला की, फार आनंद होतो. आता गूगलबाई मदतीला येत असल्यामुळे हे आनंद जरा कमी झालेत. गाडीमध्ये दिलखुलास गप्पा सुरू झाल्या. बसल्या बसल्याच मी त्यांना म्हणालो,'तुम्ही मला बिलकुल माझ्या मामासारखे दिसता.' 'क्या बात है ! मामाच समजा की हो मग!' जोरदार हास्याची करंजी गाडीत उडाली आणि टाळीसाठी मामाचा हात माझ्यासमोर आला. मामाचं नातं क्षणात पक्कं झालं आणि विचारचक्र सुरू झालं. शिळफाटा येतात प्रसन्न व्यक्तिमत्व उतरून, नाव-पत्ता देऊन निरोप घेतं झालं. जेमतेम अर्ध्या तासाचा प्रवास! गोरेगावला राहात असणारा मामा आयुष्याच्या शेवटी कल्याणमध्ये रहायला आला होता. मामा आज हयात नव्हता पण, त्याच्या घरीच भेटायला आम्ही चाललो होतो. मामा स्वभावाने खूपच मिष्कील होता. लिखाण आणि काव्यही छान करायचा. मामाच्या आठवणीत मी ही गुंतून गेलो. दरवर्षी उन्हाळ्यात कोळशाच्या इंजिनची रेल्वे गाडी आम्हाला मुंबईला घेऊन जायची. नागमोडी वळणे घेत गाडी जायची तेव्हा, बाहेर पाहण्याचा मोह आवरायचा नाही. डोळ्यात कोळशाचे बारीक तुकडे जाऊन डोळे चुरचुरायचे?. इगतपुरीचं निसर्गसौंदर्य पाहताना आम्ही भावंड तल्लीन होऊन जायचो. बोगदा येताना दिसल्यावर भन्नाट मजा येत होती. त्याकाळी, रेल्वे ही खूप लवकर पोहोचण्याची घाई करत नव्हती. प्रवासाचा, खाण्याचा पूर्ण आनंद घेत मजेदार प्रवास असायचा. एकदाचा प्रवास संपून आम्ही मामाच्या घरी गोरेगावला पोहोचत होतो. आजीची भेट व्हायची. प्रेमाने डोक्यावरून हात फिरवून विचारपूस व्हायची. मामा-मामी, त्यांची मुले...काय भन्नाट सुट्टी निघून जायची. मामा गोरेगावला डेअरीत नोकरीवर होता. आजूबाजूला म्हशींचे मोठे मोठे गोठे होते. गवताची मोठी कुरणं होती. दुधाच्या बाटलीतून थंडगार दूध सर्वत्र फिरत होते. ती बाटली, तिचा थंडगार स्पर्श अजून आठवणीत आहे. मामा डेअरीत असल्यामुळे आरे डेअरी पाहण्याचा योग हमखास यायचा.



बाबा देशपांडे/९४२३६१३२२६

खेळायला कॉलनीत भरपूर मुलं असायची. जिकडे तिकडे गवत आणि मधूनच सर्पदर्शन व्हायचे. रात्री फार भीती वाटायची. सार्वजनिक संडास तर चाळीपासून बरेच दूर होते. रात्री बे रात्री तिकडे जाणे दिव्यच असायचे. गवतातील अरुंद पायवाट, सर्वत्र अंधार! काय बिशाद होती रात्री पोट बिघडायची. भीतीपोटीच सर्वांना सर्व सहन करायला लागायचं. नाईलाजाने एखाद्या वेळेला रात्रीचा कंदील व सोबत घेतल्याशिवाय काही खरं नव्हतं. एवढीच फक्त एक गोष्ट तिथे नावडणारी होती.

आई आणि मामाचे संवाद मोठे प्रेमाचे राहत. पत्रांच्या देवाण-घेवाणीवर सगळं जग चालत होतं. मुंबईत राहून मामा जरा डाव्या विचारसरणीचा झाला होता. एकदा सहज मामासोबत फिरताना त्याने गवताचा मोठा साठा उगीचच पेटवून दिल्याचे मला छान आठवते आणि आता त्याचे कारणही कळते?. आई मात्र वडिलांसोबत कट्टर संघ विचाराची होती. त्यांच्या संवादामध्ये थोडा बहुत आनंद काही समजत नसल्यामुळे मी ही घेत होतो. यवतमाळातील टांग्यातले पाहुणे काळ्या-पिवळ्या पद्मिनी गाडीत हँगिंग गार्डन, राणीचा बाग पहात मजेत फिरायचे. विविध प्रकारच्या गाड्या पाहताना आम्ही भावंडं हरवून जायचो.

'ई है मुंबई नगरिया, तू देख बबुवा!' हे गाणं जेव्हा अमिताभ पिक्चरमध्ये म्हणायचा तेव्हा हे नातं छान उफाळून यायचं. मुंबईची मायानगरी ही ओळख कधीचीच आहे. पण, माझ्यासाठी ते आहे माझ्या मामाचं गाव! काळाच्या ओघात सगळे जण निघून गेलेत. भिंतीवरले त्यांचे फोटो सगळ्या आठवणी व्यक्तिगतरीत्या उभ्या करतात. कुणाला त्याबद्दल काही सांगता येत नाही. सांगण्याचा विषयही नाही. एखादे वेळेला मामासारखे दिलखुलास व्यक्तिमत्व पुन्हा दिसेल. मामा तसाच मनात जागा होईल, माझ्या पुरता...!



# केलाडी राणी चेन्नम्मा

शुभांगी गान/८६५७४२४०७१

एक कहाणी शूर वीरांगनेची जी इतिहासात केलाडी राणी चेन्नम्मा या नावाने प्रसिद्ध आहे. कर्नाटक राज्याच्या अनेक वीरांगना त्यांच्या शौर्य, प्रशासन, सुव्यवस्था आणि पराक्रमासाठी प्रसिद्ध आहेत. त्यापैकी राणी चेन्नम्मा एक! कित्तूरची राणी चेन्नम्मा आणि केलाडी राणी चेन्नम्मा! पण या दोघींच्या प्रशासनिक काळात जवळपास १०० वर्षांचे अंतर आहे. आज जिच्या संघर्षाची, पराक्रमाची गाथा सांगणार आहे, ती केलाडी राणी चेन्नम्मा किंवा केळदी संस्थानची राणी चेन्नम्मा!

कर्नाटक राज्याच्या शिमोगा जिल्ह्यातील केळदी संस्थानची ती राणी होती. नायक घराण्याची विजय पताका तिने पतीच्या निधनानंतरही अखंड फडकत ठेवली. केलाडी साम्राज्य हे बेदनूर आणि इक्वेरी या नावानेही ओळखले जाते. विजयनगर साम्राज्याच्या पतनानंतर अनेक छोटी घराणी नावारूपाला आली, त्यातीलच एक हे नायक घराणे! सोमशेखर नायक या राजाने रामेश्वरच्या जत्रेत चेन्नम्माला बघितले आणि तिच्याशी विवाहाचा प्रस्ताव त्याने तिचे पिता आणि सागर जिल्ह्यातील प्रसिद्ध व्यापारी सिद्धप्पा शेट्टार यांच्यासमोर मांडला. कालांतराने त्यांचा विधिवत विवाह झाला आणि चेन्नम्मा केळदी संस्थानची राणी झाली. जात्याच बुद्धिमान असलेल्या चेन्नम्माने विवाहानंतर सर्व अस्त्रशस्त्रविद्या आणि प्रशासनिक कारभारात लक्ष द्यायला सुरुवात केली. कार्यतत्पर असल्याने प्रत्येक क्षेत्रातील तिची प्रगती अतिशय महत्त्वपूर्ण होती. पण, सुखाचे क्षण कमी असतात. अवघ्या दहा वर्षांच्या वैवाहिक जीवनानंतर वर्ष १६७६ मध्ये सोमशेखर नायक एका नृत्यांगनेच्या आणि त्यांच्या विरोधकांच्या दुष्ट कटाचे बळी ठरले. आणि, राणी चेन्नम्मावर संकटाचा डोंगर कोसळला पण, न हरता तिने प्रशासनिक सूत्रं आपल्या हाती घेत, नात्यातील बसप्पा नायक या मुलाला दत्तक घेऊन, राज्यकारभार सांभाळायला सुरुवात केली. सर्वप्रथम तिने राज्यातील विरोधक सरदारांचा बंदोबस्त केला.

पण, एक विधवा राणी आणि राज्याला वारस नसणं ही संधी शेजारी राज्यांना राज्यविस्तारासाठी योग्य वाटली. या संधीचा फायदा घेत, म्हैसूरचा राजा चिक देवराय वडियार यांनी तीन वेळा तिच्यावर आक्रमण केलं. पण, त्यापैकी दोन वेळा तिने अशी मात दिली की, म्हैसूरच्या राजाने शरणागती पत्करत तिच्यासमोर संधी प्रस्ताव मांडला.

खरंतर तिचा पराक्रम परिचीत असतानाही विजापूरच्या सुलतानाने तिच्यावर आक्रमण करण्याची जय्यत तयारी केली. तिला ही वार्ता मिळताच आजवर इतिहासात जे घडलं नव्हतं ते घडलं. बेदनुर ही तिची राजधानी! राजधानीच्या दिशेने बिजापूर सैन्य चालून येत असल्याची वार्ता मिळताच, अल्पावधीत तिने राजधानी दाट जंगलांनी वेढलेल्या भुवनगिरी प्रदेशात स्थलांतरित केली. या जंगलाचा आणि तिच्या छापेमार पद्धतीचा बिजापूर सैन्याला अनुभव नव्हता. त्यामुळे, अफाट सेना असूनही विजापूर सैन्याला पराभव पत्करावा लागला.

वीस वर्षाच्या कारकीर्दीत औरंगजेबाशी दिलेला लढा ही तिच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाची घटना होती. वर्ष १६८९ हे महाराष्ट्र?ासाठी अत्यंत दुर्दैवी ठरलं. औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांचा अतिशय क्रौर्याने वध केला. याचवेळी जुल्फीखार खानाने रायगडला वेढा दिला होता आणि येसूबाईंसह अनेक दरबारी या रायगडावर अडकून पडले होते. अशा स्थितीत महाराणी येसूबाईने राजाराम महाराजांना राज्यावर बसवून त्यांना औरंगजेबाच्या तावडीतून सोडवण्यासाठी कर्नाटकातील जिंजीला रवाना केलं. संन्याशाच्या वेशात कर्नाटकातून जात असताना राजाराम महाराजांना औरंगजेबाच्या भीतीने कोणीही आश्रय दिला नाही. पण, केळदीची राणी चेन्नम्माने आश्रय दिला. राजांची व्यवस्था तिने आरमाने कोप्पा येथे केली. अतिशय गुप्तपणे महाराज तिथे निवास करीत होते. औरंगजेबाचं सैन्य अखंड त्यांचा पाठलाग करीत होतं. रणमस्त खान या सरदाराला राजारामांच्या तिथल्या वास्तव्याची बातमी कळली आणि औरंगजेबाने राणीला एक पत्र पाठवलं. 'राजारामांना आमच्या स्वाधीन करा अन्यथा, युद्धासाठी तयार व्हा.' पण, स्वाभिमानी राणीनं दिलेलं उत्तर खूप महत्त्वाचं होतं. तिने लिहिलं 'ज्याला आम्ही आश्रय दिला, त्याच्यासाठी लढायला आम्ही तत्पर आहोत.' संदेश पोहचण्यापूर्वीच औरंगजेबाच्या सैन्याने केळदीवर आक्रमण केलं पण, केळदीच्या शूर सैन्याने त्यांना मागे हटण्यास भाग पाडलं आणि राजाराम महाराजांना सुटण्याची संधी दिली. राणीने आपलं काही सैन्य देऊन त्यांना जिंजीकडे रवाना केलं. पावसाळा सुरू झाला होता, अशा स्थितीत लढण्यात काही अर्थ नाही, हे औरंगजेबाला जाणवलं आणि त्याने संधीचा प्रस्ताव राणी समोर ठेवला. तिचा पराक्रम आणि शौर्य बघून, तिच्या सैनिकाचे मनोबल बघून औरंगजेब थोडासा भयभीत झाला होता. राजाराम महाराज जिंजीला पोहचल्याची वार्ता मिळाली आणि तिला समाधान वाटलं. शिवाजी महाराजांच्या पुत्राला आपण वाचवू शकलो, ही भावना तिच्यासाठी आनंददायक होती.

**२० वर्षाच्या कारकीर्दीत औरंगजेबाशी दिलेला लढा ही तिच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाची घटना होती. वर्ष १६८९ हे महाराष्ट्र?ासाठी अत्यंत दुर्दैवी ठरलं. औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांचा अतिशय क्रौर्याने वध केला. याचवेळी जुल्फीखार खानाने रायगडला वेढा दिला होता आणि येसूबाईंसह अनेक दरबारी या रायगडावर अडकून पडले होते. अशा स्थितीत महाराणी येसूबाईने राजाराम महाराजांना राज्यावर बसवून त्यांना औरंगजेबाच्या तावडीतून सोडवण्यासाठी कर्नाटकातील जिंजीला रवाना केलं. संन्याशाच्या वेशात कर्नाटकातून जात असताना राजाराम महाराजांना औरंगजेबाच्या भीतीने कोणीही आश्रय दिला नाही. पण, केळदीची राणी चेन्नम्माने आश्रय दिला.**

अशी ही राणी जिने आदिलशाही, कुतुबशाही, मोगल, संस्थानिक आणि अंतर्गत विरोधाला तोंड देत नायकांची गादी नेटाने पुढे चालवली. पोर्तुगीजांशी ती तांदूळ आणि मसाल्यांचा व्यापारही करीत असे. ती पराक्रमी तर होतीच पण, तिने अवलंबलेल्या नीती अत्यंत महत्त्वपूर्ण होत्या. मोगली सैन्यावर विजय मिळवल्याचे प्रतीक म्हणून राणीने केळदीच्या रामेश्वर मंदिराच्या प्रवेशद्वारावर शिवछत्रपतीचे शिल्प कोरून, मंदिरापुढे भला मोठा विजयस्तंभ उभा केला. या स्तंभावर वरच्या बाजूला गणपतीचे चित्र असून त्याखाली असलेल्या चित्रामध्ये स्वतः चेन्नम्मा, त्यांच्या डाव्या बाजूला छत्रपती राजाराम महाराज उभे असून, राणीच्या २ सेविका व राजांच्या बाजूला धर्मदंड घेऊन एक सेवक उभा आहे. राणी चेन्नम्मांच्या ऋणातून उतराई म्हणून बेदनूर येथे राजाराम महाराजांनी पार्वतीचे मंदिर बांधले. छत्रपती शिवाजी महाराजांनी योजलेले स्वराज्य पुढे नेण्यात कन्नड राणी चेन्नम्माने दिलेलं योगदान महाराष्ट? विसरू शकणार नाही, हेही खरंच!

रानभाज्यांच्या जगात

संगीता ठलाल/७८२१८१६४८५

# पोषक लाह्या



गावखेड्यात आजही धानाच्या लाह्यांपासून गोड पुऱ्या बनवितात. या पुऱ्या आरोग्यासाठी पोषक असतात. धानापासून फोडल्या जाणाऱ्या लाह्यांना झाडीबोलीत 'लाया' असे म्हणतात तर प्रमाण मराठीत 'लाह्या' म्हणतात. मका, ज्वारी, बाजरी, इतर धान्यांपासून तयार होणाऱ्या लाह्या सर्वांना माहीतीच आहेत. पण, धानाच्या लाह्या आणि त्याचा सातू व त्याच्या पुऱ्या याविषयी थोडक्यात जाणून घेऊ या. आपल्या झाडीपट्टीत म्हणजेच गडचिरोली, गोंदिया, भंडारा आणि चंद्रपूर या चार जिल्ह्यांत धान म्हणजेच भात जास्त प्रमाणात पिकविला जातो. एवढेच नाही तर, भात जास्त प्रमाणात खाल्लाही जातात. धानाच्या लाह्या फोडण्यासाठी ठोकर धानाचा उपयोग केला जातो. जसं की, एक हजार दहा, लल्लाट, सपरी ही झाडीबोलीतील धानाचं नावं आहेत. त्या लाह्या फोडण्यासाठी शेणाने जागा छान सारवून घेतात. ती जागा सुकल्यावर ठोकर धान पसरवतात.

श्रीकृष्ण जयंतीच्या निमित्ताने, हरितालिका, पोळ्याच्या निमित्ताने गावखेड्यात ५-६ घरी मातीच्या चुलीवर लाह्या फोडण्याचं भांडं मांडतात. त्याला झाडीबोलीत लाह्या फोडण्याचा 'ढोबर' म्हणतात. या ढोबरामध्ये आधी बारीक रेती टाकतात. ती रेती छान तापल्यानंतर त्यात धान टाकून, बांबूच्या बारीक केलेल्या काड्यांची छोटीशी झाडणी तयार करून, तिच्याने खरवडून घेतात. अख्खं ढोबरभर पांढऱ्याशुभ्र लाह्या फुटून निघतात. त्याच लाह्यांमध्ये काही अर्धवट भाजलेले, न फुटलेले धान असतात त्यांना झाडीबोली भाषेत तरे असे म्हणतात. त्या तऱ्यांना लाह्यांतून वेगळे करून उखळात किंवा खलबत्त्यात कांडून घेतात. त्यातून जे तांदूळ निघतात त्या तांदळांचे पीठ कोणी चक्कीतून दळून आणतात तर कोणी जात्यावर दळतात. या पीठाला चाळून घेतात आणि त्यालाच धानाचा सातू असं म्हणतात. आधीच भाजलेल्या धानाचे पीठ असल्याने या सातूचा खमंग सुगंध असतो. हा सातू तुपामध्ये भाजून नंतर गुळाच्या किंवा साखरेच्या पाण्याला चांगली उकळी येऊ देतात. उकळत्या पाकात सातू छान फेटून घेतात आणि चविष्ट करण्यासाठी विलायचीची पूड आणि चिमूटभर मीठ टाकतात. त्याचा गोळा की, कणिक भिजवून, त्याच्या छोट्या पात्या करून त्यात सातूचे पुरण भरतात. आता या तव्यावर टाकून दोन्ही बाजूंनी तेल किंवा तूप घालून भाजून घेतात. ही पुरी मस्त फुगते आणि गोड सुगंध सुटतो. खूप चविष्ट आणि शरीरासाठी पोषक असलेल्या या पुऱ्या पचायला हलक्या असतात. या लाह्यांपासून तयार होणाऱ्या पुऱ्या तयार करण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते. काही महिलांना या विषयी माहिती नसल्यामुळे भाजलेले धान फेकून देतात पण, त्या धानाचे असे चविष्ट पदार्थ बनविता येतात. कदाचित शहरात राहणाऱ्या भगिनींना याविषयी माहिती नसेल. पुढच्या वेळी नक्की लाह्यांपासून सातू तयार करून बघा. स्वतः खा आणि लहान मुलांनाही खायला द्या.

# अन् आम्हा फिरविशी दारोदारी!

गौरी बेलन/९८८११०४११२

शीर्षक वाचून प्रत्येकाला आज लक्ष्मी नारायणाचे स्मरण झाले असणार. पूर्वी दारिद्र्याचा गंभीर प्रश्न सोडवण्यासाठी लक्ष्मीनारायणाला प्रार्थना केली जायची. पैसा कमविण्यासाठी नैतिकतेचा आणि गुणवत्तेचा पाया असल्याने, श्रीमंत होणं प्रत्येकाला जमत नसे. सध्या मात्र स्थिती बदललेली आहे.भौतिक श्रीमंती भरपूर असली तरी, कौटुंबिक श्रीमंती मात्र लोप पावलेली आहे. बायको मिळवण्यासाठी सुशिक्षित तरुणाई बेजार झाली आहे. संशोधन करताना कितीही जोर लावला, कितीही फिरलो तरीही जोडीदारीण मात्र मिळता मिळता नाही. पूर्वजन्मी केले ते कपाळी उमटले. मुलीकडच्यांना दिलेली वागणूक आता आम्हाला वारंवार नाक घासायला लावते. म्हणूनच आज वधूसाठी दाही दिशा भटकणं आलं, असे चिंतेचे स्वर समाजात ऐकायला मिळतात. वेळीच सावरलं तर कुटुंब संस्था नक्कीच वाचू शकेल. मुलामुलींचा बिघडलेला समतोल लक्षात घेता आंतरजातीय विवाहाचाही सकारात्मक विचार ध्यानात ठेवावाच लागेल. एवढेच नव्हे तर विधवा किंवा घटस्फोटीत मुलींचासुद्धा प्रथम विवाहाच्या तरुणांना विचार करणं आवश्यक राहील. कठीण आहे, अशक्य मात्र नक्कीच नाही.

सृष्टीचे चक्र जसे दिवस आणि रात्र सांभाळून उत्कृष्टरित्या फिरते आहे त्याचप्रमाणे, समाजाचेही चक्र चांगल्या रीतीने चालण्यासाठी, पती-पत्नीचं नातं आवश्यक आहे. कधी पतीला रात्र व्हावं लागेल तर कधी पत्नीला! वयानुसार आंतरिक ऊर्जेला शांतपणे सांभाळण्यासाठी जोडीदाराचा सहवास अत्यावश्यक आहे. पण, हे सगळं अनुभवण्यासाठी किंवा करण्यासाठी लग्न जमवण्याची तळमळ तरुणाईमध्ये वाढलीच पाहिजे. अपेक्षित शिक्षणाचा उंबरठा ओलांडताना, नोकरीबरोबरच जोडीदार ही पुरातन संस्कृती आम्ही अवलंबली तर लग्नाची बिकट समस्या निश्चित कमी होईल. समाजसुधारकांनी मुलींना शिक्षणाचे धडे दिले ते आदर्श कुटुंब संस्था निर्माण करण्यासाठी! मग, आई-वडिलांच्या घरी राहण्यापेक्षा मी, माझ्या हक्काच्या घरी राहून, पती समवेत माझ्या कुटूंबाचा उद्धार कसा करू शकते? हाच ध्यास मुलींनी घेणं ही काळाची गरज आहे. लग्न न जमल्यास, मुली घरी राहिल्यास आई-वडिलांची चिंता या वाढतातच. या उलट आपल्या मुलीने सासरी राहून, संघर्ष करून कुटुंबाला सावरलं किंवा कुटुंबाची प्रगती केली तर त्या आई-वडिलांचा उर अभिमानाने भरून येतो. संघर्षातूनच व्यक्तिमत्त्वाचा विकास जास्त होतो, हे तुम्हाआम्हा सगळ्यांनाच माहिती आहे. गंजून झिजण्यापेक्षा राबून झिजलेलं कधीही चांगलं...नाही का?

एकट्या मुलांचीही चिंता काही कमी नाही. तसंही स्वभावाप्रमाणे पुरुष जात ही मनातलं कमी बोलते. एकटेपणाची सल त्यांच्या कृतीतून झळकते. काळ बदलला असला तरी, अनेक पती देवांना आपली बायको ही गृहस्वामिनीच रहावी, असं मनापासून वाटतं. बायकोचं घरी असणं म्हणजे स्वर्ग सुख! तिनं सगळं कसं छान सांभाळणं हेच त्याला, त्याच्या कर्तृत्वाला आणि जगण्याला बळ देत असते. स्थिती बदलली आणि मोठ्या नाईलाजाने नोकरीची बायको हवी, ही अपेक्षा पुढे आली. सध्या तर लग्न जुळवण्यासाठी ही अपेक्षासुद्धा मोठा अडसर ठरते आहे. ही अपेक्षा थोडी सैल केली तर, काही सुशिक्षित मुली, संसार नक्कीच सुरू करू शकतील. लग्न जुळवताना सौंदर्याचा मुद्दा प्राधान्य क्रमांकावर येतो. 'गोरी रूप चोरी' या उक्तीप्रमाणे चेहऱ्याची ठेवण, नाकडोळे फारसे चांगले नसले तरीही गोऱ्या मुलींना जास्त पसंती मिळते. गोऱ्या रंगाची भुरळ युवकांना आहेच. सौंदर्यासमोर शिक्षण आणि इतर गुण हे कमीच पडतात. 'नाकापेक्षा मोती जड नको' असं म्हणत मुलापेक्षा उत्तम अर्थार्जन असलेल्या मुलीही नाकारल्या जातात, ही वस्तुस्थिती आहे. अनुरूप जोडीदार म्हणजे गुणदोषांसह समांतर झालेला तराजू! माझ्याकडे जे जास्त आहे ते माझ्या जोडीदाराकडे नसलं तरी चालेल ही जाणीव असणं, म्हणजे खरं संशोधन आहे. प्रत्येक गोष्टीवर वेळीच मार्ग काढला तर, नक्कीच उत्तर गवसतं. पण, वेळ जर निघून गेली तर हातात फक्त पश्चात्ताप उरतो. मग दाही दिशाच फिरण्याची वेळ येते. तरुणांना शिक्षण घेताना, आदर्श मूल्यांची जपणूक ही करताच यायला हवी. ईश्वराने जर पुरुषार्थ दिला आहे तर तो चुकवून कसं बरं चालेल? समाजातील आई, बहिणी, मुली आणि समस्त पत्नी रूपातील स्त्रियांना तुमच्या भक्कम पाठबळाची नितांत गरज आहेच.

स्त्री-पुरुषांच्या उपजत गुणांना वाव मिळवण्यासाठी विवाहासारखं सुंदर बंधन नाही. अजून चांगलं बघू असं म्हणण्याच्या नादात हातात आलेलं स्थळ आणि आई-वडिलांनी, आप्तस्वकीयांनी सुचवलेली मुलगी नाकारणं युवकांना महाग तर पडलं नाही ना...जरा आठवून बघा!

*माणूस म्हणजे द्रष्टेपण, नित्याचेच परिवर्तन...*
*आयुष्यात यश मिळविण्या, घर संसारच संजीवन...*

# जनरेटर वाहनाची मोटरसायकलला धडक; एक ठार

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर दि.२३ मे-**


जनरेटर सह भरधाव वेगाने धावणाऱ्या डीजेच्या वाहनाची दोरी तुटल्याने जनरेटर व मोटरसायकलचा भीषण अपघात झाल्याने या भिषण अपघातात मोटर सायकल चालकाचा मृत्यू झाला आहे, ही घटना ईस्लापुर ते हिमायतनगर राष्ट्रीय महामार्गावरील पांगरी तांडा येथे दि. २३ मे रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.



या घटनेत मृत पावलेल्या तरूणांचे नाव योगेश काशीराम राठोड वय ३५ वर्ष रा. गोधन तांडा तालुका हिमायतनगर येथील रहिवासी आहे. तर याच घटनेत गोरु अनिल राठोड वय १८ वर्षे राहणार बुरकुलवाडी तालुका किनवट येथील रहिवाशी तरुण जखमी झाला आहे. योगेश राठोड व गोरु राठोड हे दोघेही तरुण मोटरसायकल क्रमांक एम एच २६ झेड ९८९५ या मोटरसायकलने इस्लापूर कडे येत होते तर भरधाव वेगाने समोरून येणाऱ्या डीजेच्या वाहनाला दोरीच्या साह्याने बांधून असलेले जनरेटर ची दोरी तुटल्याने हे जनरेटर मोटर सायकलला धडकल्याने मोटर सायकलचा अक्षरशा चुराडा झाला. मोटरसायकलस्वार रोडच्या कडेला पाच फूट खाली जाऊन कोसळली. पांगरी तांडा येथील स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन गंभीर जखमी झालेल्या योगेश राठोडला प्रथम उपचारासाठी हिमायतनगर ग्रामीण रुग्णालयात नेले असता तेथील डॉक्टरांनी त्या तरुणास मृत घोषित केले. डीजे चालक आपले वाहन घेऊन त्या घटनेपासून पसार झाला. या घटनेची माहिती इस्लापूर पोलिसांना मिळतात सहाय्यक पोलीस निरीक्षक उमेश भोसले यांनी आपल्या पोलीस कर्मचाऱ्यांना घेऊन घटनास्थळी दाखल झाले. घटनेचा आढावा घेत सहाय्यक पोलीस निरीक्षक उमेश भोसले यांनी डीजे चालकाला पकडण्यासाठी डीजे चालकाच्या घरी पोहोचले मात्र तो चालक तेथून ही पसार झाला. या अपघातातील मोटर सायकल व जनरेटर इस्लापूर पोलिसांनी ताब्यात घेतले.

# भाजपाच्या वतीने महादेव मंदिर व परिसर स्वच्छता

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२३ मे-**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी महानगरच्या वतीने शुक्रवार दि. २३ मे रोजी सकाळी शहराच्या चैतन्यनगर येथील श्री महादेव मंदिर व परिसरात स्वछता व मंदिरात माजी मुख्यमंत्री,खा. अशोकराव चव्हाण ,खा. अजित गोपछडे यांच्या हस्ते आरती करण्यात आली.

यावेळी भाजपाचे मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे,महानगर अध्यक्ष माजी आ. अमरनाथ राजूरकर,प्रदेश प्रतिनिधी चैतन्यबापू देशमुख,माजी महानगराध्यक्ष दिलीप कंदकुर्ते,जिल्हा प्रवक्ते संतोष पांडागळे ,महानगरचे माजी सरचिटणीस मोहनसिंह तौर,संतोष मुळे,माजी नगरसेवक दीपकसिह रावत,मिलींद देशमुख ,शीतल खांडील ,स.दिलीपसिंग सोडी ,माजी नगरसेवक विनायक सगर,विपुल मोळके,माधवराव पटणे,व्यकंट मोकले ,प्रा. प्रभाकर उदगिरे ,आनंद पावडे,तुलजाराम उर्फ बागड्या यादव,विशाल शुक्ला,निलेश कुंटूरकर,संदीप पावडे ,अनिलसिंह हजारी, सखाराम तुप्पेकर, माजी नगरसेविका कविता मुळे,संगीता तुप्पेकर, महानगर सरचिटणीस अमोल कदम, मनोज जाधव, उद्योजक जयदत्त ततापूरे, गुरुदीपसिंघ संधू, माजी नगरसेवक दत्ता कोकाटे, मंडळ अध्यक्ष सुनिल राणे, किशन कल्याणकर, सदाशिव पुरी, कैलास सावते, मानिक देशमुख, बाळासाहेब उर्फ बन्नू देशमुख, विनोद देशमुख, बालाजी काळे, मुरारी कुंमारगावे सह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. या प्रसंगी अहिल्यादेवी होळकर यांचे सामाजिक कार्य, न्यायप्रियतेची परंपरा आणि जनसेवेतील योगदान याचे स्मरण करण्यात आले. त्यांच्या आदर्श जीवनशैलीचा आदर्श घेऊन समाजसेवेची प्रेरणा घेण्याचा निर्धार व्यक्त केला.या कार्यक्रमातून स्वछता व सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### पत्रकार गजानन पाटील 'एक्सलेंस पुरस्कारा'ने सन्मानीत

**हदगाव** -उत्कृष्ट लिखाण, शोध पत्रकारिता त्याचबरोबर वंचित व उपेक्षितांना न्याय देऊन सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या वृत्तपत्रातून मांडत त्या समस्यांचे निराकरण करणे ,त्यांना न्याय मिळवून देणे,न्याय मिळेपर्यंत लिखाण करून अन्यायाविरुद्ध लेखणीच्या माध्यमातून लढा देणे, उपेक्षितांना न्याय मिळवून देणे,शेतकरी, कष्टकरी यांच्या बातम्यांना न्याय देऊन त्या बातम्यांच्या माध्यमातून प्रशासनाला जागे करण्याचे काम पत्रकार करत असतो. या सर्व बाबी ग्रामीण भागातील बातमीदार गजानन पाटील यांच्या लेखणीतून स्पष्टपणे उमटल्या, त्या आधारावर पनवेल प्रेस क्लब व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा 'एक्सलेंस पत्रकार अवॉर्ड' हदगाव (जिल्हा नांदेड) येथील पत्रकार गजानन पाटील यांना वितरीत करण्यात आला. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे व प्रसिद्ध अभिनेत्री दिपाली भोसले सय्यद या उपस्थित होत्या. त्यांच्याच शुभ हस्ते हस्ते हा पुरस्कार वितरीत करण्यात आला., 'बातमी मागील बातमी' असे लिखान केल्याने हा एक्सलेंस अवार्ड ग्रामीण पत्रकार तथा पत्रकार संघाचे माजी तालुका अध्यक्ष गजानन पाटील यांना वितरित करण्यात आला. नवीन मुंबई पनवेल प्रेस क्लब व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके सभागृहात एक्सलन्स अवॉर्ड २०२५ चे आयोजन करण्यात आले होते.या पुरस्कार सोहळ्यासाठी महाराष्ट्रभरातून सर्व स्तरातील मंडळींचे नामांकन आले होते आणि त्यामधूनच मोजक्या प्रतिष्ठित आणि वेगवेगळ्या क्षेत्रात अग्रगण्यपणे काम करून निस्वार्थपणे कार्य करत असलेल्या व इतर सर्वच क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्यांना हा पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. या सन्मान सोहळ्यासाठी चित्रपट अभिनेत्री दिपाली सय्यद, माजी खासदार तथा लोकनेते रामशेठ ठाकूर, दैनिक इलेक्ट्रॉनिक मीडियाचे स्वप्नील दुधारे,पत्रकार आशुतोष,संजय सुर्यवंशी, व प्रविण दुधारे,राहुल बहादुरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या पुरस्कार सोहळ्यात महाराष्ट्रभरातून सर्वच स्तरातील व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. गजानन पाटील यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार बांधवांनी त्यांचे अभिनंदन करत शुभेच्छाही दिल्या.




### स्वारातीम विद्यापीठात जयंत नारळीकर यांना श्रद्धांजली अर्पण

**नांदेड** -स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात खगोलशास्त्रज्ञ आणि विज्ञानप्रसारक प्रा. जयंत नारळीकर यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठ प्रशासन, अधिकारी, प्राध्यापकवर्ग, विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम अत्यंत भावपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात दोन मिनिटांच्या मौनाने करण्यात आली. विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन यांनी नारळीकर यांच्या विज्ञान क्षेत्रातील योगदानाचा आढावा घेतला व त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांनी सांगितले की, प्रा. नारळीकर यांनी भारतीय विज्ञानाला आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले असून त्यांच्या विचारांची प्रेरणा पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहचवणे आपले कर्तव्य आहे. या प्रसंगी विध्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्याप्रकाश जाधव आणि अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील यांनीही नारळीकर यांच्या कार्यावर भाष्य केले. त्यांच्या आठवणींना उजाळा देताना त्यांच्याविषयी आदर व्यक्त केला. या विद्यापीठातील आणि भौतिकशास्त्र सुंकुलाच्या जडण घडणामध्ये नारळीकर सरांचे मोलाचे सहकार्य आहे. असेही यावेळी डॉ. पाटील यांनी सांगितले. या प्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. डी.एम. खंदारे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, विधी अधिकारी डॉ. विनायक भोसले, उपकुलसचिव मेघश्याम साळुंके, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, सहाय्यक कुलसचिव डॉ. सरिता लोसरवार, रामदास पेद्देवाड, डॉ. लक्ष्मीकांत आगलावे, शिवराम लुटे यांच्यासह शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### चंद्राबाई टोकलवाड (भुरके) यांचे निधन

**नरसी** -येथून जवळच असलेल्या पाळा येथील रहिवासी जेष्ठ महीला चंद्राबाई सदाशिव टोकलवाड (भुरके) वय ८२ वर्ष यांचे आज दि.२३ मे २०२५ रोजी शुक्रवारी सकाळी ८ वाजता निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात चार मुलं, एक मुलगी,जावाई, सुना , नातू असा मोठा परिवार आहे. त्या ओड समाजाचे प्रांत अध्यक्ष बालाजीराव मसलगेकर यांच्या सासू होत. स्व. चंद्राबाई टोकलवाड यांच्यावर आज दि. २३ मे रोजी दुपारी २:३० वाजता पाळा तालुका मुखेड जि.नांदेड येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. चंद्राबाई टोकलवाड अतिशय मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या. अंत्यविधीस गावातील नागरिक, पाहुणे, मित्र मंडळी उपस्थित होते.



### नैतिक डोके केंब्रिजमधून पहिला

**नांदेड** -नुकत्याच जाहीर झालेल्या दहावी बोर्ड परीक्षेत केंब्रिज विद्यालयाचा १०० टक्के निकाल लागला असून,नांदेड येथील डोके नैतिक तातेराव हा विद्यार्थी १०० टक्के गुण घेऊन विद्यालयातून प्रथम आला आहे.अतिशय कष्ट आणि जिद्दीतून त्याने हे यश संपादन केले आहे.त्याच्या या यशाबद्दल विद्यालयाच्या प्राचार्या रेवती गव्हाणे मॅडम,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्याचे अभिनंदन केले.

# भाजपाच्या वतीने नांदेड दक्षिण ग्रामीण मंडळ संघटनात्मक बैठक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२३ मे-**

भारतीय जनता पार्टी नांदेड महानगर नांदेड दक्षिण ग्रामीण महामंडळ संघटनात्मक बैठकीचे आयोजन माजी जि.प. सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी दिनांक २३ मे रोजी सकाळी १० वाजता अमर राजूरकर व दिलीप कंदकुर्डे यांच्या उपस्थितीत नियोजित बैठक पार पडली.

भारताचे गृहमंत्री अमित शाहा यांचा दिनांक २६ मे रोजी नांदेड दौऱ्यावर येत असल्यामुळे त्यांच्या सभेच्या नियोजनात्मक संदर्भाने दिनांक २३ मे रोजी सकाळी १० वाजता नांदेडचे महानगर जिल्हा अध्यक्ष अमर राजूरकर व दिलीप कंदकुर्ते यांच्या उपस्थितीत धनेगाव नगरीचे सरपंच पिंटू पाटील शिंदे यांच्या जनसंपर्क कार्यालय धनेगाव वाजेगाव बायपास येथे संपन्न झाली. या बैठकीस अमर राजूरकर, दिलीप कंदकुर्ते यांनी अमित शहा यांच्या सभेस मोठ्या जनसमुदायाने येऊन या सभेस लाखोंच्या संख्येने उपस्थित राहून ही सभा यशस्वीरित्या पार पाडावी असे आव्हान केले. या बैठकीस तीन सर्कल वाजेगाव, बळीरामपूर, सोनखेड, येथील भाजपचे आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मंचावर अमर राजूरकर, दिलीप कंदकुर्ते, मनोहर पाटील शिंदे, राजू काळे, पिंटू पाटील शिंदे, डॉ. कालिदास मोरे, गंगाप्रसाद काकडे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विश्वंभर शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन रमेश वाघमारे यांनी केले तर आभार माजी जि.प. सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी केले. यावेळी भारतीय जनता पार्टी चे तीन सर्कल मधील आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते व तीनही सर्कल मधील सर्व गावचे आजी माजी सरपंच यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पुर्व परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ मे-**

महाराष्ट्र गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ ही परीक्षा रविवार १ जून २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ या कालावधीत नांदेड जिल्ह्यातील ३७ परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. या परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू केल्याचे जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी कळवले आहे.

नांदेड जिल्ह्यातील विविध ३७ विद्यालय, महाविद्यालयातील केंद्रावर सकाळी ११ ते दुपारी १२ या कालावधीत परीक्षा होणार असून त्यासाठी ९ हजार ६२४ उमेदवारांनी नोंदणी केली आहे. परीक्षेचे कामकाज सुरळीत व शांततेत पार पडावे यासाठी परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरातील भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार परीक्षेच्या दिवशी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत च्या कालावधीत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधित असलेले अधिकारी, कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. तसेच परीक्षेच्य कामाशी संबंधीत असलेले अधिकारी व कर्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅलक्यूलेटर तत्सम साहित्य वापरण्यास प्रतिबंध केला आहे.

# मॅच फिक्सींग इन 'अंडर फोर्टीन'

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२३ मे-**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दि. २० मे रोजी केलेल्या कारवाईच्या संदर्भात तरुण भारत मध्ये फक्त प्रकाशित केल्यानंतर यात आता नवीन माहितीसमोर आली असून रेती माफियांनी पथकाला दिलेली रक्कम आकडेवारीनुसार विश्वसनीय सूत्रांनी सांगितली आहे. या कारवाईच्या माध्यमातून स्थानिक गुन्हे शाखेने 'अंडर फोर्टीन' मध्ये मॅच फिक्सिंग केली असून ही रक्कम सहा अंकी असल्याची माहिती आहे.

**येळी रेती घाट कारवाई**

उस्माननगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील येळी रेती घाटावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धडाकेबाज कारवाई करत कोट्यावधीचे साहित्य जप्त केले. परंतु या कारवाईदरम्यान दोन हायवा व चार बोटी पद्धतीशीरपणे या गुन्ह्यातून काढून टाकत लाखोंची तोड पाणी करण्यात आली. ही माहीती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाल्यानंतर तरुण भारतमध्ये वृत्त प्रकाशीत करण्यात आल्यानंतर या संदर्भाने आता नवीन माहिती समोर आली आहे आली आहे. पथकाने गोणेवार, उबाळे, संभाजी या नावाच्या व्यक्तीकडून तीन (फायबर) बोटीसाठी प्रत्येकी तीन व दोन हायवा वाहनांसाठी पाच अशी रक्कम घेण्यात आली. ही रक्कम तीन नव्हे, चार नव्हे तर पाच अंकी असल्याची माहिती आहे. त्यातच एका अनोळखी रेतीमाफीयाकडून देखील रक्कम घेण्यात आली असून याचा तपशील मात्र मिळु शकला नाही.

दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेने दि. २० मे रोजी केलेली कारवाई चांगली चर्चेत आली आहे. जिल्हा पोलीस दल रेती उपसा, वाहतुकीवर करत असलेल्या कारवाया रेती वाहतुकीवर लगाम लावण्यासाठी आहेत का आर्थिक तडजोड करण्यासाठी असा प्रश्न उपस्थित झाला असून दि. २० मे रोजी सोडून देण्यात आलेल्या दोन हायवा पुन्हा जप्त करणार का ? असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

# विजेच्या सुरळीत पुरवठ्यासाठी आ. भीमराव केराम यांचा पुढाकार

**तभा वृतसेवा**
**किनवट दि.२३ मे-**

ग्रामीण भागातील वाढती लोकसंख्या, शेतीच्या आधुनिकतेकडे होणारी वाटचाल आणि घरगुती तसेच औद्योगिक वीज वापरात होणारी लक्षणीय वाढ या पार्श्वभूमीवर विजेच्या स्थिर व पुरेशा पुरवठ्याची गरज आता अधिक तीव्र झाली आहे. या गरजांचा अंदाज घेऊन किनवट विधानसभेचे आमदार भीमराव केराम यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील महत्त्वाच्या गावांमध्ये नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्रे उभारण्याची गरज शासन दरबारी जोरदारपणे मांडली होती.त्यांच्या पाठपुराव्याला अखेर शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, मोहपूर, पाटोदा खुर्द, पारडी खुर्द, कोल्हारी (तालुका किनवट) आणि हडसणी (तालुका माहूर) येथे नव्या उपकेंद्रांची उभारणी करण्यासंदर्भात संबंधित विभागाला अहवाल पाठवण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. यामुळे लवकरच या भागातील नागरिकांना आणि शेतकऱ्यांना अधिक स्थिर आणि निर्बाध वीजपुरवठा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.आ. भीमराव केराम यांनी ग्रामीण भागाच्या विकासासाठी घेतलेली ही पुढाकाराची भूमिका आणि दूरदृष्टी निश्चितच उल्लेखनीय आहे. विजेच्या कमतरतेमुळे या गावांमध्ये अनेक वेळा शेती, सिंचन, लघुउद्योग व घरगुती वापरामध्ये अडथळे येत होते. ही समस्या दूर व्हावी म्हणून त्यांनी वेळोवेळी महावितरण आणि ऊर्जा विभागाकडे पाठपुरावा केला होता.



# भोकर मतदार संघात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे संघटन वाढवणार : इंजी स्वप्निल इंगळे

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. २३ मे-**

तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेसची आढावा बैठक राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष स्वप्निल इंगळे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाली या बैठकीमध्ये राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा मागील आढावा घेण्यात आला ,तसेच पुढील काळामध्ये गाव तिथे शाखा व पक्ष सदस्य नोंदणी अभियान संदर्भामध्ये मार्गदर्शन करण्यात आले .तसेच सर्व समाजाला सोबत घेऊन जाणारा व फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारधारा घेऊन चालणारा पक्ष म्हणून राष्ट्रवादी पक्षाची ओळख आहे यामुळे भोकर मतदार संघातील अनेक युवक हे ना .अजितदादा पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवुन राष्ट्रवादी युवक कांग्रेस मधे काम करण्यास इच्छुक आहेत.

जिल्ह्याचे नेते आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या सोबत चर्चा करून या सर्व युवकांचा प्रवेश राष्ट्रवादी कांग्रेस पक्षात करून घेण्यात येईल तसेच भोकर मतदार संघात रोजगाराच्या संधी नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात युवक हे बेरोजगार आहेत त्यांच्यासाठी येणाऱ्या काळात रोजगार मेळावा घेण्यात येईल असे प्रतिपादन इंजी स्वप्निल इंगळे पाटील यांनी केले.

या बैठकीसाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष श्रीनाथ गिरी, वैद्यकीय आघाडीचे अमोल मालेगावकर, उत्तर तालुका अध्यक्ष पांडुरंग पावडे, गजू भाऊ एरलेवाड, संदीप भैया अटकोरे, श्रीनिवास पाटील हिवराळे, भोकर तालुका अध्यक्ष गजानन पाटील,शहर अध्यक्ष मजहर भाई, कार्याध्यक्ष सय्यद जफर, कांबळे महेंद्र तालुका सचिव, शहराध्यक्ष फहीम पटेल साहेबराव वाहूळकर, शेख शादुल्ला भाई, प्रकाश अण्णा बोंदिरवाड तालुका उपाध्यक्ष, सुनिता ताई बेसिनलोड, कल्पनाताई कदम,गायकवाड काकू,, परसु पाटील दौरकर, सक्रिय सामाजिक कार्यकर्ता , सह असंख्य युवक उपस्थित होते.

# बिबट्या मृत्यू प्रकरणात सहाय्यक वनसंरक्षकावर गुन्हा दाखल करण्याची अन्याय प्रतिकार दलाची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२३ मे-**

किनवट तालुक्यातील सारखणी घाटातील जंगलातून जाणाऱ्या महामार्गावर वाहनाच्या धडकेत बिबट्या वाघाचा मृत्यू झाला होता. त्यानंतर घटनास्थळावरून वाघाचा मृतदेह गायब झाला. वन्यप्राण्यांचे संवर्धन करण्याची जबाबदारी सोडून कर्तव्यात कसूर करणारे सहाय्यक वनसंरक्षक जी.डी. गिरी व मांडवीच्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करुन त्यांना शासकीय सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी अन्याय प्रतिकार दलाचे संस्थापक कार्याध्यक्ष तथा महाराष्ट्र पर्यावरण बचाव समितीचे अध्यक्ष सिध्दार्थ तलवारे यांनी नागपूरच्या मुख्य वनसंरक्षकाकडे केली आहे.

याबाबत मुख्य वनसंरक्षकाकडे केलेल्या तक्रारीत तलवारे यांनी म्हटले आहे की, वाघाच्या संवर्धनासाठी शासनस्तरावर विविध प्रयत्न केले जात आहेत. वनपरिक्षेत्राअंतर्गत उन्हाळ्यात जलकुंभ उभारणी व इतर सोयीच्या अभावामुळे वन्यप्राणी पाण्याच्या शोधात रस्त्यावर येतात. परिणामी त्यांचा अपघात होतो किंवा शिकाऱ्याच्या जाळ्यात अडकण्याची भीती असते. मांडवी वनपरिक्षेत्राची जबाबदारी असणारे सहाय्यक वनसंरक्षक जी.डी. गिरी वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडून कर्तव्यात कसूर झाली आहे, होत आहे.

सारखणी घाटात वन तपासणी नाक्याच्या काही अंतरावर वाहनाच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू झाला होता. घटनेनंतर स्थानिक वनप्रेमी नागरिकांनी मोबाईलवरून अधिकाऱ्यांना माहिती कळविली होती परंतु संबंधित अधिकारी तीन तासांनंतर घटनास्थळी आले होते तोपर्यंत बिबट्याचा मृतदेह गायब झाला होता, या मृतदेहाचा शोध घेण्यासाठी कोणतीच मोहिम राबविण्यात आलीच नाही. याउलट हे प्रकरण थंडच करण्याचा प्रयत्न झाला त्यामुळे वन्यप्राणी नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. बिबट्याचे शव कुठे गायब झाले याबाबत अन्याय प्रतिकार दल आणि अन्य संघटनेनी विचारणा केली होती परंतु त्यास अद्याप उत्तर देण्यात आले नाही. एकंदरीत सगळा अंदाधुंद कारभार वनखात्यात सुरू आहे. नांदेड चे उपवनसंरक्षक केशव वाबळे यांचे आपल्या अधिपत्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर नियंत्रण राहिलेले नाही त्यामुळे मुख्य वनसंरक्षकांनीच यात लक्ष घालावे व बिबट्याचा मृतदेह गायब प्रकरणांत संबंधितांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी सिध्दार्थ तलवारे यांनी केली आहे.

# अनधिकृत खत विक्रीप्रकरणी पोलिस कारवाई; इस्लापूर येथे गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२३ मे-**

जिल्हास्तरीय कृषि निविष्ठा समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यात कोणत्याही ठिकाणी अनधिकृतरित्या कृषि निविष्ठांची विक्री होत असल्यास तात्काळ पोलिस कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या सूचनेनुसार जिल्ह्यात भरारी पथके कार्यरत करण्यात आली आहेत.

या आदेशानुसार किनवट तालुक्यातील मौजे शिवनी येथे एक व्यक्ती विनापरवाना गावोगावी जाऊन सेंद्रिय व इतर खते विक्री करत असल्याची गोपनीय माहिती कृषी विभागास प्राप्त झाली. सदर माहितीच्या आधारे कृषी विभागाच्या भरारी पथकाने सापळा रचून सदरील खते व वापरण्यात आलेली वाहनासह माल जप्त करून इस्लापूर पोलीस ठाणे ता. किनवट येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर कारवाई विभागीय कृषी सहसंचालक साहेबराव दिवेकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत व कृषी विकास अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे यांच्या मार्गदर्शनाखाली पंचायत समितीचे कृषी अधिकारी शिवराम मुंडे यांनी पार पाडली. गुन्हा दाखल करण्यास जिल्हा मोहिम अधिकारी सचिन कपाळे, तालुका कृषी अधिकारी बालाजी मुंडे, तसेच जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक अमोल पेकम यांनी सहकार्य केले. या कारवाईत एकूण १४ लाख ६४ हजार किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### मुख्यमंत्री फडणवीस परभणी दौऱ्यावर

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गुरुवार २९ मे रोजी परभणी शहराच्या दौऱ्यावर येणार असल्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या या दौऱ्यात परभणीतील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतींचा भूमीपुजनाचा सोहळा होणार आहे. त्यादृष्टीने वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठातांपासून उच्चपातळीवरसुध्दा जोरदार हालचाली सुरु झाल्या आहेत. गंगाखेड रस्त्यावरील ब्राम्हणगाव शिवारात प्रस्तावित या महाविद्यालयाच्या विविध विभागांसह इमारतींना जागा उपलब्ध करण्यात आली आहे. दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांचा या कार्यक्रमाव्यतिरिक्त अन्य कोणताही कार्यक्रम अद्याप निश्चित नाही. दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने शुक्रवार २३ मे रोजी सकाळी ११ वाजता सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांची व्यापक बैठक पालकमंत्री सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या संपर्क कार्यालयात बोलावली असून त्या बैठकीत या दौऱ्याच्या निमित्ताने चर्चा झाली असल्याची माहिती दै.तरुण भारतचे परभणी जिल्हा प्रतिनिधी मोहन धारासूरक यांच्याशी भाजपा पदाधिकाऱ्यांने बोलतांना सांगितली.

### ६५ बांधकाम कामगारांना साहित्य संचाचे वाटप

**परभणी,/प्रतिनिधी :** आमदार डॉ. राहुल पाटील यांच्या संकल्पनेतून परभणी मतदारसंघातील बांधकाम कामगारांना गुरुवार २२ मे रोजी साहित्य संचाचे वाटप करण्यात आले.

शहरातील हडको कॉलनीत जिल्हा प्रमुख पठाण करामत खान, महिला जिल्हा प्रमुख ॲड. नाहिदा याच्या उपस्थितीत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी ६५ मजुरांना साहित्य किट वाटप करण्यात आले. यावेळी प्रभाग प्रमुख जावेद भाई, पठाण साहेब, काजीसाहेब, सय्यद यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते. दरम्यान, शिव अल्पसंख्यांक सेनेच्या वतीने या महिन्यात २२५ मजुरांना या साहित्य संचाचे वाटप करण्यात आले असून लेबर अधिकारी कऱ्हाड, देशमुख यांनी त्यासाठी पुढाकार घेतला.

### कचरा कुंडी परिसर स्वच्छ करून केले सुशोभिकरण

#### महापालिकेच्या पथकाद्वारे शिवाजी नगरात स्वच्छता अभियान

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेच्या पथकाने गुरुवार २२ मे रोजी शहरातील शिवाजी नगरातील डॉ. नरवाडे यांच्या शेजारील कचरा कुंडी परिसर स्वच्छ करून कचरा कुंडी बंद केली. तसेच कचरा कुंडी, परिसर सुशोभीकरण करून त्याठिकाणी अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रताप काळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी नगर सचिव तथा मुख्य स्वच्छता निरीक्षक विकास रत्नपारखे यांची उपस्थिती होती.

महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'क' च्या सहायक आयुक्त श्रीमती प्रिया गोरखे यांच्या नियंत्रणात मुख्य स्वच्छता निरीक्षक मेहराज अहमद, स्वच्छता निरीक्षक श्रीकांत कुरा, स्वच्छता निरीक्षक प्रल्हाद देशमाने, सौरभ जोगदंड, अब्दुल शदाब, मुकादम शशी लहाने, अब्दुल रशीद व मनपा कर्मचारी शरद कोल्हे भगवान लहाने रॉकी बागडे यांनी ही मोहीम राबविली.

दरम्यान, नागरीकांनी आपल्या घराचा परिसर स्वच्छ ठेवावा, घरातील कचरा विलगीकृत करून घंटागाडीस द्यावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक धैर्यशील जाधव यांनी केले आहे.

### कृषि विद्यापीठाच्या बियाणे विक्रीला उत्स्फूर्त प्रतिसाद

#### ४०० क्विंटल बियाणे विक्री : मराठवाड्यातील २ हजार शेतकऱ्यांनी घेतला लाभ

**परभणी,/प्रतिनिधी :** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या ५३ व्या वर्धापन दिनानिमित्त विस्तार शिक्षण संचालनालय आणि कृषि विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार १८ मे रोजी खरीप पीक परिसंवाद व कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कृषि विद्यापीठ निर्मित ज्वारी, मूग, तूर व सोयाबीणच्या ४०० क्विंटल बियाणांची विक्री करण्यात आली.

विद्यापीठाच्या बिज प्रक्रिया केंद्रावर खरीप हंगामासाठी बियाणे विक्रीचा शुभारंभ विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि, माजी कृषि आयुक्त उमाकांत दांगट, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य दिलीप देशमुख व भागवत देवसरकर, तसेच विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश आहिरे, कुलसचिव संतोष वेणीकर, प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे, प्रगतिशील शेतकरी सुधीर अग्रवाल, सहयोगी संचालक (बियाणे) डॉ. हिराकांत काळपांडे, व बिज प्रक्रिया केंद्र प्रभारी अधिकारी डॉ. संतोष शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

बियाणे विक्री मध्ये मुख्यत्वे खरीप ज्वारी जैव संपृक्त वाण (परभणी शक्ती), मुग (बीएम २००३-२), तुरीच्या लाल वाणामध्ये (बीडीएन ७१६, बीएसएमआर-७३६) तुरीच्या पांढ-या वाणांमध्ये (बीडीएन ७११, बीएसएमआर ८५३, व गोदावरी), सोयाबीन (एमएयुएस १६२,एमएयुएस १५८ व एमएयुएस ६१२), भरड धान्य राळा व नाचणी, कापुस सरळ वाण (एन एच १९०१ बीटी, एन एच १९०२ बीटी), कापुस देशी वाण (पीए ८१०) या वाणाच्या बियाण्याची विक्री करण्यात आली. विद्यापीठ संशोधन वाणांच्या बियाणे खरेदीसाठी मराठवाडा विभागातुन २००० पेक्षा जास्त शेतकरी बांधवांनी पहिल्याच दिवशी लाभ घेतला. यामध्ये सोयाबीन (३०० क्विटल), तुर (९० क्विंटल) मुग (१० क्विंटल), ज्वार (०१ क्विटल) व कापसाचे (१.५० क्विटल) असे एकूण ४००.०२ क्विंटल बियाणाची विक्री करण्यात आली.

कृषि विज्ञान केंद्र बदनापूर, गळीत धान्य संशोधन केंद्र लातूर, कृषि महाविद्यालय गोळेगाव व कृषि महाविद्यालय आंबेजोगाई, आदी ठिकाणी लवकरच बियाणे विक्रीस उपलब्ध होईल, असे सहयोगी संचालक (बियाणे) डॉ. हिराकांत काळपांडे यांनी कळविले आहे.

तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी–विक्री–प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/





# पालिकेने लावलेली करवाढ तात्काळ रद्द करा

## डॉ.रत्नाकर गुट्टे काका मित्र मंडळ, सकल मराठा समाज तसेच भाजपाच्यावतीने निवेदन सादर

**संपत तेली**

**पूर्णा ,/प्रतिनिधी-** पूर्णा नगर परिषदे मालमत्ता कर घरपट्टी कर,स्वच्छता कर,आदी यामध्ये भरमसाठ करवाढ करण्यात आली आहे ती रद्द करण्याबाबत भाजपा,पूर्णा नगर पालिकेने केलेली करवाढ रद्द करण्यासाठी भाजपा,आ. डॉ.रत्नाकर गुट्टे काका मित्र मंडळ, सकल मराठा समाज यांच्या वतीने मुख्याधिकारी नगर परिषद पुर्णा यांना निवेदन देऊन केलेली कर वाढ रद्द करा अन्यथा जन आंदोलन करण्यात येईल आसा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आले आहे.

या निवेदनावर भाजपा चे लक्ष्मीकांत कदम,हनुमान अग्रवाल,डॉ.अजय ठाकूर,प्रशांत कापसे, गोविंद ठाकर, तसेच आ. डॉ रत्नाकर गुट्टे काका मित्र मंडळचे तालुकाध्यक्ष सुभाष देसाई, प्रभारी नितीन कदम, शहराध्यक्ष ॲड.राजेश भालेराव, विश्वनाथ होळकर आणि सकल मराठा समाजाच्या



वतीने ज्ञानोबा कदम, मदन कदम, संदीप कदम, विष्णू कदम त्र्यंबक कदम, अनिल कदम आदींच्या सह्या आहेत.

### गव्हाणे रोडचे रुंदीकरण दूर : मधोमधचे धोकादायक पोलही काही हटेनात

#### महानगरपालिका सुस्त : नागरीक हतबल : दररोज अपघात

**परभणी,/प्रतिनिधी :** मध्यवस्तीतील गव्हाणे रोडच्या रुंदीकरणासह मजबुतीकरणाचे काम राहिले कोसोदूर परंतु, महानगरपालिका प्रशासनाने या रस्त्यावरील मध्यभागातीलच धोकादायक असे पोलसुध्दा अद्यापपर्यंत हटविले नाहीत. त्याचा परिणाम हे पोल दररोज छोट्या छोट्या अपघातास निमंत्रण देणारे ठरले आहेत.

काही वर्षांपूर्वी या रस्त्याच्या रुंदीकरणासह मजबुतीकरणाकरीता तत्कालीन नगरपालिकेने पाऊले उचलली. विशेषतः या रस्त्याच्या मधोमध दुभाजक टाकून एकेरी वाहतूकीचा मार्ग मोकळा करण्याचाही संकल्प सोडण्यात आला. त्या दृष्टीने या रस्त्यावर नारायण चाळ कॉर्नर पासून हॉटेल निरज कॉर्नर, तेथून पुढे गव्हाणे चौक व तेथून पुढे नवा मोंढा पर्यंत ठिकठिकाणी छोटछोटे दुभाजक उभारले गेले. त्या दुभाजकात पालिका प्रशासनाने मोठे पोल उभारुन पथदिवे कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला. त्या प्रमाणे पोलसुध्दा उभारले गेले. परंतु, पोलवर नगरपालिका प्रशासनाने दिवे काही बसविलेच नाहीत. आज ना उद्या या पोलवरील दिवे उजळतील व रस्त्याही उजळेल, असे अपेक्षित होते. परंतु, माशी कोठे शिंकली कळले नाही. पोलवर दिवेही बसले नाहीत, रस्ते उजळण्याचा तर प्रश्नच शिल्लक राहीला नाही. अलिकडे हे पोलच आता धोकादायक ठरले आहेत. कारण गव्हाणे रोड हा आधीच अरुंद रस्ता, त्या रस्त्यावर पहाटेपासून रात्री उशीरापर्यंत प्रचंड अशी वर्दळ, व्यापारी पेठेमुळे हा रस्ता सतत वाहतूकीसाठी व्यस्त असणारा, त्यामुळेच या रस्त्यावर रात्री बेरात्री मधोमधचे हे पोल दररोज अपघातासाठी निमंत्रण देणारे ठरु लागले आहेत. या रस्त्यावरील अर्धेअधिक पोल वाहनांच्या धडकेमुळे आडवे तिडवे झाले आहेत. काही पोल यापूर्वीच मुळापासून उखडल्या गेले आहेत. काही पोल सन्मानाने उभे आहेत, दुर्दैवाने ते पोल केबल चालकांच्या केबलच्या वापराकरीताच उभारले गेले की काय? अशी शंका येवू लागली आहे. विनावापराचे हे पोल तेथून हटवावेत व रस्ता सुरळीत वाहतूकीकरीता खुला करावा, अशी मागणी या भागातील नागरीकांनी वारंवार केली. परंतु, पालिका प्रशासनाने आजपर्यंत त्याकडे ढुंकूनही पाहिले नाही. त्यामुळे पोल हटविण्याचा प्रश्नच उद्भवला नाही. छोट-छोटे हे विषयसुध्दा महापालिकेच्या दृष्टीने दुर्लक्षित होत आहेत.

### सेलू शहरात वीजेचा लंपडावाने नागरिक झाले चांगलेच हैराण



**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी:** शहरासह तालूक्यात विजेचा प्रश्न गंभीर झाला असून राष्ट्रीय सणावारासह राष्ट्रीय माहापूरूषांच्या जयंतीदिनी विजपूरवठा खंडीत होत असून याकडे महावितरणचे दूर्लक्ष होत असल्याने नागरीकांना त्रासाचा सामना करावा लागत आहे .विद्यूत पूरवठा सूरळीत करण्याची मागणी सोमवार १९ रोजी निवेदनाद्वारे राष्ट्रीय काँग्रेसच्यावतिने महावितरणकडे करण्यात आली आहे .मागील अनेक महिन्यापासून शहरात वारंवार विद्यूत पूरवठा खंडीत होत आहे.या वारंवार खंडीत होणा-या विद्यूत पूरवठ्यामूळे शहरातील अनेक भागातील नागरीक त्रस्त झाले आहेत . तसेच पडत असलेल्या पावसामूळे विजेची समस्या निर्माण होत असल्याने नागरीकांना रात्र अंधारात काढावी लागत असून येणा-या पवसाळा ऋतू उगोदर शहरातील विद्यूत पूरवठा सूरळीत करण्यात यावा नसता तालूका काँग्रेसच्यावतिने लोकशाही मार्गाने अंदोलन करण्यात येणार असून यासाठी माजी नगरसेवक विनोद तरटे,मूस्ताक रब्बानी,इरफान जमिनदार,सचिन राऊत,दिलावर शेख,साजिद शेख,अशोक राऊत,नरसिंग हरणे,अतिक कूरैशी,संतोष मात्रे,रमेश पवार,महमंद गौस आदींनी पूढाकार घेतला.

### तिरुपती-आदिलाबाद व आदिलाबाद-नांदेड एक्सप्रेसमध्ये डब्यांची वाढ

**परभणी,/प्रतिनिधी :** उन्हाळ्यात होणारी प्रवाशांची गर्दी लक्षा घेवून दक्षिण मध्य रेल्वेने तिरुपती - आदिलाबाद - तिरुपती एक्स्प्रेस आणि आदिलाबाद - हुजूर साहिब नांदेड - आदिलाबाद एक्सप्रेस या रेल्वे गाड्यांत प्रत्येकी एक डब्याची कायम स्वरुपात वाढ करण्यात आली आहे.

गाडी क्रमांक १७४०५, १७४०६ तिरुपती - आदिलाबाद - तिरुपती एक्स्प्रेसमध्ये एक शेअर कार यान, द्वितीय श्रेणीचा एक डबा तिरुपती येथून सुटणाऱ्या गाडीत २४ मे पासून आणि आदिलाबाद येथून सुटणाऱ्या गाडीत २५ मे पासून कायम स्वरुपात वाढविण्यात आला आहे. या वाढीनंतर गाडीच्या डब्यांची एकूण संख्या २३ एवढी झाली आहे. तर गाडी क्रमांक १७४०९, १७४१० आदिलाबाद - हुजूर साहिब नांदेड - आदिलाबाद एक डबा आदिलाबाद येथून सुटणाऱ्या गाडीत २५ मे पासून आणि हुजूर साहिब नांदेड येथून सुटणाऱ्या गाडीत २५ मे पासून कायम स्वरुपात वाढविण्यात आला आहे.

### मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत प्रथमच आर.पी.हॉस्पिटलमध्ये यशस्वी शस्त्रक्रिया

**परभणी,/प्रतिनिधी-** परभणीजिल्ह्याच्या वैद्यकीय क्षेत्रात एक ऐतिहासिक टप्पा गाठला गेला आहे. मुख्यमंत्री सहायता निधीअंतर्गत आर.पी. हॉस्पिटल येथे प्रथमच कृत्रिम सांधा प्रत्यारोपणाची (हिप रिप्लेसमेंट) शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. या शस्त्रक्रियेमुळे ४० वर्षीय रुग्णाला कंबरेच्या सांध्याच्या तीव्र वेदनांपासून मुक्ती मिळाली असून, त्याला वेदनामुक्त आणि सुधारित जीवनशैली जगता येणार आहे ही शस्त्रक्रिया अस्थिरोग तज्ञ डॉ. महेश देशमुख,डॉ. कैलास लिपने, वैद्यकीय अधीक्षक डॉ.आमीर तडवी, डॉ.दिव्याम जैन यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. यामध्ये भूलतज्ञ डॉ. श्रुती शाहारे, ओटी टेक्निशियन संध्या आळणे, किशोर नवले, अर्सलान, तसेच आरोग्य विभाग प्रमुख राहुल कांबळे,संदिप पांगरकर, स्वप्नील बोर्डे आणि हॉस्पिटलच्या इतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



हिप रिप्लेसमेंट ही एक प्रगत शस्त्रक्रिया आहे, ज्यामध्ये खराब झालेला कूल्ह्याचा सांधा (हिप जॉइंट) काढून त्याजागी कृत्रिम सांधा बसवला जातो. ही प्रक्रिया विशेषतः ज्या रुग्णांना कूल्ह्याच्या सांध्याच्या तीव्र वेदना, संधिवात (ऑर्थरायटिस), किंवा इतर गंभीर समस्यांमुळे हालचाल करणे कठीण झाले आहे, अशांसाठी उपयुक्त ठरते. या शस्त्रक्रियेमुळे रुग्णाला पुन्हा सामान्य जीवन जगण्यासाठी आवश्यक हालचालींची स्वतंत्रता मिळते आणि वेदना कमी होतात.

ही शस्त्रक्रिया अत्यंत तांत्रिक आणि खर्चिक आहे, ज्यामुळे सामान्य रुग्णांना ती परवडणे कठीण असते. परंतु आर. पी. हॉस्पिटलच्या टीमने या रुग्णाला मुख्यमंत्री सहायता निधीअंतर्गत आर्थिक मदत मिळवून देऊन ही शस्त्रक्रिया पूर्ण केली.

आ.डॉ. राहुल पाटील यांनी हॉस्पिटलच्या टीमचे अभिनंदन केले आणि म्हणाले, ''परभणीच्या आरोग्य क्षेत्रात ही एक मोठी उपलब्धी आहे. रुग्णांना स्थानिक पातळीवर परवडणारी आणि दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे.कुठलाही आजार असलेल्या रुग्णाला उपचारासाठी मोठ्या शहरात जावे लागू नये यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगीतले.

## गावचा विकास हाच माझा ध्यास - सरपंच सौ.पुनमताई वराड

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर ,/प्रतिनिधी-** तालुक्यातील सायखेडा बामणी येथील सरपंच पूनम ताई गजानन वराड यांनी गावाचा विकास हाच माझा ध्यास आपले गाव स्वच्छ व सुंदर असावे त्याचप्रमाणे आनंदी वातावरण शिक्षकांनी कार्य करावे गावात मजबूत घरे, निर्मळ व स्वच्छ रस्ते, गटार योजना अशी सुंदर आणि स्वच्छ गाव बनविण्याचे स्वप्न ऊराशी बाळगणाऱ्या सरपंच सौ. पुनमताई गजानन वराड यांचे काम गाववाड्याजोगे आहे.



प्रत्यक्ष हे स्वप्न साकारताना प्रत्येक घरी पावसाचे वाहते पाणी जमिनीत मुरावे यासाठी शोष खड्ड्याचा केलेला प्रयोग आपले वेगळेपणा सिद्ध करते. गावचा चेहरा मोहरा बदलण्याची ताकद केवळ गाव पुढाऱ्यावर अवलंबून असते आपण आपल्या गावचा विकासासाठी काहीतरी केले पाहिजे व आपल्या गावचा विकास हाच मनात ध्यास ठेवून ही भावना सायखेडा बामणी ग्रामपंचायत च्या सरपंच पुनम ताई वराड यांनी प्रत्यक्षात आणली आहे. त्यांनी गावात २०० पेक्षा जास्त घरकुल, ५० पेक्षा जास्त सिंचन विहिरी, स्वच्छ व सुंदर पांदन रस्ते, गावातील सर्व रस्ते





सिमेंट रस्ते सांडपाण्याचे योग्य नियोजन, सुंदर क्रीडांगण, सुंदर शाळा, आरोग्य शिबिरे, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, फळबागायत , निराधारांना आधार देण्याची काम त्यांच्या पगार चालू करणे जनावरांसाठी शिबिर, गावात सुंदर अंगणवाडी पिण्याचे भरपूर पाणी, कचरा व्यवस्थापक, स्वच्छ व सुंदर स्मशानभूमी,लाईटची व्यवस्था ,सभागृह, वृक्ष लागवड यासारख्या अनेक योजना गावाच्या विकासासाठी प्रयत्न करीत आहे. गाव पुढारी शिक्षित असेल तर काही होऊ शकते त्याचे उत्तम उदाहरण सायखेडा बामणी या ठिकाणची ग्रामपंचायत आहे. आपल्या गावात वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवून आपल्या गावाची समाजामध्ये वेगळी ओळख कशी निर्माण करता येईल असा बामणी गावच्या सरपंच सौ पूनम ताई गजानन वराड यांनी आपल्या गावाचा विकास मनावर धरून आपल्या गावाचा विकास हाच माझा ध्यास आहे अशा त्या तरुण भारतचे प्रतिनिधीशी बोलताना त्यांचे मत व्यक्त केले.

# पवनचक्की कंपनीत चोरी करण्यासाठी आलेल्या चोरट्यांवर सुरक्षारक्षकाकडून गोळीबार, महाजनवाडीतील घटना

**तभा वृत्तसेवा**
**नेकनूर दि.२३ मे**

नेकनूर पोलीस ठाणे हद्दीत महाजनवाडी येथे पवनचक्की प्रकल्पावर चोरी करण्याच्या उद्देशाने आलेल्या चोरट्यांवर सिक्युरिटी गार्डने (दि.२२)गुरुवार रोजी रात्री केलेल्या गोळीबारात एक जण ठार झाल्याची प्राथमिक माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे. नेकनूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी घटनास्थळी दाखल झाले असून अधिकृत माहिती लवकरच हाती येईल.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यातील लिंबागणेश परिसरात पवनचक्कीच्या साहित्याची चोरी करण्यासाठी काही चोर आले होते. यावेळी सुरक्षारक्षकाने चोरट्यांवर गोळीबार केल्याची माहिती समोर येत आहे. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

बीड तालुक्यातील महाजनवाडी येथे असलेल्या पवनचक्की प्रकल्पावर काही अज्ञात चोरटयांनी चोरी करण्याच्या उद्देशाने हातात लाट्या-काठ्या आणि तलवारी घेऊन हल्ला चढवला त्यावेळी सिक्युरिटी गार्ड असलेल्या व्यक्तीने या लोकांच्या दिशेने गोळीबार केला यामध्ये एकाचा मृत्यु झाल्याची प्राथमिक माहिती आहे. नेकनूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत.सदर घटनेची माहिती मिळताच नेकनूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून, पोलिसांकडून सध्या प्रकरणाचा तपास सुरू आहे.



## 'अँग्रिस्टॅक' अंतर्गत पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी बंधनकारक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ मे**

महाराष्ट्र राज्याच्या जमाबंदी आयुक्तालय आणि कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक व वेळेवर मिळवून देण्यासाठी 'अँग्रिस्टॅक' योजना शासनामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांची व त्यांच्या शेतांची माहिती संकलित करणे आणि त्या माहितीच्या आधारे सरकारी योजनांचे कार्यान्वयन अधिक प्रभावी व सुलभ बनवणे आहे. राज्यातील कृषिक्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा जलदगतीने व परिणामकारकरीत्या शेतकऱ्यांना लाभ देणे सुलभ व्हावे, याकरिता केंद्र शासनाची अँग्रिस्टॅक योजना राबविण्यात येत आहे. शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी बंधनकारक करण्यात आला असून 'अँग्रिस्टॅक' अंतर्गतच पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी सुद्धा फार्मर आयडी बंधनकारक करण्यात आला आहे .पीएम किसान योजनेंतर्गत पात्र सर्व लाभार्थी यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी 'अँग्रिस्टॅक अंतर्गत नोंदणी गरजेची आहे. तरी शेतकऱ्यांनी विनाविलंब 'अँग्रिस्टॅक नोंदणी करून घ्यावी जेणेकरून कोणताही पात्र शेतकरी पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यापासून वंचित राहणार नाही, असे आवाहन जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी केले आहे.

## बीडमध्ये आज भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन

### तिरंगा रॅलीत महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजयजी शिरसाट यांची प्रमुख उपस्थिती लाभणार!

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ मे**

सीमेपलीकडून वारंवार होणाऱ्या भ्याड हल्ल्यांना भारतीय सैन्याने दिलेले रोकठोक प्रत्युत्तर हे केवळ युद्धाचे नव्हे तर भारतमातेच्या वीर पुत्रांची शौर्यगाथा लिहिणारे आहे. या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी आणि मातृभूमीसाठी बलिदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी बीड शहरात आज दि. २४ मे २०२५ रोजी सकाळी १०. ०० वाजता देशभक्तीने ओथंबलेली भव्य तिरंगा रॅली आयोजित करण्यात आली असून या ऐतिहासिक रॅलीस महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री मा. संजयजी



शिरसाट यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ही रॅली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून सुरू होईल. त्यानंतर सुभाष रोड मार्गे जात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ अभिवादन करण्यात येणार आहे. शेवटी सीमारेषेवर मातृभूमीसाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांना सामूहिक श्रद्धांजली वाहून रॅलीचा समारोप होईल. या रॅलीमध्ये हजारो तरुण मोटारसायकलवर तिरंगा झेंडा हाती घेऊन सहभागी होणार आहेत. हे आयोजन केवळ एक कार्यक्रम नसून, जवानांच्या शौर्याला मानवंदना देणारी आणि एकतेची भावना जागवणारी लोकचळवळ ठरणार आहे.

शूरवीर सैनिकांसाठी, चला एक होऊ देशासाठी- जगताप, मुळूक, गलधर

देशाच्या मातीसाठी, आपल्या लेकरांसाठी, आपल्या भविष्यासाठी शूरवीर जवान आपल्या प्राणांची आहुती देतात. त्या शूरवीरांना आपण एक सुजाण भारतीय नागरिक असल्या नात्याने एकत्रित येऊन वंदन करायला हवे. ही तिरंगा रॅली आपल्या सैनिकांच्या बलिदानाचे स्मरण आणि त्यांच्या शौर्याची गाथा गाण्याचा एक पवित्र क्षण असणार आहे. यामुळे बीडवासियांनी जास्तीतजास्त संख्येने तिरंगा रॅलीमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक आणि स्वप्निल गलधर यांनी तमाम बीडवासियांना केले आहे.

## विद्यापीठाने चार जिल्ह्यातील २३३ महाविद्यालयाचे प्रथम वर्षाचे प्रवेश रोखले

### दरवर्षी तोच घाणा आणि तेच आदेश-ॲड.अजित देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ मे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर यांनी शैक्षणिक वर्ष २०२५/ २०२६ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील चार जिल्ह्यातील दोनशे तेहतीस महाविद्यालयांच्या प्रथम वर्षाचे प्रवेश पूर्णपणे रोखण्याचे आदेश दिले आहेत. दरवर्षी विद्यापीठाचा तोच घाना असतो. यातून काही करोडोची कमाई होत असल्याची चर्चा शैक्षणिक क्षेत्रामध्ये ऐकायला मिळते, असा आरोप ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ड. अजित देशमुख यांनी केला आहे.

विद्यापीठाच्या उपकुलसचिव (शैक्षणिक विभाग) यांनी दिनांक १७/०५/२०२५ रोजी मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन न केलेल्या संलग्नित महाविद्यालयांची शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रथम वर्षाची प्रवेश क्षमता स्थगित करण्याबाबतचे आदेश जाहीर केले आहेत. विद्यापीठाच्या कार्यक्षमतेचा अभ्यास केला असता दरवर्षी हे आदेश काढले जातात. काही महिन्यात हे आदेश गुंडाळून ठेवले जातात. त्यामुळे विद्यापीठाच्या गुणवत्तेची वाट लागली आहे. त्याला दस्तुर खुद्द विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी जबाबदार असल्याचा आरोप देखील देशमुख यांनी केला आहे. नॅक मूल्यांकन आणि पुनर्मूल्यांकन करून विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. मात्र चांगल्या सुविधा दिल्या जात नाहीत. याची तपासणी विद्यापीठाच्या अधिष्ठाता मंडळ समोर होते. या तपासणीतून महाविद्यालयांची नावे काढली जातात. त्यांची प्रवेश क्षमता शून्य करण्यात येते. मात्र दरवर्षी तोच घाणा घालून विद्यापीठ शैक्षणिक गुणवत्ता ढासळवत आहे.विद्यापीठाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ८७ महाविद्यालयांची प्रवेश क्षमता रोखली आहे. त्याचप्रमाणे बीड जिल्ह्यातील ६४ महाविद्यालयांची प्रवेश क्षमता रोखली आहे. त्याचप्रमाणे जालना जिल्ह्यातील ५१ इतके महाविद्यालयांची तर धाराशिव येथील ३१ इतक्या महाविद्यालयांची प्रवेश क्षमता रोखली आहे. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील तब्बल २३३ महाविद्यालय नियमाचे उल्लंघन करून महाविद्यालय चालवीत असल्याचे या निमित्ताने पुन्हा एकदा उघडकीस आली आहे.महाविद्यालय चालवणाऱ्या संस्थाचालकांना त्याचबरोबर तेथील प्राचार्य, प्राध्यापक यांना आणि विद्यापीठाच्या कुलगुरू पासून ते वेगवेगळ्या विभागाचे उपकुलसचिवांपर्यंत एक साखळी निर्माण झाली आहे. ही साखळी विद्यार्थ्यांना पायाभूत सुविधा पुरवीत नाही. तरी देखील कोट्यावधी रूपयांचे पगार दर महिन्याला केले जातात. जाणीवपूर्वक केले जाणारे हे कृत्य विद्यापीठ थांबवत नाही, तोपर्यंत मराठवाड्यातील गुणवत्ता वाढणार नाही, असेही ड. अजित देशमुख यांनी म्हंटले आहे.



बीड : शेतीतही मोठ्या प्रमाणावर यांत्रिकीकरणाचा वापर केला जात असला तरी ग्रामीण भागात आजही मोगडा, तिफण, कोळपे या शेती पारंपारिक लाकडी अवजारांचा वापर केला जातो. खरीप हंगाम तोंडावर आल्याने कारागीर शेती साहित्य तयार करण्याच्या लगबगीत आहेत. (छाया: कृष्णा शिंदे)

## राजस्थानी उच्च माध्यमिक विद्यालयात अकरावी ऑनलाइन प्रवेश नोंदणी सहायता कक्षाची स्थापना

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ मे**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ यावर्षी संपुर्ण राज्यात अकरावी वर्गाची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने होणार असल्याने येथील राजस्थानी सेवा समाज संचलित द्वारकादास मंत्री राजस्थानी उच्च माध्यमिक विद्यालय वीप्र नगर बीड येथे अकरावी ऑनलाईन प्रवेश नोंदनी सहायता कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.शैक्षणिक वर्ष २०२५-२६ यावर्षी संपुर्ण राज्यात अकरावी वर्गाची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने होणार असल्याने येथील राजस्थानी सेवा समाज संचलित द्वारकादास मंत्री राजस्थानी उच्च माध्यमिक विद्यालय वीप्र नगर बीड येथे अकरावी ऑनलाईन प्रवेश नोंदनी सहायता कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना अकरावी वर्गाच्या ऑनलाईन प्रवेशासाठी सकाळी १० ते सायंकाळी ५ दरम्यान सहायता कक्ष कार्यान्वित राहील.सदरील केंद्रावर अकरावी वर्गाची ऑनलाईन प्रवेश नोंदनी होणार आहे तरी महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही शाळेतील इयत्ता १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना आमच्या उच्च माध्यमिक विद्यालयातून ऑनलाईन अर्ज दाखल करता येईल तरी १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य श्री रामचंद्र कसबे,उपम ुख्याध्यापक श्री सुनील लाहोटी,पर्यवेक्षक श्री अशोक हावळे यांनी केले आहे.

## रुक्मिणीकांत कृपा सांप्रदायिक वारकरी भजनी मंडळाची वार्षिक बैठक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ मे**

संत नामदेव नगर येथील रुक्मिणीकांत कृपा सांप्रदायिक वारकरी भजनी मंडळाची वार्षिक बैठक मानुरकर यांच्या श्री प्रभुलीला येथील निवासस्थानी अध्यक्ष कमलाकर मालेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. प्रथम मंडळाचे कार्याध्यक्ष प्रकाश मानुरकर यांनी रुक्मिणी पांडुरंगाची विधिवत पूजा करून पंढरपूर येथील श्री पांडुरंगाचा सर्वांना प्रसाद वाटप केला. यावेळी मंडळातील सर्व वारकरी सदस्यांना पंढरपूर वारी करण्यासाठी वर्षभराचे नियोजन करण्यात आले. चैत्र महिन्यात कमलाकर मालेगावकर,,वैशाखमध्ये देविदास डोळे आणि राहुल सूरडीकर, ज्येष्ठ मासमधे, आर.डी.देशमुख आणि बाळासाहेब पारगावकर, आषाढ महिन्यात बालासाहेब रत्नपारखी, श्रावण महिन्यात प्रभाकरराव कुलकर्णी आणि प्रा.डी.एस.कुलकर्णी, भाद्रपद महिन्यात धनंजय लाखणगावकर आणि सुरेष जोशी पारगावकर, आश्विनमासमधे हरिभाऊ बुगदे, आणि सुरेश जाडे, कार्तिक मासामध्ये प्रकाश मानुरकर आणि अमित राव देशमुख, मार्गशीर्ष महिन्यात कुमारराव देशमुख खडकीकर पौषमध्ये अशोकराव ओपळकर, माघ महिन्यात रामकृष्णपंत जोशी खडकीकर, फाल्गुन महिन्यात मुकुंदराव खडके यांची निवड करण्यात आली. सुधीर राऊतमारे यांनी त्यांच्या वेळेनुसार वारी करावी असे ठरले. ठरलेल्या महिन्यातच पंढरपूरवारी करून स्वगृही सर्व वारकरी मंडळींना बोलावून प्रसाद वाटप करण्यात यावा असे ठरले. तसेच प्रत्येकाने गणेश साई मंदिरातील श्री गणेशास संकष्टी चतुर्थीच्या दिवशी त्यांना ठरवून दिलेल्या महिन्यात अभिषेक करावा असेही ठरले.मंडळाच्या वर्धापन दिनाच्या दिवशी श्री ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज यांचे गुरु येहळेगाव येथील श्री तुकामाई महाराज यांच्या पोथीचे सामुदायिक वाचन श्री साई मंदिरमध्ये घेण्याचे ठरले. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकरराव कुलकर्णी नवगणराजुरीकर यांनी सर्वांचे आभार मानले. आणि अल्पोपहारनंतर बैठक संपली. वर्षभरात वेगवेगळे कार्यक्रम घेतले जातील, सर्वांनी यामध्ये सहभाग घ्यावा असे आवाहन अध्यक्ष कमलाकर मालेगावकर यांनी केले. असे मंडळ प्रसिद्धी प्रमुख प्रा.डी.एस.कुलकर्णी यांनी कळविले आहे.

## गुरुवारी अंबाजोगाईत १६ बटू चे उपनयन संस्कार

### ब्राह्मण सभेचा ४८ वर्षांपासूनचां उपक्रम



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२३ मे**

येथील ब्राह्मण सभेच्या वतीने याही वर्षी २९ मे गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता धाकटे देवघर येथे १६ बटू चे उपनयन संस्कार होणार आहेत.अशी माहिती ब्राम्हण सभेचे अध्यक्ष अनिरुद्ध चौसाळकर यांनी दिली.

येथील ब्राम्हण सभेच्या वतीने गेल्या ४८ वर्षांपासून उपनयन संस्कार हा उपक्रम राबविण्यात येतो. समाजातील गरीब कुटुंबांना उपनयन संस्काराचा आर्थिक ताण पडू नये.यासाठी ब्राम्हण सभेचे संस्थापक अध्यक्ष स्व. राजाभाऊ चौसाळकर यांनी हा उपक्रम सुरू केला.त्यांच्या निधना नंतर डॉ.गोपाळ चौसाळकर,अनिरुद्ध चौसाळकर यांनी हा उपक्रम सातत्याने सुरु ठेवला. या वर्षी १६ बटू चे उपनयन संस्कार होणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन ब्राम्हण सभेचे अध्यक्ष अनिरुद्ध चौसाळकर यांनी केले आहे.

## भारतीय जैन संघटना, जलसंपदा विभाग,नाम फाउंडेशनच्या मदतीमुळे कामाला बळकटी मिळाली-आ.संदीप क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ मे**

**सध्या आ.संदीप क्षीरसागरांच्या पुढाकारातून व नगरपालिकेच्या माध्यमातून शहरातील बिंदुसरा नदीपात्रात स्वच्छता व खोलीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत योगदान म्हणून भारतीय जैन संघटना, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशन यांनी स्वेच्छेने आपले योगदान देत या महत्त्वाच्या कामात हातभार लावला आहे. त्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहेत.**

### बिंदुसरा नदी स्वच्छता आणि खोलीकरणाच्या कामातील योगदानाबद्दल आ.क्षीरसागरांकडून आभार व्यक्त

मागील ३ दिवसांपासून बीड शहारातील बिंदुसरा नदीपात्रात स्वच्छता आणि खोलीकरणाचे काम आ.संदीप क्षीरसागरांच्या पुढाकारातून आणि नगरपालिकेच्या माध्यमातून युध्दपातळीवर सुरू आहे.





एसटी सीसीएस बँकेच्या एसटी कामगार संघटना व एसटी कामगार सेना यांचे अधिकृत उमेदवार गणेश चव्हाण यांची संचालक पदावर निवडून आल्या बद्दल त्यांचे शिवसेना कार्यालयावर जिल्हाप्रमुख उल्हास भैय्या गिराम व उपजिल्हाप्रमुख राजाभाऊ महूवाले व विधानसभा प्रमुख सुशील भैय्या पिंगळे इतर पदाधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी एसटी कामगार सेनेचे विभागीय सचिव राहुल बहीर ,हावळे पाटील ,सय्यद ख्वाजा,तसेच कामगार संघटनेचे वल्लभ चिरके,नितीन रसाळ,विजय कुडके व इतर एसटी कर्मचारी हजर होते.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com